
अंक ५० वा वर्ष ५४ वे

# विनयन

नियतकालिक : २०१९-२०




खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

## शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

(NAAC Reaccredited 'A' Grade)

समवाय एव साधुः

स्थापना : १९६५




जळगाव विभाग आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा



जळगाव विभाग आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा



जळगाव विभाग आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धा महाविद्यालयाचा संघ पुरुष

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

# विनयन

## नियतकालिक २०१९-२०२०

: प्रकाशक :

**प्राचार्य डॉ. अशोक राणे**

**उपप्राचार्य प्रा. केतन चौधरी**

**प्रा. निलेश जोशी**

: संपादक :

**प्रा. स्वाती चव्हाण**

**प्रा.पंकज पाटील**

: विद्यार्थी प्रतिनिधी :

**धांडे कांचन रघुनाथ**

**ताहीर मलिक रियाजुद्दीन**

: छायाचित्र :

**मोहन चौधरी, विजय चव्हाण**

: मुद्रक :

**अथर्व पब्लिकेशन्स्**

शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,

तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१. **संपर्क :** ९४०५२०६२३०

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अंतरंग


| अ.न. | नाव | विषय |
|---|---|---|
| १ | अंकिता पाटील | आपली संस्कृती जगू द्या आणि जगा ...................... १३ |
| २ | हर्षा नेमाडे | एक दिवस मला........................................... १३ |
| ३ | वर्षा पाटील | चेहरा ....................................................... १४ |
| ४ | पुनम फिरके | एकविसावे शतक व शिक्षक................................ १४ |
| ५ | शिवानी उंबरकर | स्त्री स्वरूप ................................................ १६ |
| ६ | किशोर चव्हाण | अढी........................................................ १७ |
| ७ | देवश्री चंद्रकांत जंगले | आठवण ..................................................... १८ |
| ८ | रोहिणी भास्कर तायडे | सागरा! प्राण तळमळला.................................... २० |
| ९ | सायली पालीवाल | रिंगण ...................................................... २२ |
| १० | शुभांगी सोनवणे | मुखवटा.................................................... २३ |
| ११ | सायली पालीवाल | संस्कृती आणि आपण .................................... २३ |
| १२ | अंकिता पाटील | स्त्री! स्त्री!! स्त्री!!! ........................................ २४ |
| १३ | लिना चव्हाण | जगात प्रथम ............................................. २५ |
| १४ | शांता पाडवी | मनाची व्यथा .............................................. २६ |
| १५ | Khyati | Life : Whiff Of Smke..........................................28 |
| १६ | Khyati | Money Will Buy .................................................28 |
| १७ | Yugandhara Marathe | Do You Know ? ..................................................29 |
| १८ | Yugandhara Marathe | Exam! Exam! Exam! ............................................29 |
| १९ | Aanam | Character Development Is Real Education ...........30 |
| २० | Chitra | Life .....................................................................30 |
| २१ | Aanam | On Friendship ......................................................31 |
| २२ | Chitra | Flower Pot ...........................................................31 |
| २३ | Lingayat Gaytri | Marriage Proposal .................................................32 |
| २४ | Lingayat Gaytri | Laugh....................................................................32 |
| २५ | Monika Solunke | TREES : THE PILLRS OF ENVIROMENT .........33 |
| २६ | Monika Solunke | An Ideal Interview................................................34 |
| २७ | Monika Solunke | Stop Think Remember...........................................34 |
| २८ | दिपक डुडके | एक विनम्र श्रध्दांजली !...................................... ३५ |
| २९ | रुपाली बोंडे | विज्ञान और धर्म ........................................... ३६ |
| ३० | दिपाली बोंडे | प्रशंसा करन सीखे.......................................... ३७ |
| ३१ | ममता वारके | बेचैनी...................................................... ३८ |

| | | |
|---|---|---|
| ३२ | प्रतिक्षा बोरसे | उच्च भावना ........................................ ३८ |
| ३३ | जितू फिरंगे | देश परदेशो के स्वातंत्र्य दिन........................ ३९ |
| ३४ | दिपक डुडके | कश्मकश ........................................ ४० |
| ३५ | अतुल महाजन | क्षमा ........................................ ४० |
| ३६ | अतुल महाजन | गझल........................................ ४१ |
| ३७ | हर्षा नेमाडे | स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सामाजिक दृष्टिकोन ............... ४१ |
| ३८ | सुनिल वळवी | शाम ए गम की कसम आज गमही है गम ............... ४३ |
| ३९ | प्राजक्ता रोझोतकर | भारतीय संस्कृती एक अमोल ठेवा ..................... ४५ |
| ४० | पुनम सैंदाणे | राखी........................................ ४६ |
| ४१ | गोंदया पाडवी | प्रेम पत्र ........................................ ४७ |
| ४२ | लिना चव्हाण | आप कितना दहेज लेंगे ................................ ४९ |
| ४३ | गिरीश भगवान सैंदाणे | सत्य एवम् सौन्दर्य ................................ ५० |
| ४४ | समिक्षा कुंते | क्या नर नारी समान है ! ................................ ५१ |
| ४५ | रोहिणी भास्कर तायडे | राष्ट्रीय एकात्मता- काळाची गरज ......................... ५२ |
| ४६ | हर्षदा अशोक पाटील | माणसाचे मन हा आंनदाचा डोह ........................ ५३ |
| ४७ | Sarika Prakash Koli | Rules of Living........................................54 |
| ४८ | Sarika Prakash Koli | Money Can Buy........................................55 |
| ४९ | Sarika Prakash Koli | Can computer replace the school teacher...............55 |
| ५० | Patil Gayatri Yuvraj | Carving - A type of mental pollution......................56 |
| ५१ | हिरामण बाबुराव पाटील | हिन्दी भाषा और राष्ट्रीय एकीकरण ........................ ५७ |
| ५२ | रोहिणी भास्कर तायडे | भारताची अधोगतीकडे वाटचाल !.......................... ५८ |
| ५३ | किशोर चव्हाण | भाषा : काल, आज, उद्या ................................ ६० |
| ५४ | देवश्री चंद्रकांत जंगले | हुंडा एक अनिष्ट रूढी... ................................ ६१ |
| ५५ | रोहिणी भास्कर तायडे | साहित्य स्वरूप : एक अनुभव ............................ ६३ |
| ५६ | सागर संजय पाटील | आजचा युवक ........................................ ६५ |
| ५७ | सागर संजय पाटील | जीवन - एक न उलगडणारं कोडं .......................... ६६ |
| ५८ | Dr. Shailaja D. Bhangale | Term Paper On Teacher as a Facilitator.................68 |
| ५९ | Ligy P.K | Various Education Commission's Recommendation For Women Education..........................................70 |
| ६० | Patil Shital Anil | Save girl child........................................72 |
| ६१ | | शैक्षणिक वर्ष २०१९-२० अहवाल ......................... ७४ |
| ६२ | | महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती ................ ८१ |
| ६३ | | इतिहास मंडळ २०१९-२० ................................ ८१ |
| ६४ | | अहवाल विभाग........................................ ८३ |
| 65 | Report of University Avishkar Competition 2019-20 ....................................83 | |



## अध्यक्षांचे मनोगत...

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात एकूण ५५ वर्षांची उज्वल शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा व शैक्षणिक गुणवत्ता यांचे नियमित संवर्धन होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. यासाठी व्यवस्थापन परिषद सातत्याने मार्गदर्शन करून नियंत्रण करीत आहे. शासनाच्या आणि विद्यापीठाच्या सर्व योजनाचा महाविद्यालयात लाभ मिळण्यासाठी प्राचार्य आणि सर्व शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी सतत कार्यरत असतात. यामुळे महाविद्यालयाचे एनसीटीई आणि NAAC या संस्थेकडे नियमित अहवाल सादर केलेले असून शिक्षणाचा दर्जा सतत उंचावत राहण्यासाठी सर्व स्टाफ कार्यमग्न असतो.

या महाविद्यालयात बी.एड.,एम.एड., बी.पी.एड. आणि एम.पी.एड. या शिक्षणक्रमांचे अध्यापन केले जाते. तसेच शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता आहे. आजपर्यंत ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. तसेच अनेक विद्यार्थी संशोधन करीत आहे. या महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा खेळ आणि क्रीडा क्षेत्रात विविध कौशल्य विकसित करण्यासाठी संस्थेने एकलव्य क्रीडा संकुलाची उभारणी करून खेळासाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध केल्या आहेत. महाविद्यालयात खेळातील कौशल्य विकसित होण्यासाठी विद्यापीठ मान्यता प्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले आहेत. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी फी सवलत घेऊन सदर प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

राष्ट्रीय स्तरावर नवनवीन शैक्षणिक विषयांवर महाविद्यालयात राष्ट्रीय व विद्यापीठ स्तरावरील परिषदांचे व चर्चासत्रांचे नियमित आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात शैक्षणिक विचारांचे आदान-प्रदान होते. तसेच हुशार व गरजू विद्यार्थ्यांना संस्थेच्या स्तरावर शिष्यवृत्ती देऊन आर्थिक मदत केली जाते. तसेच सवलतीच्या दरात वसतिगृहाची सुविधा दिली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी दरवर्षी विद्यापीठ परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकतात. त्यामुळे दरवर्षी विद्यार्थ्यांमध्ये प्रवेश घेण्यासाठी स्पर्धा असते. महाविद्यालयाच्या विनयन वार्षिक अंकास शुभेच्छा !!!

**– प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे**

अध्यक्ष, के.सी.ई.सोसायटी, जळगाव

## प्राचार्यांचे मनोगत...



प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रहों,

खान्देश कॉलेज एयुकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे नियतकालिक 'विनयन' प्रकाशित करताना आनंद होत आहे. आपल्या महाविद्यालयाला ५४ वर्षे पूर्ण झालेली आहे. महाविद्यालयाचे व्हीजन ''यावजीवम्मधिते विप्र:'' असे आहे. प्रत्येक शिक्षकाने आजीवन शिक्षण सुरु ठेवून ज्ञानदान करीत जावे, असा बोध आपणाला घेता येईल. महाविद्यालयाचे मिशन "To impart relevant quality training programmes of education to students to make them knowledgeable, competent skillful teachers for the emerging society." असे आहे. यातुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून सुजाण, कार्यक्षम आणि कुशल शिक्षक तयार करण्याचा सतत प्रयत्न असतो. यासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष मा.नंदकुमार बेंडाळे व व्यवस्थापन मंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असते.

यावर्षी प्रथम वर्षात या शिक्षणक्रमास एकूण बी.एड्- ९४ , एम.एड्,१९ बी.पी.एड.४७ आणि एम.पी.एड्.ला ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला असून प्रथम वर्षाचा या सर्व विभागांचा प्रथम वर्षाचा निकाल सरासरी ९४ टक्के पेक्षा जास्त आहे. एस.वाय एम.पी.एड. ९३%, बी.पी.एड. ७१%, बी.एड.९४%, एम.एड.१००% निकाल लागला आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन!

या वर्षात महाविद्यालयात अनेक विविध सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थी आणि समाजाचा सहभाग घेता आहे. कोविड-१९ च्या सर्व नियमांचे पालन करून विद्यार्थ्यांना Online अध्यापन व मार्गदर्शनाचे कामकाज शिक्षकांची उत्तमपणे केले आहे.

महाविद्यालयाच्या संशोधन विभागातंर्गत २ प्राध्यापकांनी संस्था पातळीवर संशोधन प्रकल्प हाती घेतले आहे. तसेच महाविद्यालयातील पीएच.डी. मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार १ विद्यार्थ्यांना पीएच.डी.पदवी प्रदान झालेली आहे. वर्षभरात महाविद्यालयात विविध मान्यवर प्राध्यापकांनी नैमित्तिक भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेले आहे. तसेच शासनाचे, विद्यापीठाचे, यु.जी.सी. कडून आलेल्या पत्रानुसार विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे व क्रिडा स्पर्धांचे यशस्वीरित्या आयोजन केले आहे.

विनयन नियतकालिकाचे मुखपृष्ठ बोधप्रत आहे. या अंकासाठी लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनापासून अभिनंदन करतो व विनयन या नियतकालिकास हार्दीक शुभेच्छा देतो.

**डॉ.अशोक रामचंद्र राणे**
प्राचार्य

# संपादकीय

संपादकीय...

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

के.सी. ई. सोसायटी संचलित शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय म्हणजे विविध कलेचे एक दालनच होय हे म्हणायला काही हरकत नाही. केवळ शैक्षणिक कामकाजच नाही तर विविध कला सादरीकरण व संधीना वाव विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जातो...

शिस्त मंडळ, कला दर्शन, क्रीडा स्पर्धा आणि करिअर निवड या सर्व बाबींचा विचार महाविद्यालयात पूर्णपणे जबाबदारी म्हणून पार पाडला जातो. या वर्षाच्या संपूर्ण वार्षिक नियोजनासाठी विविध कला व त्याचे महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी राबविले गेले. शिक्षक हा सर्व गुण संपन्न असावा ही उक्ती पूर्ण केली गेली. शिक्षकाला बोलता येणे तेवढेच त्याला अभिनय सादर करता येणे ही गरजेचे आहे हे लक्षात घेवून प्राचार्य डॉ अशोक राणे सर यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध कलेचे दालन खुले करून दिले.

या सर्व कार्यात विद्यार्थ्यांना क्षेत्र भेट, राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजकार्य, विविध सांस्कृतिक कार्यक्रम सहभाग, क्रीडा स्पर्धा यातून सहभाग नोंदविणे प्राचार्यांनी भाग पाडले. त्याचे महत्त्व पटवून दिले. महाविद्यालयातील या अष्टपैलू अभियानास प्राचार्य डॉ. अशोक राणे, सर उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी आणि प्रा. निलेश जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिवाय सर्व प्राध्यापक वृंदाने सहभाग नोंदविला.

विनयनसाठी डॉ. अशोक राणे, सर उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी आणि प्रा. निलेश जोशी व सर्व प्राध्यापक वृंदाचे मोलाचे सहकार्य लाभले धन्यवाद !

संपादक

**प्रा. डॉ. स्वाती वसंतराव चव्हाण**

**प्रा. पंकज रविंद्र पाटील**

| B.Ed. 2019-2020 (Result) | | | |
|---|---|---|---|
| 1) | Mansi Hitesh Dhamania | 9.32 (CGPA) | 2124 (Mark) |
| 2) | Harsha Yuvraj Nemade | 9.43 (CGPA) | 2120 (Mark) |
| 3) | Jayashri Santhosh Mahajan | 9.28 (CGPA) | 2113 (Mark) |
| **B.P. Ed. 2019-2020** | | | |
| 1) | Tahir malik | 5.61 (CGPA) | 2531 (Mark) |
| 2) | Ravindra Patil | 5.55 (CGPA) | 2548 (Mark) |
| 3) | Vishal Sonawane | 5.52 (CGPA) | 2472 (Mark) |
| **M.P. Ed. 2019-2020** | | | |
| 1) | Kamini Agrawal | 5.50 (CGPA) | 2473 (Mark) |
| 2) | Tejas Kulkarni | 5.50 (CGPA) | 2472 (Mark) |
| 3) | Ajay Dusara | 5.50 (CGPA) | 2471 (Mark) |

# आपली संस्कृती जगू द्या आणि जगा !

–अंकिता पाटील
द्वितीय वर्ष बी.एड.

एकदा देव व दानव भांडू लागले. दिवसेन दिवस दानवांचा अहंकार आणि स्वार्थीपण वाढत चालला. भांडण थांबण्याचे लक्ष दिसेना शेवटी ब्रम्हदेवाने देव व दानव यांना आपल्याकडे जेवण्यास बोलावले. ब्रम्हदेवाकडचे ते सुग्रास जेवण । पक्वानांचा नुसता घमघमाट सुटला होता. जेवणाची वेळ झाली. पाने वाढली. जेवणास सर्व प्रथम दैत्यांना पाचारण केले गेले. देवांच्या आधी जेवणाच मान मिळालेला पाहताच दैत्य आनंदले !

ब्रम्हदेवाने त्यांना आज्ञा केली की भोजन पात्राजवळ जे दंडे व दोऱ्या ठेवल्या आहेत त्या उजव्या हातांना बांधा व मग जेवायला बसा ! सर्वांनी एकमेकांच्या मदतीने ते काम पूर्ण केले पण गंमत अशी झाली की त्या अवस्थेत कोणासच जेवता येईना, ते शेवटी भरल्या पानावरून उपाशीच उठले.

मग देवांची पंगत जेवणास बसली. त्यांना ब्रम्हदेवाने जी आज्ञा दैत्यांना केली तीच देवांना पण केली. देवांनी आज्ञेप्रमाणे उजव्या हातास एकमेकांच्या साह्याने दंड बांधले. आज्ञा होताच जेवायला बसायला सुरूवात केली पण त्या आधी भोजप पात्रे व आसने जवळ केली. समोरासमोर केली.

प्रथम समोर बसलेल्या देवांच्या तोंडात घास भरला नंतर समोरच्याने यांच्या तोंडात असे करून भरपेट जेवून तृप्तीने उठले. दैत्यांना ही युक्ती सुचलीच नाही. स्वार्थाच्या पलिकडे त्यांना विचार सुचलाच नाही. सारासार बुध्दीपण भ्रष्ट झाली ! देवांनी मात्र एकमेकांच्या सुखाचा विचार केला. त्याग स्विकारला. जीवनात स्वतः सुखी होण्यासाठी आधी दुसऱ्याला सुख द्यावे लागते. माणसाच्या सुखी जीवनाचे हे रहस्य ! जागू द्या आणि जगा !

# एक दिवस मला...

– हर्षा नेमाडे
द्वितीय वर्ष बी.एड.

एक दिवस मला....
सुर्य होऊन पहायचे आहे
स्वत:च्या दाह सहन करून
सृष्टीला प्रकाश दयायचा आहे

एकदिवस मला
पक्षी होऊन पहायचे
आहे घरटं बनविण्याची जिद्द
अंगी बाळगायची आहे

एक दिवस मला....
सरिता होऊन पहायचे आहे
या सृष्टीला जीवन देवून
जरा पहायचे आहे
एक दिवस मला....
वृक्ष होऊन पहायचे आहे
भटकणाऱ्या वाटसरूंना
सावली देऊन पहायचे आहे

एक दिवस मला...
पणती होऊन पहायचे आहे
स्वत:ला जाळून घेऊन
मंदीर उजळायचे आहे

# चेहरा

– वर्षा पाटील
द्वितीय वर्ष बी.एड.

मी एक चेहरा पाहिला आहे.
सुंदर चेहरा पाहिला आहे.
तो जितका सुंदर आहे तितकाच
चित्ताकर्षक आहे.

तो इतका आनंदी आणि तेजस्वी आहे की
संपूर्ण काळोखात सुध्दा त्याची प्रभा फाकते.
तो चेहरा स्वत:च आनंद रूपी आहे.

तो माझ्या दृष्टीस पडला हे माझे भाग्य आहे.
पण हा माझा आनंद इतरांना मिळणार नाही
कारण हा चेहरा ज्या स्त्रिचा आहे
ती माझी 'आई' आहे.

# एकविसावे शतक व शिक्षक

–पुनम फिरके
द्वितीय वर्ष बी.एड.

दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो.
जो जे वांछिल तो ते लाहो, प्राणिजात

ही सदिच्छा उराशी बाळगुन सर्वांना नवीन शतकाचे, नवीन वर्षाचे स्वागत केले. एकमेकांना शुभेच्छा दिल्या, मिठाई वाटली व सर्वांनी आनंद व्यक्त केला. एकविसावे शतक नवीन आकांक्षा व मानवी सुखाचा संदेश देईल ही सर्वांची अपेक्षा आहे.

विसाव्या शतकाला निरोप देताना त्या शतकातील बऱ्या–वाईट घटनांची नोंद घेणे आवश्यक ठरते. विसाव्या शतकात दोन महायुद्धे झाली. या युद्धांमध्ये अणुशक्तीचा शोध विध्वंसक ठरला. लाखो लोक मृत्युमुखी पडले, करोडोची संपत्ती नष्ट झाली. या शतकाच्या शेवटी आतंकवाद शिगेला पोहोचलेला आहे. अणूबॉम्ब, प्रलयंकारी अण्वस्त्रे व महाभयंकर शस्त्रांची एकविसाव्या शतकातील संपूर्ण जगाला भीती वाटत आहे. आजच्या काळात एखादे महायुद्ध झाले तर सर्वकाही बेचिराख होण्याची भिती निर्माण झालेली आहे. आणि या भीतीची जाणीव एकविसाच्या शतकाच्या प्रत्येक वर्षाच्या स्वागताच्या आनंदाबरोबरच पीडा देत आहे.

विसाव्या शतकात विज्ञानाचे अनेक शोध लागले. विसाव्या शतकातच विज्ञानाने मानवी इतिहासात कधी नव्हे एवढी नेत्रदीपक प्रगती केलेली आहे व ही प्रगती एकविसाव्या शतकातही चालूच आहे. याच शतकात तंत्रज्ञानाचा प्रचंड अविष्कार झालेला आहे. विज्ञानाने मानवासमोर भौतिक सुखाचे दालन उघडे करून दिलेले आहे. या भौतिक सुखाने मानव नक्कीच सुखावलेला आहे.

विसाव्या शतकातील भोतिक प्रगतीचा वेग अतिशय प्रचंड होता. श्रीकृष्णाचे विश्वरूप दर्शन मानवीरूपातील अर्जूनाला जसे असह्य झाले, त्याच प्रमाणे विज्ञानामुळे झालेल्या भौतिक प्रगतीचा वेग मानवाला असह्य झाला. माणसांचा आपल्या मनावरचा ताबा सुटला. मानवी मन स्वैर झाले. यातून मानवाच्या भोगविलासी वृत्तीत वाढ

झाली. एक भोगप्रवण संस्कृती फोफावू लागली. या संस्कृतीमुळे माणूस आपले माणूसपण हरविण्याच्या मार्गावर आहे. अनीतीचा स्वैराचार, नीतिमुल्यांची होणारी घसरण, उद्ध्वस्त होऊ पाहणारी कुटूंबव्यवस्था ही एकविसाव्या शतकासमोरील आव्हाने आहेत.

विज्ञानाच्या प्रगतीला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. विज्ञानाची प्रगती विश्वाला उपकारकच ठरणार आहे. याचीही सर्वांना जाणीव आहे. धातूपासून माणसाचा खून करणारा सुरा तयार करता येतो तसेच त्याच धातूपासून देवतेची मूर्तीदेखील तयार करता येते. अ विज्ञानाचा वापर माणूस कोणत्या प्रकारे करू शकतो यावर विज्ञान हे वरदान की विध्वंसक शस्त्र हे ठरणार आहे.

वैद्यकशास्त्रातील जाणकारही अजूनदेखील ख ींशरीं लीीं लशलींशी असे म्हणतात. हे कशाचे लक्षण आहे ? विज्ञानालादेखील अजूनही काही गोष्टी शक्य नाहीत. विज्ञानाच्या पलिकडे एक अध्यात्मिक विश्व आहे व त्याची जाणीव विज्ञानाला आहे. पण विज्ञानाच्या भौतिक प्रगतीचे मिळणाऱ्या भौतिक सुखाने सुखावलेल्या माणसाला अध्यात्माची जाणीव हळूहळू कमी होताना दिसते.

शिक्षणाच्या दृष्टिकोनातून एकविसाव्या शतकाकडे दृष्टिक्षेप टाकतांना असे दिसते, की या शतकाने शिक्षणासमोर काही आव्हाने उभी केली आहे. शिक्षणाचे सुकाणू बऱ्याच प्रमाणात शिक्षकाच्या हातात असल्यामुळे शिक्षकाला ह्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. ज्ञानप्रक्रिया व संस्कार प्रक्रियेच्या जोरावर शिक्षकांना वरील आव्हान पेलतानाच विद्यार्थ्यांच्या दिशाहीन नौकेला योग्य दिशा देण्याचे काम करावयाचे आहे.

शिक्षकी पेशात पदार्पण करण्यापूर्वी शिक्षकांनी जेवढे ज्ञान प्राप्त केलेले असते तेवढ्या ज्ञानाच आधारावर संपूर्ण शिक्षकी पेशा पुढे चालविणे व दैनंदिन अध्यापनाचे कार्य यशस्वीपणे पूर्ण करणे अशक्य होणार आहे. सतत नवनवीन शोध लागत आहे. दररोज नवीन ज्ञानाची भर पडत आहे. शिक्षकाला नवीन ज्ञानाच्या संपर्कात राहून अभ्यासूवृत्तीने हे नवीन ज्ञान सतत जाणून घेण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

अनेक प्रकारच्या प्रसार व प्रचार माध्यमांमुळे बहुश्रुत झालेल्या विद्यार्थ्यांसमोर अध्यापनासाठी उभ्या होणाऱ्या शिक्षकाला आपले ज्ञान कसोटीला लावावे लागणार आहे. अपूर्ण तयारीने वर्गात विद्यार्थ्यासमोर उभे राहण्याची हिंमत एकविसाव्या शतकात शिक्षकाची राहणार नाही. शिक्षकाला विद्यार्थ्यांसमोर आपली पात्रता सिद्ध करावी लागणार आहे.

ज्ञानप्रसाराची माध्यमे मर्यादित असतानाच्या काळात समाजाला शिक्षकाच्या कार्याविषयी कृतज्ञता वाटत असे गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु ही त्या काळातील शिक्षकाला मिळालेली उपाधी आहे. आज समाजसुद्धा शिक्षकाकडे या भावनेने पाहत नाही. पण हे देखील खरे आहे की शिक्षक आपल्या कामात प्रामाणिक असेल तर समाजदेखील शिक्षकाला विनाकारण दोषी ठरविणार नाही. शिक्षकाला ज्ञानदानाचे कार्य करतानाच स्वतःच्या चारित्र्याचा, नीतिमत्तेचा विचार ठेवून वागणे आवश्यक आहे. शिक्षकांकडून नीतिमूल्यांचे पालन झाल्यास समाज त्याची नक्कीच नोंद घेणार आहे.

When a barber makes a mistake,
it will be a new style
When a boxer makes a mistake,
it will be a new action
When a cook makes a mistake,
it will be a new dish
When a tailor makes a mistake,
it will be a new fashion
But when a teacher makes a mistake,
it will be a new crime

शिक्षकांनी केलेल्या चुका खपवून घेण्याची कोणाचीच मानसिकता नाही, याची जाणीव एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी शिक्षकांनी ठेवून व शतकाच्या अध्या कार्य यापुढेही असेच सुरू ठेवावे व शिक्षकी पेशाशी असलेला प्रामाणिकपणा कायम ठेवावा. अशी आशा ठेवतो. व आवाहनही करते. धन्यवाद !

# स्त्री स्वरूप

– **शिवानी तुबरकर**
द्वितीय वर्ष बी.एड.

भारतीय स्त्रिया म्हणजे त्यागमुर्ती. भारतीय स्त्रिया म्हणजे तपस्या, मूक सेवा. भारतीय स्त्रिया म्हणजे अलोट श्रध्दा व अमर आशावाद अशा या आदर्शभूत भारतीय स्त्रीचे काही वैशिष्टपूर्ण गुण-विशेष साने गुरुजींनी 'स्त्री स्वरूप' या लेखात सांगितलेले आहेत. त्यांचा क्रमाक्रमाने परिचय

**करून घेऊ भारतीय स्त्रीचे गुणविशेष :**

१) निसर्ग ज्याप्रमाणे गाजावाजा न करता काम करीत असतो. व फुले फुलवित असतो. त्याप्रमाणे भारतीय स्त्रिया कुटुंबात सतत कष्ट करून निमूटपणे श्रम करून आनंद निर्माण करीत असतात.

२) सीता, सावित्री, द्रौपदी, गांधारी हे भारतीय स्त्रियांचे आदर्श आहेत. त्यागमूर्ती व प्रेममूर्ती अशी ही भारतीय स्त्रियांची दैवते आहेत. भारतीय संस्कृतीत स्त्रीचे जीवन म्हणजे पेटलेले होमकुंड आहे. लग्न म्हणजे यज्ञ. पतीच्या जीवनाशी संलग्न झाल्यापासून स्त्रीच्या जीवनयज्ञास आरंभ होतो आणि हा यज्ञ मरणानेच शांत होतो.

३) भारतीय स्त्री म्हणजे मूर्त कर्मयोग. तिला स्वतंत्र अशी जणू इच्छाच नाही. पतीच्या व मुलांच्या इच्छा म्हणजेच तिची इच्छा.

४) पती हेच भारतीय स्त्रीचे दैवत. 'मैं गुलाम में गुलाम, मैं गुलाम तेरा। तू साहिब मेरा ।।' या कविराच्या भाषेत बोलायचे तर भारतीय स्त्री न कळत, न वळत पतीला हेच म्हणत असते. ती सर्वस्य पतीला अपर्ण करते. सर्वस्वाने एक खास गुण आहे. ५) हा भारतीय स्त्रियांचा एक खास गुण आहे. ६) भारतीय स्त्रिाय धर्मभोळ्या, धार्मिक प्रवृत्तीच्या आहेत. ७) भारतीय स्त्रिया ध्येये पाळणाऱ्या आहेत.

८) पतीबरोबर चितेवर हसत चढणारी सती किंवा पती निधनानंतर त्याचे चिंतन करीत वैराग्याने प्रेतमय जीवन कंठणारी गतभर्तृका ही भारतीय स्त्रीची दोन रूपे आहेत. त्या रूपातून त्यांचे स्वभावगुणच नजरेत भरतात.

९) 'माता' या दृष्टीने भारतीय स्त्रियांचा महिमा अपरंपार आहे.

हे गुण म्हणजे स्त्री हदयाचे उघड केलेले स्वरूपच होय. पती कसाही असो, त्याला सांभाळून घेणे हे भारतीय स्त्री खास स्वतःचे कर्तव्य म्हणून व्रतच अंगिकारते. पत्नी म्हणून पतीची सेवा आणि कुटूंबाची अग्र ती निभावते. स्वतःचे अश्रू स्वतः चे दुःख ती कोणास दाखविणार नाही. या कर्तव्यात भारतीय स्त्री पत्नी म्हणून कधीही कमी पडणार नाही.

पतीची लहर सांभाळणे म्हणजे तिचा धर्म होऊन बसतो. पतिमुखावरचे हास्य म्हणजे पत्नीचे सुखसर्वस्व ती पतीच्या मुद्रेकडे पाहात असते. पतीचे डोहे हसले, ओठ हसले की तिला मोक्ष मिळतो. पती गोड बोलला की तिला सारे मिळाले. या अल्पसंतोषासाठीच भारतीय स्त्री 'पत्नी' म्हणून आपले सारे आयुष्य वेचते.

पापी, दुर्गुणी, दुराचारी पतींचीही सेवा भारतीय स्त्री तितक्याच प्रामाणिकपणे करते. पती म्हणजे त्यांचा देव. त्यांचा महान आदर्श. त्यांचे दिव्य ध्येय होय. घर म्हणजे आधार. घर म्हणजे आशा. घर म्हणजे विसावा. घर म्हणजे प्रेम. घर म्हणजे आत्मीयता. हे घर माझ्या पतीसाठी हा मुलांसाठी मी प्रेमाने भरून ठेवीन. हे भारतीय स्त्री आपले आदर्श कर्तव्य मानते. तितक्याच प्रामाणिक पणे निभावते.

अशी ही भारतीय स्त्रियांची कर्तव्य दृष्टी आहे. पतीची गुरू ही तिची भूमिका. त्यांची सावली होणं. हे तिचे दिव्य कर्म-कर्तव्य. माझ्या आशेत माझ्या प्रेमात, माझ्या स्वप्नात या पीर जिन्टच्या पानीच्या शब्दातच भारतीय स्त्रीचे सारे जीवन सामावलेले आहे. पतीकडे पाहण्याचे तिचे डोळेच निराळे असतात. कितीही दुर्वृत्त पती असो, एक दिवस तो चांगल्या रीतीने वागेल, अशी अमर आशा प्रेमळ स्त्री

ह्रदयात असते.

घरात काही करा परंतु जगात नीट वागा, आणा सारी घाण घरात, ती काढायला मी समर्थ आहे. तुमचे पशुत्व होमण्याची मी पवित्र वेदी आहे. बाहेर जाल ते माणूस होऊन जा. पशुपती होऊन जा. शिव होऊन जा. अशी सत्वस्वरूपी पतीला शिवशंकर करणारी स्त्री ही शक्ती आहे. पत्नी म्हणून पतीला ती माणसाळविते, शांत करते, स्थिर करते, आळा घालते, संयम घालते, मर्यादा घालते.

भारतीय स्त्रीची आदर्श पत्नी म्हणून नजरेत भरणारी ही अशी अनेकविध आदर्शभूत तत्वे कर्तव्ये आहेत.

# अढी

– **किशोर चव्हाण**
प्रथम वर्ष बी.एड.

सा–या जगाची आणि भारताचीही वेगवेगळ्या क्षेत्रात केवढी तरी प्रगती झालेली आहे. सध्याचे युग हे विज्ञान युग आहे विज्ञानाच्या क्षेत्रात या देशाने नेत्रदीपक प्रगती केली आहे. जातपात धर्म विसरुन केवळ मानव हीच जात, मानव हाच खरा धर्मं या हेतूने राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे सर्वकष प्रयत्न होत आहेत यासाठी या देशातील थोर पुरुषांनी– नेत्यांनी सातत्याने कष्ट केलेले आहेत. ही जातीयता नष्ट करण्यासाठी आणि भेदाभेदाच्या भिंती तोडून टाकण्यासाठी राष्ट्रीय नेत्यांचें प्रयत्न आणि समाजसुधारकांचे प्रयत्न अविस्मरणीय आहेत. हे कुणीही नाकारुन चालणार नाही. एकीकडे असे आदर्श प्रयत्न चालले असतांना अविचारी वृत्तीची आणि जातीयतेने धर्मान्ध झालेली काही स्वार्थी जळमटं उगीचच तडफडत आहेत. हरिजनांच्या नावाने बोटं मोडीत आहेत. हरिजनांना शासन देत असलेल्या सवलती पाहून तर त्यांच्या अंगाची लाही लाही होत आहे. सर्वच क्षेत्रात अजनही हरिजनांचा अपमान आणि अवमान चालू आहे. कोणत्या ना कोणत्या रीतीनें हरिजनांना जसे आणि जेवढे छळता येईल तेवढे छळण्याचा जणू त्यांनी चंगच बांधला आहे. विशेषतः हिंदू धर्मीय बांधवानीच आपल्या बांधवांचा करावा ही अगदी लांछनास्पद छळ घटना आहे.

वर्षांनुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात आणि दारिद्र्याच्या खाईत खितपत पडलेला मागासवर्गीय समाज अजूनही तसाच राहावा असेच या सवर्णीय बगळयांना वाटते काय ? गुजरातचे राखीव जागांचे आंदोलन, पंजाब मधील हिंसाचार, हे कशासाठी ? देशात निरनिराळ्या ठिकाणी होणारे अत्याचार हे कशासाठी ? हरिजन ही देखील आपल्यासारखीच माणसे आहेत त्यांना छळून काय उपयोग, असे सवर्णीयांना का वाटत नाही ? वा देशात ही विषमता आणखी किती काळ राहणार आहे ? चांगले शिकले सवरलेले लोकही जातीयतां मानतात हरिजन म्हटला की, त्यांच्या जिवाची घालमेल होतें जातियतेची अढी खरं म्हणजे दिवसेंदिवस नष्ट व्हायला हवी पण नष्ट होण्याऐवजी ती वाढतच आहे. याचे दुःख होते नव्हे हे या देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. देशातील मानवी संघटना मजबूत करुन देशाची प्रगती साधण्याऐवजी आपल्याच देशबांधवां विरुद्ध लढून आपली शक्ती म्हणजेच देशाची शक्ती नष्ट करीत आहोत. हे जात पात मानणाऱ्या सवर्णीयांना कळत नाही काय? हींन आणि क्षुद्र मनोवृत्ती झुगारुन देऊन त्यांची आपले मन मोठे करायला हवे मानवता धर्माचे रक्षण करायला हवे. तो सर्वं धर्माहून श्रेष्ठ आहे. मनातली अढी आता नष्ट करायला हवीं बिना सहकार नही उद्धार', एकमेकाच्या सहकार्या विना उद्धार होणार नाही मानवाच्या उद्धारासाठी साधु संतांनी अहर्निश प्रयत्न केले. मानव समाज त्यांनी प्रगती पथावर आणला. त्यांनी भेदाभेद अमंगळ ठरविले कथा कीर्तनातून जातीभेदावर प्रहार केले. मानव समाज जागृत केला

आणि एकच जात मानव जात हे वेळोवेळी समाजाला व देशाला पटवून दिले. ज्ञानदेव, तुकाराम, रामदास स्वामी, चोखामेळा, रोहिदास अशा कितीतरी साधुसंतांनी त्यांच्या असंगातून समाजाला उपदेशाचे अमृत पाजले आहे. बुरसटलेल्या विचारसरणीच्या माणसाच्या डोळयात सुधारणेचे झण झणीत अंजन घातले आहे. मनातील अढी माणसाचे मन पोखरुन टाकते. माणसाला दुर्बल बनविते, आणि दुर्बल झालेला माणूस हताश होऊन चवताळलेला आणि पिसाळलेल्या कुत्र्यासारखा वागू लागतो. माणसांनी हे वागण बरोबर नाही. योग्य नाही. जनावरांच ठीक आहे, जनावरांना समजत नाही. म्हणूनच मानव हा श्रेष्ठ समजला जातो, अशा श्रेष्ठ व ज्ञानी माणसांनी आपल्यांच बांधवांवर अत्याचार करावे हे शोभणारे नाही तसे पटणारेहीं नाहीं. मनं स्वच्छ झाली पाहिजेत मनात रुजलेली अढी नष्ट करायला हवी.

मना करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण ।

असं जे म्हणतात ते खोट नाही अढी आणि रुढीयाविरुद्ध माणसांनी बंड पुकारायला हवेच.

# आठवण

**– देवश्री चंद्रकांत जंगले**
प्रथम वर्ष बी.एड.

लग्नानंतरचे विधी हळूहळू संपत होते. सगळीकडे उत्साही वातावरण दिसत होते. निता डोक्यापासून पायापर्यंत नववधुच्या रुपात नटली होती आईच्या हातामध्ये औक्षणाचे ताट होते. त्यात रंगीत तादूळ होते निरांजन जळत होते आईने निताकडे पाहिले दोघीच्या डोळयामधून अश्रू वाहत होते. आई निताला म्हणाली तु ज्या घरामध्ये जन्म घेतला, ज्या घरामध्ये मोठी झाली, ज्या माणसांनी तुला प्रेम दिले त्या सर्वाचा त्याग करुन तुला पुढे जावे लागणार आहे. यापुढे तुझे सर्वस्व तुझा पती आहे. हे ऐकून निता स्वत:ला सावरु शकली नाही ती आईच्या गळयात पडून रडू लागली. तेथे तिची लहाणपणापासुनची मैत्रीण छाया उभी होती. छायाला पाहताच तिचे ह्रदय भरुन आले छाया आपल्या हातातील वस्तुकडे पहात म्हणाली यामध्ये काय आहे ते तुला माहित आहे ? तुझ्या दीपकची भेट ! तो तुझ्या लग्नाला येऊ शकत नव्हता म्हणून माझ्याजवळ पाठवून दिली आहे नाही म्हणू नको.'

दीपकच्या भेटीमुळे नीताच्या मनात गोंधळ उडाला. डोळयात आसवे उभी राहिली. कंठ दाटून आला दीपकची भेट तिनें एका बाजुला ठेऊन दिली.

थोडयाच वेळानंतर गाडी चालू लागली. पुढे वाजंत्री वाजत होती गाडी दिपकच्या दारासमोरुन जाऊ लागली. दिपक दारात उमा होता उदास चेहरा ! एवढयात नीताचे लक्ष दिपकच्या भेटीकडे गेले भेटीवरील गुंढाळलेला फोटो काढला त्यावेळी नीताला समजले कीं त्यात दीपकने आपल्या हाताने बनवलेले चित्र पाठवले आहे चित्र नववधूचे होते. चित्र पाहून नीताचे ह्रदय भरुन आले डोळयासमोर भुतकाळातील एक एक क्षण आठवू लागले.

**वीस वर्षापूर्वीची गोष्ट!**

शहराच्या जवळचे लोक प्लाट खरेदी करत होते व बंगले बांधत होते. दिपकचा एक भाऊ कारखाना चालवत होता. हळू हळू कॉलनी वाढत गेली. विनोदच्या शेजारीच राणेचा बंगला होता त्यांना एकच मुलगी होती ती म्हणजे नीता.

त्यावेळी दीपक आठ वर्षाचा होता. छाया त्याच्याच वर्गांत शिकत होती. ती त्याला भाऊ म्हणायची, छाया, दिपक, व निता एकाच वर्गांत शिकत होते त्यामुळे शाळेत बरोबरच जात. निताची व छायाची नव-नवीन गोष्टी सांगून दीपक करमणूक करत असे. दीपकचे बालपण नीताच्या

व छायाच्या बरोबर मजेत चालले होतें.

तारुण्याच्या उंबरठ्यावर पाय ठेवतांना नीताला आईने सावध केले तु आता दीपक बरोबर जायला राहायला नको याचा नीतावर चांगला परिणम झाला. नीता दीपकपासून दुर दुर राहू लागली. दिपकने एक दिवस विचारले तेव्हा ती म्हणाली आईने मनाई केली आहे मी आता लहान नाही, 'तू मोठी झाली म्हणुन काय झाले? आपण दोघे लहानपणा पासून एकत्र आहोत.

लहानपणाची गोष्ट वेगळी होती परंतु आताआपण मोठे झालो आहोत असे म्हणून मी निघुन गेली.

अचानक त्याला ते दिवस आठवले की ज्यामुळे दोन्ही घरात वैर निर्माण झाले. दीपकच्या भावाची सासु शेवटचे क्षण मोजत होती दीपकचा भाऊ विलासने गाय दान करण्याचा विचार राणेजवळ बोलवून दाखवला राणे नी एक गाय आणून दिली गाय पंडिताला दिली जेव्हा पंडित गाय घेऊन चालले तेव्हा त्याना अटक झाली. दिपक व विलास जेव्हा जामिनावर सुटून आले तेव्हा त्यांना कळाले की राणे नी कोणतीच धडपड केली नाही तेव्हा राणेच्या घरी गेले व त्यांना म्हणाले माझा अपमान करण्यासाठीच तुम्ही ही गाय दिली. मला माहीत आहे आपल्याजवळ किती काळा पैसा आहे हे जर इनकमटॅक्स अधिकाऱ्यास कळाले तर दुकानाला व घराला कुलूप लागेल आणि दुसऱ्या दिवशीच त्यांच्या घरावर अधिकाऱ्यांनी छापा घातला व राणे यांना अटक केली.

इकडे विलाससुद्धा आश्चर्यचकीत झाला की आपली वाचा सत्य कशी ठरली ? आपण कीतीही खरे सांगितले तर राणेनां विश्वास वाटणार नव्हता दोन्ही कुटूंबातील दुश्मनी वाढत गेली.

कॉलेज बंद झाले व नीताला मिळणे कठीण झाले दीपकने छायास खुप विनवणी केली की तु तिला तुझ्या घरी घेऊन ये. छायाने दीपकची गोष्ट नीताला सांगितलीं नीतानें साफ असंभव आहे. नकार दिला आता आमचे मिळणे

दीपकची भेट होताच नीता तोंड फिरवायची जशी काय कोणी अनोळखीच आहे. एके दिवशी दीपक नीताला म्हणाला माझ्या पासुन काही लपवू नकोस निता, भांडणामध्ये आपल्या दोघांची ही चूक नाहीं मी आज सोक्षमोक्ष करायला आलोय.....

यामध्ये जीवन आणि मरण आहे मला विश्वास आहे कीं तु मला जीवन देशील मरण नाही.

भावनावश होऊन दीपकने नीताचा हात धरला हात सोडवत नीता म्हणाली.

' दीपक मला आता विसर मी तुझी होऊ शकत नाही.'

दीपकची निराशा वाढतच गेली. एके दिवशी समजले कीं नींताचे लग्न ठरले आहे. नीताला देण्यासाठी भेट तयार केली.

खेळ समाप्त झाला होता. नीता दुसऱ्याच कोणाची तरी झाली होती.......

# सागरा! प्राण तळमळला

– रोहिणी तायडे
प्रथम वर्ष बी.एड.

नदी धावतपळत सरंसरं आली आणि चर चर ऽऽ किनाऱ्यावरील पाणी कापत सागराच्या बाहूत शिरली. प्रेमानें ओथंबलेला हात तिच्या डोक्यावरुन फिरवत सागर म्हणाला 'आलीस प्रिये, मला जरुर येशील म्हणून. वाटतच होत, तू

हं ! मी नाही आले रे माझ्या राजा मला तर तुझ्या प्रेमाच्या ओढीनेच खेचून आणलं, '

' आणि तुझी ओढ काय कमी आहे माझ्या लाडले? किती तरी पर्वत, पठारे, मैदाने, दऱ्या खोया ओलांडत, कित्येक कोस – अंतरापासुन तू धावत पळत आलीस. पण ए, आलीस तशी जाऊ नकोस मात्र. तिची , हनुवटी उंचावत सागर म्हणाला.

जाण्यासाठी काय आलेय मी ? आणि आहे तरी कुणाची हिंमत, की जो आपल्यात दुरावा निर्माण करु शकेल ? अगदी समुळ नष्ट करेन त्याला मी. आणि अशी जाणार तरी कुठे मी ?

कुठेच जाणार नाही काय म्हणतेय. तुला जावच लागेल ना. ,

कुठे ' ?

अग उन्हाळयात तू माहेरी नाही जाणार तुझ्या ? पुढे तिच्या डोळयात बघत तो म्हणाला ए तेंव्हा एकेक क्षण युगायुगासारखा वाटेल. पण –पण त्यात ही आनंद आहे ना !

आनंद ? कोणता आनंद ?

तिच्या कोरदार भिवयांवरुन बोट फिरवीत सागर म्हणाला ' मांगु ? अग पहिल्याच वेळी मुलगी जेव्हा माहेरी जातेय ना, तेव्हा ती येतांना सोबत काहीतरी आणते, म्हणून आनंद. ए पण काय आणते माहिती आहे तुला ?

काय आणते ? ' तिच्या मुखातून एकदम शब्द बाहेर पडले. आणि नंतर लक्षात आल्यावर मात्र ती लालीलाल झाली.

' मग आणशील ना तू सुद्धा कुकूलं बाळ ? अग ये लाजतेस काय अशी आता. नाही तू लाज, त्याबद्दल नाही काही म्हणण. कारण हे लाजररुपही काही औरच अप्रतीम आहे तुझ ! '

' हं जा ! तुझ्यात दिसणाऱ्या चंद्रापेक्षा तर सुंदर नाही ना ? '

नदीच्या स्कंधावर दोन पंजे ठेवीत तो म्हणाला, ' माझे सरीता राणी. अस म्हणतात, ' पुरुष ही अपूर्णांक संख्या आहे आणि जेव्हा त्याच्या जीवनात स्री येतेना, तेव्हा ती पूर्णांक संख्या बनते ' आज तू माझ्या जीवनात आलीस. माझंही जीवन आज पूर्णत्वाला पावलं. आनंदाच भरत आलाय मला तर –

' आणि मला मला तर कितीतरी दिवसापासून तुझी आसक्ती जडली होती तुला कधी येऊन मिळेल असं झाल होतं. आणि आज, आज तो क्षण आला.

' हं '

' या क्षणासाठी कुणी मागितलंच तर माझं सारं वैभव ही लुटून देईन मी.'

' माझे राणी, आता तर वाटतंय या पृथ्वीच्या पाठीवर माझ्या इतका भाग्यवान मीच '

दिवस सरत होते. येणारा प्रत्येक दिवस सागर नदीच्या प्रेमात भरती आणत होता. सागराच्या अप्रतीम प्रेमाने नदी आनंदी होती नि आनंदानें तिचं देखणं रुप अजूनही खुललं होत. तिची दुधाळ कांती त्यापेक्षाही उजळून निघाली होती.

तहानेने व्याकुळलेल्या मानवाने पाण्याने ओंजळ भरली आणि ती तोंडाजवळ लावणार तोच त्याचं लक्ष तिच्या सुरेल निकोप सौदर्यांकडे वेधलं गेलं. ओंजळीतलं पाणी केव्हाच गळून गेलं तो फक्त बघत राहीला. बघता

बघता तो तिथून निघून गेला. गेला पण शुद्ध हरपूनच त्याचे पाय नित्य नदीकडेच ओढ घेऊ लागले. पण अस किती दिनस चालणार ? अखेर एकेदिवशी त्याने आपली प्रीत नदीजवळ व्यक्त केली. आणि नदीने त्याच्या प्रीतीला अव्हेरलं.

' सरीता देवी, तुझ्याशिवाय हे जीवन आता समृद्ध नाही व्हायचं. तू माझ्या जीवनात ये नि ते समृद्ध कर मी मी विनवतोय तुला. ,

विनवण्याची काही आवश्यकता नाही. मी माझं जीवन आधी अर्पण केलंय. सागराला. नदी ने सांगून टाकल.

हं अग अपरिहार्यच होतं तर निदान चांगल्या व्यक्तिला अर्पण करायचं होतं. त्या अविचारी, घटक्यात

तोळा तर घटक्यात मासा अशा सागराला काय अर्पण केलस. मानव द्वेशाने, कुचेष्टेने बोलला.

'तोंड सांभाळून बोल मूर्ख माणसा. 'नालायकपणा' करु नकोस. यापुढे माझ्या प्रियतमास एक अपशब्द बोललास तर जन्मालाच आलो नव्हतो समज.

' हां हां ऽऽऽ नालायक माणूस म्हणतेस काय मला ! बघ. विचार कर अजूनही वेळ गेली नाहीय नाहीतर - छल्लो तुलाही दिसलेच आता तुझ्यासाठी नालायक कोण आहे आणि लायक कोण आहे ते. '

'अरे जा दिडबिल्लास माणसा, काय करशील तर '

' अच्छा; दिडबील्लास माणूस काय मी ! पण हे मात्र विसरु नकोस की त्यात अर्ध्या बिल्लासाचा मेंदू आहे. समजलीस ? ' असं म्हणून मानव तिच्यावर थुंकून निघून गेला.

तिथून तो परत तर आला पण त्याच्या काळजाला 'नालायक', 'दिडबील्लास माणसा ' हे शब्द सारखे उ बोचत होते अपमानाचं शल्य त्याला स्वस्थ बसू देत नव्हतं. नदीवर कसा सुड उगवावा या विचारात तो पडला होता, विचारांनी तो बेचैन झाला होता. याच विचारमग्न अवस्थेत बेचैनतेने खोलीत हिंडत असतांना त्याचं लक्ष खिडकी बाहेर गेल. बाहेर लहान मुल गटारीत माती टाकत होते. बघून तो आनंदलाचं

दुसऱ्याच दिवसापासून शेकडो मजूर कामास लागले. थोडयाच दिवसात, खूपखूप मेहनतीने त्यांनी नदीवर गांध, धरण बांधलं, नदीचा मार्ग रोखला गेला. तिने सुटकेचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ. तशातच मानवाच गडगडाटी हास्य तिच्या कानावर आल. हा हा हा हा काय छल्लो, दिडबिल्लास माणूस ना मी? बघ, तोडून आता माझ्या ताकदीचे साखळ,

अग आजमावून तर बघ, एखादा तुझी ताकद, आणि सांग ' नालायक ' कोण आहे आणि ' लायक ' कोण ते! '

' मानवा असा असुरी बुद्धीने वागू नकोस. माझा मार्ग मोकळा कर जाऊ दे मला. मी --- मी पण विनवतेय तुला. ' नदी काकुळतीस आली.

' काय तुझा मार्ग मोकळा करण्यासाठी अडवलय तुला .' छे! छे! छे! आणि हो, आता तू मला प्रेयसी म्हणूनही नकोय फक्त हवीय........!'

त्याचे पुढचे शब्द न ऐकू यावेत म्हणून तिने कान झाकण्याचा प्रयत्न केला ते विषारी शब्द तरीही तिच्या कानात शिरलेच भडभडून आलं नाही. नाही मानवा. लुटू नकोस रे मला दया कर दया कर माझ्यावर. ती केविलवाणीने त्याची याचना करु लागली. एक उसळती लाट मानवाच्या पायाजवळ गेली. पण मानव.......मानव फक्त तेच गडगडाटी हास्य करीत तिथून निघून गेला.

मानवाने बांधलेला भक्कम तट ती फोडू शकत नव्हती. हतबल झाली ती! मानव जबरीनें तिच्या कडून हेतुसाध्य करुन घेवू लागला. वेठीसच धरल त्याने तिला? नदीचा पुरेपुर फायदा तो घेऊ लागला. विज निर्मिली पडीक शेतांवर हजारो पाईप लागले जमिन ओलीत होऊ लागली. उरलेल्या पोटाहून हात फिरवू लागली. तृप्तीचा ढेकर देऊ लागली पण नदी.....नदी मात्र दुःखी होतीं. अश्रू ढाळत होती. शत्रूच्या पोरांना जणू ती रक्त देत होती. शत्रूचीच तहान-भूक ती शमवत होती. त्याला जगवत होती. सागराची तिला चिंता वाटत होती. त्याच्या आठवणींनी क्षणोक्षणी ती व्याकूळ होत होती, विव्हळत होती. माणसाची ती बळी ठरली होती.

आकाशात काळेकुट्ट ढेकळ जमले होते. वारा उसळत होता. विजा निनादत होत्या लागोपाठच धो धो पाऊसही सुरु झाला. नदीला नवा दम आला. सुटकेचा मार्ग तिला दिसू लागला. तिला खुप कुमक मिळाली. तिन

अक्राळ विक्राळ रुप धारण केलं. धोक्याच्या पातळीवरुन ती झेपावू लागली. दुसऱ्याच क्षणी मानवाने सावधगिरीचा उपाय म्हणून हालचाल सुरु केली, पण नदी खवळली होती. मानवाची हालचाल पुरेसी यशस्वी होऊ शकली नाही. नदीने मानवनिर्मीत भक्कम तट फोडून काढला. गावच्या गाव अंगाखाली चेंगारली गेली लाखो माणसे वाहून गेली. मानवाची दाणादाण उडाली. शत्रूच्या गोटा गोटातून नदी बेफाम होऊन सैरावैरा धावू लागली. तिने मानवाचा पूर्णपूर्ण पराभव केला.

तशीच धावत पळत जाऊन ती थेट सागराच्या बाहूत शिरली. तिच्या वियोगाने सागराच्या सुखाला ओहटी आलेली होती. तिच्या दुःखाने तो रोडावला होता. ती येताच त्यानेही तिला तेवढयाच तिव्रतेने दृढालिंगन दिले नि आपला हात तो तिच्या डोक्यावरुन फिरवू लागला. त्याचे डोळे पाणावले होते आणि मन....... मन तिच्या प्रीतीच्या ओढीने भारावन गेल होतं, तृप्त तृप्त झाल होतं.

# रिंगण

– **सायली पालीवाल**
द्वितीय वर्ष बी.एड.

असलाच तर दैव आणि नियती यांचा लपंडाव !
मग आपण काय म्हणून प्राप्त परिस्थितींचा बाऊ करायचा?
कशासाठी मनात झुरायचं, कढायचं?
आपल्या नशिबी असेल ते आपणच भोगायला हवं,
जगाला आपली जखम उघडी करुन दाखवण्यात उपयोग तरी काय?
अशी दुःख समजून घेणारी माणस फार थोडी आणि दुर्मिळ ? त्यावर मिठ चोळणारेच जास्तभेटतात.
हसताततोंडावर सहानुभूती दाखवतातपण...
पाठीमागं हसतात – टिंगल करतात
बरं झालं, असंच पाहिजे! म्हणतात.
पर दुःख जितकं शीतल
तितकच ते टवाळखोरांना प्रिय !
शेवटी भोगवटा आपला.....

आपणच तो भोगायचा, सोसायचासर्वांना आपणच तोड द्यायंच
ते दुःख जगासमोर आणण्यात अर्थ नाही.
त्यामुळं दैव का पालटणार आहे?
उलट कुणी टिंगल करतील
कुणी कीव करेल.

# मुखवटा

– शुभांगी सोनवणे
द्वितीय वर्ष बी.एड.

सारे जग नटवे आहे
जगात अनेक मुखवटे आहे
कुणी खोटे बोलणारा सत्याचा मुखवटा घेतो
आपले काम निभवून नेतो
कुणी चोर असतो, साव असण्याचा मुखवटा घेतो समाजात मानाने वावरतो
कुणी धडधाकट असुनही याचनेचा मुकवटा घेतो दुसऱ्यांकडून सहानुभूती मिळवून घेतो
त्यामुळे समजेना खरा मुखवटा कोणता नाटक करणायांच्या हजार छटा
जग म्हणजे नाटकाचे स्टेज आहे सारे जगच नटवे आहे
आपणास हवा तो मुखवटा चढवता येतो
डबल रोल करुन मुखवटा बदलता येतो
ज्याला जमते तो सुखी होतो
ज्याला जमत नाही तो मात्र मरतो
मुखवटयांचे शास्त्र कठीण आहे
सारे जगच नटवे आहे
समजून घेतल्यास सोपे आहे
कारण– आपण त्यात सहभागी आहे.

# संस्कृती आणि आपण

– सायली पालीवाल
द्वितीय वर्ष बी.एड.

माझ्या मनात एका गोष्टींचा खूपच गोंधळ माजून राहीला आहे. व तो मी प्रांजळवणे आपणापुढे मांडू इच्छितो. आपल्या भोवतालच्या जगात चाललेल्या घडामोडीतूनच नानाप्रकारचे मूलभूत प्रश्न निर्माण होतात राष्ट्र काय किंवा व्यक्ति काय एकमेकांतील स्नेहभावाबद्दल सतत बोलतात. एकमेकांच्या भावना जाणून घ्याव्यात व त्यातून काही शिकता आल तर शिकाव ही गोष्ट खरी पण इतिहासाच सिंहावलोकन करतांना व चालू घडामोडींचा परामर्श घेतांना अस आढळून येते की एकमेकांची जितकी अधिक ओळख तितकी भांडणे अधिक, ओळखीमुळे अधिक सहकार्य किंवा मैत्री लाभते अस मुळीच नाही. सांस्कृतिक संबंधाबद्दल बोलण निघाल की माझ्या मनात एक प्रश्न निर्माण होतो तो हा की ज्याच्याबद्दल लोक इतके बोलतात ती संस्कृती म्हणजे आहे तरी काय? संस्कृतीबद्दल प्रत्येक देशाची व व्यक्तिची एक विशिष्ट कल्पना असते. सांस्कृतिक संबंधाचा प्रश्न निघाला की होत काय की, त्या विशिष्ट कल्पनांचा संघर्ष उत्पन्न होतो व त्यातून सलोखा निर्माण न होता वैमनस्यच उद्भवते. संस्कृती म्हणजे काय

हाच मूलभूत प्रश्न आहे.

आपल्या संस्कृतीची वाढ करण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्र करत, तिची पायमूळ हजारों वर्षे खोल रुजलेली असतात, अशी एकही संस्कृती नाही की जी मूळची जशीच्या तशी व विशूद्ध राहीली आहे व तिच्याबर दुसऱ्या कोणत्याच संस्कृतीचा परिणाम झालेला नाहीं. मी शंभर टक्के एकाच वंशाचा आहे असे कोणीही सांगू शकत नाही कारण हजारो वर्षांच्या कालावधीत त्यात अनेक प्रवाह मिसळलेले असतात. तसेच संस्कृती म्हटली की त्यात थोड अधिक मिश्रण आलंच.

संस्कृतीला काही मोल असेल तर तिच्यात थोडीं खोली हवी, ती गतीमान हवीं. संस्कृती ही अनेक गोष्टींवर अवलंबून असते. तिच्यावर भूगोलाचा, हवामानाचा व इतर अनेक गोष्टीचा परिणाम झालेला असतो. अरबस्थानातील संस्कृतीवर वालुकामय प्रदेशाचा परिणाम झालेला आहे. कारण ती तेथेच वाढली तद्वत इतर अनेक भारतीय गोष्टी प्रमाणेच भारताच्या संस्कृतींवर अरण्ये, मोठमोठ्या नद्या व हिमालय यांचाही परिणाम स्पष्टपणे झालेला आहे.

संस्कृतीच्या विविध विभागांपैकी शिल्पकला, संगीत व साहित्य यासारखे कोणतेही विभाग एकत्र येऊन त्यांचे मधूर मिलन होते पण कोणत्याही गोष्टीची सुधारणा झाली की संघर्ष आलाच. भारताच्या इतिहासाबद्दल माझा दृष्टीकोण असा आहे की, भारताची अभिवृद्धीं, उत्कर्ष व अपकर्ष विविध कालखंडात त्यानं बाहयजगाकडे किती लक्ष पूरत्रील व किती दुर्लक्ष केल्यावर अवलंबून आहे. त्याने जितकी डोळे झाक केली तितका तो अचल झाला. जीवन मग ते व्यक्तिच असो, समाजाच असो की राष्ट्राच असो मूलतः ते बदलणार व विधिष्णू असत या वाढीला प्रतिबंध करणे जे काही असेल ते अपाय तर करतच शिवाय त्याच्या विनाशाला कारणीभूत ठरत.

आपल्यातील थोर धर्मांचा मानव जातीवर कितीतरी परिणाम झालेला आहे. त्याच्याबद्दल पूर्ण अभिमान बाळगून मला अस म्हणावस वाटत त्याच धर्मानी काही अंशी माणसाच मन अचल व हटवादी बनवल आहे. त्यांनी सांगितलेली वचन चांगलीं असतील, पण तिच अंतिम शब्द असा जेंव्हा दावा मांडला जातो तेव्हा समाज निष्क्रीय बनतो.

मानवाच्या अंतरंगाचा विकास म्हणजेच संस्कृती. त्याची अंतराशी असलेली वागणूक, दुसऱ्यांच मन ओळखण्याची शक्ती व आपल मन इतरांना ओळखू देण्याची शक्ती यांचा अंतर्भाव संस्कृतीत होतो दुसन्याच्या म्हणण्यात काही तथ्य आहे, शहाणपण आहे, सत्य आहे. याची जाणीव असावयास हवी. त्याकडे डोळेझाक करणे संस्कृतीला बाधक होय, सुसंस्कृत मनाची दारे सतत उघडी असतात, इतरांशी आपले पटो वा ना पटो दुसन्यांचा दृष्टीकोन जाणून घेणं हे सुसंस्कृतपणाच लक्षण होय.

# स्त्री ! स्त्री ! स्त्री !!!

**– अंकिता पाटील**
द्वितीय वर्ष बी.एड.

- स्त्री, चें शरीर माणसाला दिसत पण मन कधी दिसत नाही.
- पुरुषाला विदूषक करणारी महान शक्ती म्हणजे स्त्री,
- चंद्रावर स्त्री नसावी नाहीतर पुरुष तेंथे केंव्हाच गेला असता.
- एकमेकांबद्दल आदर आणि प्रेम यांच्या अभावी स्त्री-पुरुष संबंध फुकट आहे.
- निसर्गाच्या नियमानुसार प्रत्येक पुरुषाला एक स्त्रीं आपल्या गळ्यात बांधावी लागते.
- स्त्री ला नेहमीच लग्नाच्या मोडक्या बाजारात उभ रहाव लागत.
- पुरुष स्त्रीवर प्रेम करतो विषय सुख मिळावे म्हणून,
- तर स्त्री पुरुषाला सर्वस्व अर्पण करते प्रेम मिळावे म्हणून.

* स्त्रीयांनो, तुम्हांला इतरांकडून दाखविण्यात येणाऱ्या दयाळूपणाच्या चकाकीने फसु नका तो प्रेमळपणा खरा आहे की नाही याची खात्री करुन घ्या, कारण त्या नाण्यात भेसळ असुन तें नेहमी खरे म्हणुन चालविण्यात येतें.
* साधारण स्त्रीलाच प्रीतीचा खरा अर्थ कळतो. सुंदर त्रीया स्वतःच्या सौन्दर्यातच मग्न असतात.
* स्त्रीच्या सौन्दर्यापेक्षा तीचे बुद्धी सौन्दर्य अधीक मोहक असते.
* स्त्री पुरुषाला आपल्या अधीन ठेवते कुटपर्यंत? ती त्याला सर्वस्व दान करीपर्यंत.
* पुरुषाला अपमान हा एका व्यक्तीचा अपमान होयतर स्त्रीचा अपमान हा सर्व कुंटुबाचा अपमान होय.

## जगात प्रथम

**– लिना चव्हाण**
द्वितीय वर्ष बी.एड.

१० मार्च १८७६ रोजी टेलीफोनवर पहिले वाक्य बोलले गेले.
६ मे १८४७ रोजी पोष्टाचे पहिले तिकींट विकले गेले.
२१ आक्टोबर १८७९ रोजी पहिला विजेचा दिवा लागला.
१५ मे १८८० रोजी पहिली विजेवर चालणारी आगगाडीसुरु झाली.
१७ डिसेंबर १९०३ प्रथम विमान चालविले गेले.
४ नोव्हेंबर १८३० रोजी पहिले व्यंगचित्र जन्मले.
४ आक्टोंबर १९५७ रोजी पहिला मानव निर्मीत चंद्र गगनात विहार करु लागला.

# ‘मनाची व्यथा’

– शांता पाडवी
द्वितीय वर्ष बी.एड.

सुभद्रेला दवाखान्यात नेलेले असते, तिथेच तिचा नवरा दिलीप व सासु सासरे सुध्दा बसलेले असतात डॉक्टर खोलीतून बाहेर पडतात तसेच दिलीप डॉक्टर जवळ जातो आणि डॉक्टरांना विचारतो सुभद्रा कशी. काय आहे ? डॉक्टर सांगतात सुभद्रा झोपलेली आहे. तिने एका कन्यारत्नाला जन्म दिलेला आहे. तुम्ही थोड्या वेळाने तीला भेटण्याला जाऊ शकता. दिलीप सुभद्रा जवळ जातो आणि सुभद्रेला विचारतो सुभद्रा आता कसे वाटते. सुभद्रेचीं सासूबाई पलगांच्या लांबच उभी असते. कारण तीला मुलगी झाल्यामुळे तिच्या कपाळाला आढया पडतात सुभद्रेला दवाखान्यातून तिच्या माहेरी नेतात. दिलीप एके दिवशी बाहेर खुर्ची टाकून पेपर वाचीत बसलेला असतो तेव्हढ्यात फोनची घंटी वाजते तो फोन हातात घेतो तसा तिकडून आवाज येतो जिजाजी आम्ही तुमच्या मुलीचे बारसे करण्याचे योजिले आहे. तरी आपण सर्वानी बारश्याला यावे. दिलीप म्हणतो हो सर्वजण बारशाला येऊ परंतू यावेळेला सुभद्रा काय करते आहे? तिला जरा फोनवर बोलव ना तेव्हा संजू सागतो ताई यावेळेला झोपली आहे आणि तुम्ही आता बारशाला येणार तेव्हाच बोलून घ्या. आणि फोन बंद होतो. इकडे दिलीपची आई संपाकघरातून बाहेर येते दिलीपला विचारते कोणाचा फोन होता. तेव्हा दिलीप साँगतो की माझ्या मुलीचे बारशे आहे तेंव्हा तिथे आपल्याला सर्वाना बोलविले आहे. आई तु पण येशील ना बारशाला? तेव्हा दिलीपची आई म्हणते नको बाबा उगींच मला बस सहन होत नाही. आणि तुम्हाला पण त्रास होईल. दिलीप जे समजायचे ते समजला आई सोडून सगळे जणबारशाला गेले. बारशाचा कार्यक्रम मोठया आनंदाने पार पडतो. सुमद्रेच्या मुलीचे नांव मधुमती असे ठेवण्यात येते परंतु सर्वजण तिला लाडाने बाली हाक मारीत असतात. असे दिवसामागून दिवस जातात. सुभद्रेला घ्यायला दिलीप आलेला असतो. सुभद्रेला सासरी जायचे असल्यामुळे ती खुप रडत असते. आणि संजुला पण खूप वाईट वाटत असते. कारण ताईच्या मुलीमुळे त्यांच्या घरात नेहमी हसत खेळत वातावरण निर्माण झालेले असते. ताई गेल्या मुळे त्यांच्या घरात अगदी सुनेसुने वाटणार होते. सुभद्रा रिक्षेत बसते आणि खुप रडते. तेंव्हा दिलीप सुमद्रेला म्हणतो एव्हडे दिवस राहन सुध्दा मन भरले नाही का ? सुभद्राचे सगळे लक्ष सासुकडे लागलेले असते कारण आता पुन्हा सासुचा छळ सुरु होणार भाडयांची आदळ आपट, सासुचे बोलणे हे सगळे तिला डोळयासमोर दिसत असते. ती गाडीत अगदी गुपचाप बसलेली असते. बालीच्या रडण्याने आणि दिलीपच्या आवाजाने ती भानावर येते बालीला ती पदराआड धरते दिलीप तिला विचारतो काही दुःखताय ? तशी ती नव्ही म्हणतें. एकामागून एक गाव टाकीत गाडी सुभद्राच्या गावाला येवून थांबते. सुभद्रा आणि दिलीप घरी यतात. त्यांच्या रिक्षेचा आवाज ऐकून तिची नणंद बाहेर येते आणि आईला सांगते आई दादा आणि वहिनी आली ग. तरी पण तिची सासू बाहेर येत नाही. सुमन बालीला जवळ घेते: दोघी नणंद भावजयांच्या थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा चाललेल्या असतात.

तेवढ्यात सुभद्रेची सासू तिच्या नणंदेला चहा पिण्यासाठी बोलवित असते. तशी सुमन म्हणते आई इकडेच आण चहा तशी तिची आई म्हणते अर्धाच कप चहा आहे तु घेशील की तिला देशील, सुभद्रा सुमनला चहा घ्यायला पाठविते. असेच दिवसामागून दिवस जातात. आणि सुमद्रेला परत दिवस जातात यावेळेला सुमदेला तिचे डोहाळे वेगळयाच प्रकारे जाणवतांत तिला खूप खावेंवे वाटते फळे खावेसे वाटतात. परंतु बोलुन सुध्दा सुमद्रेला मिळणार नसते एके दिवशी सुभद्रेची सासू सुमित्राला गरम गरम करुन वाढत असते. आणि ती सुमद्रेला घरा बाहेर

झाडाखाली बालीला घेऊन बसायला कारण सुभद्रेची सावली तिच्या जाऊवर नको असते. कारण सांगते. पडायला जर सुमद्रयची सावली पडली तर तिलाही मुलीच होतील. शेजारची नंदा चेष्टेने तिला म्हणते काय हो वहिनी तुमची फार मजा आहे आमची मावशी काम करते आणि आपण आराम करता पण सुमद्रा नंदाला कसे सांगेल. सुनद्रा म्हणते हो वन्सबाई हेच तर आमचे मजेचें दिवस तेव्हढयात सुभद्रेचीं सासू हाक मारते.

सुभद्रेला माहिती असते की आता घरातील सर्व काम आपल्यालाच करावी लागणार. ती सर्व कामे आटोपल्याशिवाय जेवण करीत नसे. ती खुप अशक्त झालेली असते सुभद्रेची आई आलेली असते. तिच्या आई समोर सुभद्राची सासू खुप गोड गोड बोलत असते. सुमद्रेची आई म्हणते सुभद्रा फारच अशक्त झालेली आहे. तेंव्हा तिची सासू म्हणते मी तिला सांगते तु आमच्या बरोबर जेवण करीत जा, जेवण नाही तर फळे खात जा, झोरतांना निदान दूध तरी घेत जा पण ऍकेल तेव्हा ना सुभद्रेच्या आईला वाटते आपल्याच मुलीकडे चूकी आहे. म्हणून ती काही बोलत नाही. सुभद्रेची आई दोन दिवसराहून परत निघून जाते सुभद्राला पण वाटते आपण माहेरी जावे पण तिला वडिलांचे शब्द आठवतात तु त्या घरची लक्ष्मी आहेस काही झाले तरी परत आमच्याकडे येऊ नकोस. सर्व आपण सहन करुन घ्यायच, दिलीप सुमद्रेला विचारतो काय ग फारच अशक्त झाली आई खायला देते किंवा नाही. ती म्हणते सांगायला बसले तर खूप आहे आणि नाहीं सांगितले तर काहीच नाही. दिलीप तिला सर्वकाही सांगून टाकायला लावतो तो तिला म्हणतो एव्हडे असून सुध्दा तु माझ्याजवळ एक शब्दही बोलली नाही. असेच दिवसामागून दिवस जातात. सुभद्रेला दवाखान्यात नेतात, दिलीप, तिचीं सासूबाई, सुमन, सासरे आलेले असतात डॉक्टर खोलीतून बाहेर पडतात आणि दिलीपला म्हणतात आधी दुःखाची बातमी सांगू कीं आनंदाचीं दिलीप डॉक्टरांना सरळ सांगायला लावतो. डॉक्टर सांगतात की सुभद्राने एक पुत्ररत्नाला जन्म दिला आहे. पण ती हे जग सोडून निघून गेली दिलीपला आपल्या आईचा फार राग येतो तो सालीला उचलून आईजवळ देतो आणि आईला म्हणतो अ–ई घे तुला नातु हवा होता ना ? या मुलाकरिता तु तिला एव्हढे छळले तुझ्यामुळे सुभद्रा आपल्याला सोडून गेली दिलीपला ही वाटते आपण सुध्दा सुभद्रेबरोबर निघून जावे परंतु त्याला बालीची आणि छोटया मुलाची आठवण येते. कारण आपण गेलो तर या मुलाच्या डोक्यावरील दोन्हीं छत्रे नाहीसे होतील कारण एक छत्र आधीच हरवून गेलेले आहे.

# LIFE : A WHIFF OF SMOKE

- Khyati

There is practically no difference between a man's life & cigarettes. Like a cigarette a man burns right from the day he steps into the world & burns or is stubbed in-to the ground after death. Funther, there is a called abstract thing knows as "Conscience" which brings out the best in man & filters his bad qualities. So is the same with cigarettes.

"CIGARETTE SMOKING IS INJURIOUS To HEALTH"

Thus the saying goes. But has anyone ever stopped to think what valuable lessons in life it has to teach mankind? A cigarette burns not only for its own sake, but burns for the satisfaction of others, Human life would be very different if man realizes the amount of happiness he would spread around if he would live and spend life for the sake of others - just like a cigarette does.

Majority of cigarettes are destined to die under the sole of shoes and spittoons and the others are left just helpless to face their bitter end, burning bit by bit, and really slowly. But inspite of all the injustice, a cigarette never seems to complain, although it has given everything it had I know not, why ? May be be it is inanimate.

But after all this, Why, Oh why doesn't man learn something from cigarettes instead of denouncing it ?

# MONEY WILL BUY

- Khyati

A bed dut not sleep,
Books but not brains,
Food but not appetite,
Finery but not beauty,
Medicine but not health,
A crucifix but not a saviour
A house but not a home,
Luxuries but not culture,
Amusements but not happiness,
A church but not Leaven !

## DID YOU KNOW?

**- Marathe Yugandhara**

1) The first hydrogen bomb tested in 1952 was as powerful as the total of all bombs dropped on Germany and Japan during world war II, including the atomic bombs on Hiroshima and Nagasaki.
2) The grizzly bear can run as the average horse.
3) When racing at top speed the Jack Da rabbit leaps 13 feet.
4) The blue whale can go without eating up to six months.
5) The largest iceberg ever observed was 208 miles long and 60 times as wide, off the shores of Belgium.
6) Some insect can live for a year after their heads have been severed.
7) During the days of falconry some birds fetched 10,000 dollars a bird.
8) Fish known as Black sea Bass change sex sometimes.
9) Each time the tide comes in every one on one on earth loses a fraction of a pound.
10) The jewels of the late Nizam of Hyderabad were estimated to be worth 400,000,000.

[Compiled by George. T. Fegrudoe]

## Exams ! Exams ! Exams !

**- Marathe Yugandhara**

Exams ! Exams! Exams !
Who invented exams,
I would like to know? If I ever find him
I'll call him my foe.
Exams! Exams! Exams !
Day and night we put in effort, But after the result we get hurt.
Sleep hugs us during studying at night, But while in Bed it runs away with fright,
Exams! Exams ! Exams!
There is always the fear,
That the results may be poor,
But if the results are clear,
Our dear Friends can't bear
Exams! Exams ! Exams!
They are a terror.
with lots of strain and lots of fear,
But still they here every year
to test our knowledge and gear.

## Character Development is A Real Education

**- Anam**
S.Y.B.Ed

मी तिच्याशी लग्न करणार नाही. माझं प्रेम अलकावर आहे, मी तिच्याशीच लग्न करणार, बाबासाहेबांचा मुलगा सुधाकर तोही इरेस पेटला, 'असं ! मी दिलेला शब्द खोटा पाडणार एकूण, वा ! वा ! छान ! चांगल्याप्रकारे छान नाव गाजवाल आमचं, छान अब्रू राखाल आमची अरे काही लाज लज्जा ? सरळ सांगतो आहे भारतीशी लग्न करणार नाही. जेव्हा माझं अलकावर प्रेम......' बाबासाहेब मध्येच वाक्य तोडीत गरजले. 'म्हणजे तिच्याप्रेमासमोर तुला माझ्या अब्रुचीही किंमत नाही, नीट कान उघडे ठेवून ऐक तर मग, भारतीशीच लग्न करावे लागेल. मग तुम्ही पणं ऐका. मलाही भारतीशी लग्न करायचे नाही, करीन तर अलकाशीच लग्न करीन आम्हीं तशी शपथ घेतली आहे देवासमोर, ' वातावरण तापतच गेले 'ठीक ! तर मग आताच्या आता चालता हो माझ्या घरांतून. यापुढे एक मिनिटसुद्धा तुझे काळे तोंड पाहण्याची मला इच्छा नाही.

I say get out

कोठून आपण तो कागद पाहिला असं सुरेखाला वाटलं. सारी चूक आपलीच झाली असे तिला वाटले, आणि इतक्यात गंभीर असलेला सुधाकर जोरजोरानें हसू लागला.

हाऽऽहाऽऽऽहाऽऽऽ अगदी पोट धरून मोठमोठ्याने त्याला मानसिक धक्का तर बसला नाही ना ? अशी शंका आईला आली. सुरेखा त्याच्या जवळ धावली व त्याला गदागदा हलवीत ती म्हणाली. सावध हो..... सावध हो सुधाकर आता मात्र बाबांचे धाबे दणाणले. आपल्या मुलाचे मन ऐवढे कमकुवत असेल अशी त्यांना कल्पना नव्हती. आपण करायला काय गेलो आणि झाले काय असे त्यांना वाटू लागले सुधाकरच्या जवळ जात ते म्हणाले, अरे सुधाकर. सावध हो, सावध हो अरे नुसती चेष्टा केली प्रेमात तू कुठपर्यंत उभा राहतोस एवढंच

पाहायचं होत मला. म्हणून तर रागवायचे नाटक केले. माझी तुझ्या प्रेम-विवाहाला संमति आहे ' पण सुधाकर आणखीनच जोरजोरात हसू लागला, हसता हसताच तो म्हणाला, 'कहरच झाला म्हणायचा ' बाबा 'अहो इथ कशाचा कशाला काही पत्ता नाही आणि लग्नाला काय मान्यता देता ! कळस आहे अगदी !

म्हणजे ? हेपत्र ? ही ही काय भानगड आहे? अक्षर तर चक्क तुझंच दिसतय ' सुरेखा. 'तेच तर सांगण्याचा प्रयत्न करतो आहे केव्हापासून, पण नाटक वठविण्याच्या नादात बाबा माझं ऐकायला राजी असतील तर ! म्हटलं चला आपणही थोडी धमाल द्यावी म्हणून मी पण माझ्या प्रेमाच्या उदात्त गप्पा मारल्या अरे पण ही काय भानगड आहे मग ? ही अलका कोण ? हे पत्र कसलं पाठवतो आहेस तिला?' 'हे पत्र, होय ? अग मासिकासाठी एक कथा लिहायला घेतली आहे, अलका ' आहे त्या कथेची , नायिका त्या कथेतला एक भाग म्हणून नायकाने तिला लिहिलेले पत्र आहे ते. नायकाचे प्रोप्रिएटनावशोधतहोतोम्हणून खालची जागा मोकळी आहे समजलं, ' सुधाकर उत्तरला...

'छान !' म्हणजे तू तर माझ्यावरही कडी केलीस. आहेस खरा बापसे बेटा सवाई बाबा म्हणाले. , गैरसमाजाचे धुके वितळल्यामुळे सुरेखा आणि आईही हसु लागली.

# आप कितना दहेज लेंगे ?

**- लिना चव्हाण**
द्वितीय वर्ष बी.एड.

दहेज प्रथा एक अभिशाप है । दहेज का कैंसर पूरे समाज के शरीर मे अपनी जडे गहरी जमाता जा रहा हैं। दहेज को लेकर हो रही हत्याओं और आत्महत्याओं की भारी संख्या, नारी की वर्तमान चिंतनीय दुर्दशा की ओर स्पष्ट संकेत करती है।

आज कहों किसी के घर लडकी का जन्म होता है तो उस घर में जैसे मातमसा छा जाता हैं । ऐसा क्यों ? आजकल युवा लडकी अपने परिवार के लिए बोझ बन गई है । कहीं भी रिश्ता तय करने से पहले लेंगे ? पूछना पडता है आप कितना दहेज बहुतसी लडकियाँ अपने साथ कम दहेज लाने के कारण बेहद सतायी जाती हैं दहेज की वजह से रिश्ते-नाते कटुता से भर जाते है । आज का युवक दहेज की कुप्रथा का विरोध क्यों नहीं करता ?

इस महंगाई के जमाने में घर संसार चलाना मुश्किल हो गया है । तिस पर दहेज कहाँ से देगे ? कुछ लोग जमीन-जायदाद बेचकर दहेज का प्रबंध वरतें है तो कुछ कर्ज का बोझ ढोनें के लिए मजबूर हो जाते है ।

कई नेता तथा समाज-सेवक दहेज विरोधी आंदोलन कर रहे है, लेकिन कृति शून्य-बकवास ही सिद्ध होती है ।

दहेज को मिटाने के लिए हम बहुत कुछ कर सकतें है । वैसे तो सरकारने भी दहेज-विरोधी कानून बनाया है । परंतु दहेज-प्रथा ने ऐसा भयानक रुप धारण किया है कि सिर्फ कानून उसे मिटा नहीं सकता । इसे मिटाने के लिए समाज में जागृती निर्माण करना आवश्यक है । जन-जागृति ही दहेज-विरोधी प्रभावी उपाय है ।

दहेज के रोग से मुक्त होनें के लिए नारी जाति से काफी सहयोग अपेक्षित है । संपूर्ण नारी जाति को दहेज के विरोध में अपनी आवाज बुलंद करनी चाहिए । हर लडकी यह निश्चय करें कीं, बह शादी उस युवक से करेंगी जो दहेज का लालच न रखता हो । प्रत्येक लडकी को चाहिए कि वह भ्रष्टाचारसे पैसा मिलानेवाले दहेज के लालची युवक के बजाय ईमानदार तथा सदाचारी युवक के ही पति के रुप में चयन करें ।आजके युवक को भी संकीर्ण विचारोंसे मुक्त होना चाहिए । अपने पैरो पर खडा होना होगा और सोचना होगा की दहेज में मिली धन-संपत्ति पर हम कब तक निर्भर रहेंगे। आजीविका के लिए खुद मेहनत करके स्वाभिमान से जीवन बिताना होगा । हमें संघटित होकर सामूहिक विवाह संपन्न करने चाहिए। हमें समाज में नारी मुक्ति आंदोलन द्वारा दहेज के विरोध में जनमत जागृत करना चाहिए, - ताकि रिश्ता तय करते समय वधु के पिता को यह सवाल पुछना न पडे ।

आप कितना दहेज लेगे ?

# सत्य एवम् सौन्दर्य

– गिरीश भगवान सैंदाणे
प्रथम वर्ष बी.एड.

'सौन्दर्य सत्य हैं एवं सत्य सौन्दर्य, के प्रसिद्ध कवि कीटस ने कहा है । पृथ्वी पर लोगों यह अंग्रेजी को इतना ज्ञात हैं कि यह एक दृष्टिकोन है । कभी कभी यह वाद-विवाद किया जाता है कि, सत्य' एवं 'सौन्दर्य' ये दोनो एक दूसरे के गुरुप शब्द है अथवा नही । सभी सत्य को व्यक्त करने के लिए स्वेच्छापूर्वक सहमत हो जाते है । परंतु सत्य सदैव सोन्दर्यमय नही होता । सत्य अद्भुत एवं अप्रिय होता है । तो फिर सत्य एवं सौन्दर्य को साथ-साथ किस प्रकार व्यक्त किया जा सकता है ।

समाज मे कुछ ऐसे व्यक्ति है, जो सत्य और सौन्दयं एक दूसरे के अनुरूप शब्द है, यह दृढता पूर्वक स्वीकार करते है । वास्तविक सत्य, सदा ही सुन्दर होता हैं । वह परम सत्य इतना अधिक सुन्दर है कि वह सभी को आकर्षित करता है । अनेकानेक ऋषि, सन्त और भक्त - गणों ने सत्य के लिये प्रत्येक वस्तु का त्याग कर दिया। आधुनिक जगत् के आदर्श, महात्मा गांधी ने सम्पूर्ण जीवन सत्य के साथ प्रयोग करने मे समर्पित कर दिया और उनके सभी कार्यों का लक्ष्य केवल सत्य ही रहता था । केवल गांधी ही नहीं हमारे सबके ह्रदय मे सत्य की खोज करने की लालसा है । इसका कारण यह है कि सत्य न केवल स सुन्दर है, परन्तु सर्वशक्तिमान, सर्व प्रसिद्ध और सर्वज्ञान का भण्डार हूँ। हम सब सत्य के सौन्दर्य द्वारा आकर्षित होते है, परन्तु हमे अनादि काल से असत्य से प्रेम रहा है। अतः हमे असत्य ही सत्य सा प्रतीत होता है । इसलिये सांसारिक लोगों के लिये ' सत्य ' और सौन्दर्य अनुरूप शब्द नही है ।

एक बार एक सुन्दर पुरुष को एक सन्त स्वभाव की सुन्दर युवती से प्रेम हो गया। इस लडकी को उस युवक की कामुक हरकते बिलकुल पसन्द नहीं आयी। किन्तु वह युवा पुरुष उसे पाने की इच्छा के कारण हठ पर अडा रहा । तब उस युवतीने कुछ दिनो बाद मिलने का वादा किया। उस युवती ने परम सत्य और यथार्थं सुन्दरता दिखाने के लिवे एक अत्याधिक शिक्षाप्रद विधि का सहारा लिया। उसने उदर स्वच्छ करने की अधिक मात्रा मे ओधियाँ ले लीं, और सात दिन तक उस लडकी को दस्त और उल्टियाँ होती रही । तथाकथित सुन्दर युवती दुबली पतली होकर हड्डिओं का ढाँचा मात्र रह गई । उसका रंग काला पड गया, और उसके सुन्दर नेत्र गढे मे ढँस गए । निश्चित समय वह युवक सज-धजकर उपस्थित हुआ । और उसने प्रतिक्षा करती हुई कुरुप लडकी से पूछा कि जिस सुन्दरी से उसका मिलन होना था वह कहाँ है ? वह उस युवती कों देखकर पहचान ही नही सका कि यह वही सुन्दरी है । जिसकी वह कामना कर रहा था । उस युवतीनें बार-बार अपने पहचान पर बल दिया, परंतु उसकी दयनीय दशा के कारण वह उसे पहचान न सका। अन्त मे उस लडकी ने युवक से कहा कि उसने अपने सुन्दरता के अंगों को अलग करके वर्तनों मे एकत्र कर लिया हैं । जब उस लम्पट पुरुष नें सुन्दरता के उन रसों को देखना चाहा तब युवती उसे वहाँ ले गयी । इस प्रकार द्रवित सौन्दर्य ' की सारी कथा युवक को पता चल गयी। उस सन्त स्वभाववाली युवती की कृपा से वह युवक छाया और तत्व जानने में समर्थ हो सका । उस युवक की स्थिति हम सभी लोंगों के समान ही है, जो ऊपर ही उपर प्राकृत सौदर्य से आकर्षित होते है । ऊपर वर्णन की गयी युवती सुन्दर थी । परंतु शरीर और मन से अलग-अलग थी । उसकी सुन्दरता पर आकर्षिक होने वाला प्रेमी भी एक आत्मा था । परंतु भौतिक सौन्दर्य के अज्ञान में डुबा हुआ था । आत्मा से हम अपरिचित है जो एक ही साथ सत्य और सुन्दर हैं किंतु वास्तविक सत्य स्थायीरुप से सुन्दर है, ओर असंख्य वर्षो तक उसकी सुन्दरता का वही स्तर रहता है । बना किंतु उसके साथ सत्य हो तो वह बहुमुल्य बन जाता हैं । की सुन्दरता अविनाशी है । तदापि सत्य साहित्य अथवा काव्य किसी बुद्धिमानी व्यक्ति द्वारा ही क्यो रचित हो यदि उसमे सत्य और सौन्दर्य न हो तो वह निरस हो जायेंगा। सत्य एवं सौन्दर्य एक ही हैं । सत्य और सौन्दर्य एक दुसरे का रुप है । सत्य एवम् सौन्दर्यं चिरंतन रहेगा ।

# क्या नर नारी समान हैं !

– समिक्षा खुंटे
प्रथम वर्ष बी.एड.

गृहस्थ जीवन भी एक गाडी है जिम के नर और नारी दो चक्र है । इन दोनों चक्रों कों जब तक उस गाडी के योग्य बैठाने के लिए पूर्णतया प्रयत्न नही किया जाएगा । गाडी का चलना असम्भव हो जाएगा। चाहे मार्ग सरल ही क्यों न हो हो ! यदि क पहिया बडा हैं तो दुसरा छोटा। एक पहिया मार्ग पर फिसलने के लिए सुडोल तथा वर्तुलाकार बन गया है किंतु दूसरा कही चपटा, कही बेडोल ही बन गया है बेचारा बैल या घोडा प्रयत्न करने पर भी उसे खीच नही पा रहे हैं । मार्ग पर पथिक उस दृश्य को देखकर चालक पर तो हँस ही रहे है अपितु उन रथ चक्रो पर भी व्यंग-बाण कस रहे है । वीणा के तार वीणा के उपर लगे हुए है किंतु उन चक्रों की भाति वे भी विषमावस्था के परिचायक हैं । फिर गायक स्वरोंका सामान्य न होनें से स्वर कहाँ जा रहा है तो अलाप किस और दोष इन दोनों मे किस का है ? चालक का या गायक का !

नर नारी रुपी ये दोनों चक्र उस गाडी के लिए प्रमाणित न होने से हमारे आदर्शरूपी चालक उनको चलाने मे अपनी असमर्थता प्रकट कर रहा है । परिचित-अपरिचित मानव उसे देखकर न केवल उपहास कर रहे है वरन् चालक पर बहुत अधिक व्यंग-बाण कस रहे है जिस के परिणाम स्वरुप हताश और निराश होकर चालक एक ओर खडा हो जाता है ।

यदि नर नारी मे भेद-बुद्धि न हो तो गृहस्थजीवन मे सुख-शांति प्राप्त होने से सांसारिक जीवन सुंदर बन सकता है क्यों कि देह भिन्न हैं किन्तु उनकी भेद- बुद्धि एक है। प्रकृति मानव का यह साम्य गाडी के चक्रो की समानता का संकेत है जो एक की अपूर्णता पर दूसरा भी अपूर्ण है । पतिव्रता स्त्री अपनी देह, प्राण तथा आत्मा को संसार के अन्य पदार्थों से दूर रखकर पति मे लीन होकर पूर्णताको प्राप्त कर सकती है।

नर नारी समान है सम्भव नही । संसार को कोई भी वस्तु समान नही है । खुदानें जिस प्रकार पृथ्वी और आकाश बनाया है इसी प्रकार नर और नारी । पृथ्वी और आकाश की तरह ही नर नारी भी अपनी बिम्ब योजनासे रहते है और वे बराबर अपने कार्य करते रहते है ।

खुदाने अलग-अलग रुप के मानव बनाए है क्योंकि जिस जगह नर कमजोर होता है वहां नारी उसकी शक्ति बन जातीं है । अर्थात नारी नर की कठिनाईयों मे अच्छेप्रस्तुत कर सहारा देती है । कई जगह नारी बिल्कुल भोली-भाली और शर्मिली होती हैं और उस का पति चतुर और समझदार होता है । इस प्रकार दोनों एक दूसरे की सहायता करके आनंदित जीवन व्यतीत करते है किंतु जहाँ दोनों समान रुप मे होते है वहाँ झगडा, जलन, द्वेष पैदा हो जाते है और ’ तुम से मैं क्या कम हूँ ? यह स्थिति निर्माण हो जाती है और जीवन भविष्य मे नरक बन जाता है ।

नारी का कार्य हैं घर सम्भालना तो नर का कार्य है, घर की आवश्यकताओ को पूरा करना। एक को पति के घर और उस के बच्चो की देख-भाल करना होती है तो दुसरे को पत्नी और बच्चो की आवश्यकताओं को पूरा करनेका कर्तव्य दिया गया है ।

नर कीं शारीरीक बनावट अलग है तो नारी की अलग । उसी प्रकार उनकी त्याग-भावना विभिन्न होती है । नारी मे त्याग-भावना का साहस नर से अधिक होता है । यदि नर के सामान नारी हो जाए तो नारी पुछ बैठेगी कि – मै उनके कौन सी योग्यता मे कम हूँ? फिर मुझ को घर मे बांधकर रखने का उनको क्या अधिकार है ? ’ बस ! नारी भाव कीं सत्ता इसी से नष्ट हो जाती है । नही तो नर से ज्यादा अधिक नारी मे त्याग भावना का साहस होता है ।

# राष्ट्रीय एकात्मता- काळाची गरज

– रोहिणी भास्कर तायडे
प्रथम वर्ष बी.एड.

हिमालय इसका सर है।
गौरीहर इसका शिखा है।
पंजाब और बंगाल इसके दो विशाल कंधे है।
सागर इसके चरण छुता है,
यह वीरों की भूमी है, यह शुरों की भूमी है,
यह साधुओं की भूमी है,
यह सन्यासीओंकी भूमी है,
या सेनापतीयों की भूमी है,
मैं जिऊँगा तो इसके लिए और
मरूंगा तो इसके लिए्।

– अटल बिहारी वाजपेयी

वरील अटल बिहारी वाजयेयी यांचे हे वाक्य कानावर मन अस्वस्थ होते. सर्व चर्चा, परिसंवाद ह्यांच्या माध्यमातून तसेच प्रसार माध्यमातून व्यक्तींच्या मनावर हे ठसविण्याचा प्रयत्न केला जातो. की, आज देशामध्ये राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता आहे. कारण लोकांमध्ये एकात्मता असण्सावरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. कोणत्याही राष्ट्राचे सामर्थ्य हे त्या राष्ट्राची आर्थिक प्रगती, राजकीय स्थैय, संरक्षण क्षमता व संस्कृतिक प्रगतीवर अवलंबून असते. एकात्मतेशिवाय देशात जर स्थैर्य नसेल, कायम संरक्षण विरहीत वातावरणाचा लोकांना सामना करावा लागत असेल तर समाजात अस्थिरता वाढते वही वाढती अस्थिरता लोकांच्या जीवन जगण्याच्या प्रक्रियेत बाधा बनून जाते. सर्वच देशांमध्ये लोकांत एकात्मतेची भावना निर्माण करण्यावर जोर दिला जातो.

भारतात प्राचीन काळापासून एकात्मतेची भावना – जोपासण्यावर भर दिला गेलेला आहे. वेगवेगळ्या संतानी विषमता दूर करून सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला अनेक समाजसुधारकांनी आपापल्या पध्दतीने देशातील लोकांमध्ये समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजही वेगवेगळ्या माध्यमातून एकात्मतेची भावना जोपासण्याचा प्रयत्न समाज सुधारक व राजकारणी लोक यांच्या माध्यमातून केला जातो.

भारतासारख्या विशाल देशात अनेक धर्म, पंथ, जातीवंशाचे लोक राहतात. त्यांच्यात परस्परांमध्ये, सलोख्याची, बंधुत्वाची आपुलकीची भावना असणे अत्यंत आवश्यक आहे. नव्हे त्या भावनपेवरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. आज लोकांच्या जैविक व जीवनशैलीमध्ये अंतर आहे. त्यामुळे लोकांमध्ये सजातीयतेची जाणीव निर्माण होऊन ती जाणीव वाढविण्यामध्ये अनेक अडथळे येतात. त्यात आजच्या समाजातील जवळपास सर्वच व्यक्ती व्यक्तीवाद झाल्यामुळे स्वत:चाच विचार करतात. स्वत:ला न्याय देतांना इतरांवर अन्याय होईल अशी वर्तणूक करतात. याचा विपरित परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होतो. सामाजिक व्यवस्थेत काही प्रमाणात का होईना परंतु एकसंघता असणे जरूरीचे आहे. पर्यायाने आज विविधता असल्यामुळेच ही विविधता कायम राखूनही लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता कशी निर्माण करता येईल. हीच देशापुढील महत्वाची समस्या असलेली दिसून येते.

आज देशातील वर्तमान परिस्थिती भयानक आहे. सार्वजनिक दहशतीची भावना सर्वत्र निर्माण झालेली आहे. केंद्रात स्थिर सरकार नसल्यामुळे कायदाव सुव्यवस्था ह्या गोष्टी चेष्टेचा विषय बनलेला आहे. हे असेच चालत राहिले तर बळी तो कान पिळी अशी आदिम समाजाची अवस्था निर्माण व्हावयास फारसा वेळ लागणार नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून आज ५५ वर्षे होऊन गेल्यानंतरही देशात अराजकता माजलेली दिसून येते. देशभर दहशतीचे वातावरण निर्माण झालेले दिसून येते. सुरच्तिता हा घटक नावालाही शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे ह्याच अस्थिर कालखंडात एकात्मतेच्या भावनेचे महत्व लोकांच्या मनावर ठसविले गेले तरच देश अखंड राहील वजर अखंड राहिला तर बाहेरच्या पाडता येणे शक्य होणार नाही.

आज देशात राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या मार्गात अनेक प्रमुख अडथळे बनुन राहीलेले आहेत. त्यात देशाची फाळणीच मुळात संप्रदायवादाच्या आधारावर १९४७ मध्ये भारत व पाकिस्तान हे दोन वेगळे देश निर्माण झाले व तेथूनच देशाचे अखंडत्व धोक्यात आले. तसेच स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत हिंदू-मुस्लीम, हिंदु

शिख असे अनेक दंगे होत आहेत. भारत देशात हिंदु, खिश्चन, मुस्लीम, शिख, पारशी, बौध्द, जैन इ. अनेक धर्माचे लोक राहतात. त्यांचे धार्मिक नेतेही असतात. हे नेते स्वत:चा धर्म श्रेष्ठ ठरविण्याच्या प्रयत्नात इतरांच्या धर्माला कनिष्ठ लेखतात. त्यामुळे धार्मिक दंगलींना आज उत्तेजन मिळत आहे. आज धर्माचा वापर धर्म कारण समाजकारण व राजकारण अशा वेगवेगळ्या घटकांसाठी वापरला जातो. असंख्य जाती व उपजातीमध्ये या देशातील जनता विभागली गेली आहे. स्वजाती श्रेष्ठतावादाच्या भावना आज भारतीय समाजातील व्यक्तींमध्ये प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळे जातीय दंगलींना मोठ्या प्रमाणात उत्तेजन मिळत आहे. जोपर्यंत लोकांमध्ये जातीय भावना कायम आहे. तो पर्यंत राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करणेही दूर आहे. भाषावादातून हिंदी मराठी, हिंदी-इंग्रजी हे वाद सुरू आहेत. देशाच्या घटनेनुसार हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून स्विकार केला गेलेला आहे. परंतु दक्षिणेकडील राज्ये हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देत नाहीत. तो पर्यंत भाषिक वाद सुरू राहतील.

काश्मीर, आसाम, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश इत्यादी अनेक राज्यांवर दहशतवादी शक्तींनी उदंड माजविलेला आहे. दहशतवादी लोक सामान्य जनतेला या सरकारला हिंसेची धमकी, हिंसेची कृती किंवा योजनाबध्द प्रचार करतात. दहशतवादी संघटना आपली उद्दीष्टे साध्य करण्यासाठी देशातील एकात्मला दुर करण्याचा प्रयत्न करतात. यात राजकीय पक्ष दहशतवादी संघटनांना आश्रय देतात. त्यामुळे सामान्य माणसांचा देशातील कायदा आणि सुव्यवस्थे वरचा विश्वास उडालेला आहे. तसेच मुक्त भांडवलशाही धोरणाचा भारताने स्वीकार केल्यामुळे पराकोटीची आर्थिक विषमता भारतीय समाजामध्ये असलेली दिसून येते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे श्रीमंत हा अधिक श्रीमंत तर गरीब हा गरीब होत चाललेला आहे. भारतामध्ये विविध राजकिय पक्ष हे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण करण्याची भूमिका करताना दिसत आहे. लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांमध्ये जी खिलाडू वृत्ती लागते तिचा अभाव आजही आपल्या देशामध्ये दिसून येतो.

राष्ट्रभावनेचे संस्कार लोकांच्या मनावर होणे गरजेचे आहे. शिक्षणाद्वारे उच्च मूल्यांचे संस्कार जसे की समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, मानवता, धर्मनिरपेक्षता होणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रति निष्ठा, प्रेम निर्माण होईल असा कार्यक्रम निश्चित करून तो लोकांसमोर सतत ठेवला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणे ही आजच्या काळाची गरज आहे.

# माणसाचे मन हा आनंदाचा डोह

**- हर्षदा अशोक पाटील**
प्रथम वर्ष बी.एड.

भारतीय संस्कृती सांगते, की जगाचे मुळ आनंदात आहे. आनंदा ज्जायते लोक। असे प्राचिन काव्यात म्हणतात. बालकवी म्हणतात.

आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे ।

वरती खाली मोद भरे, वायुसंगे मोद फिरे ।। दाही दिशा आनंदाने भरलेल्या आहेत. वारा जेथे, तेथे वाहतो, तेथे सोबतीला आनंद असतो जग आनंदमय आहे. म्हणुनच माणूस आनंदाचेच मूर्तरूप आहे. माणसाचे मन हा आनंदाचा डोह आहे. त्याच आनंदाचेच तरंग उठतात. आनंदाची अंगोपांगे आनंदच आहेत. हा आनंद केवळ आनंद आहे.

आनंदाचे डोही आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचे ।। असे असतांना माणूस मनात दु:खी कष्टी का ? माणसाचे मन निराशेने, वैफल्याने ग्रासलेले का? यमुनेच्या काठी गोकुळाची वस्ती होती. दूध, दही, लोणी आनंदाच्याखाणी कधी कुणाच्याना दु:ख मनी आता गोप गोपिका यमुनेवर पाणी भरायला गेल्या की प्राणाशीच गाठ पडायची त्यांची कारण यमुनेच्या डोहात आता वसतीला आला होता कलिया भयंकर विषारी नाम.

मित्र हो, यमुनेच्या डोहात एकच कालिया नाग

होता, पण माणसाच्या आनंदाच्या डोहात सहा नाग शिरले आहेत. सारखे फुत्कार सोडताहेत ते जहरी. आनंदाचा डोह विषारी झाला पूर्ण ते सहा नाग आहेत काम, क्रोध, मद, मोह, लोभ आणि मत्सर त्यांचे सतत दंश होतात मनाला. मन घायाळ होते मग. मन आनंद हा केवळ आनंद कसा राहणार ? तो होतो आहे शबलित. उठताहेत मन दुःखाचे, शोकाचे वैफल्याचे नैराश्याचे तरंग.

धम्मपद सांगते, जीवनसहितेत माणसा तुझी नौकेतले शिरलेले राग द्वेषाचे नौका डूबवणारे पाणी तुला काढून फेकले पाहिजे. नौका हलकी केली पाहिजे. एकदा देवदत्ताला देव पावला देव म्हणाला, तुला हवे ते मागत जा, तात्काळ मिळेल. हा हों त्यासाठी मणी देवदत्ताने मण्याला आज्ञा केली. सुरेख टुमदार एकमजली घर तयार झाले, पण त्याच वेळी शेजारी तसेच टुमदार पण दुमजली घर झाले.देवदत्ताला त्याचा हेवा वाटू लागला. दुःख होऊ लागले. मग कळले, की देवाने शेजाऱ्याला वर दिला आहे की देवदत्ताला जे मिळेल ते तुला दुप्पट लाभेल. देवदत्ताला राग आला, असे आहे काय ? तो म्हणला माझा एक डोळा फुटू दे आणि मनाशी दुष्टासारखा हसला, की आता शेजाऱ्याचे दोन्ही डोळे फुटतील. पण आसुरी सुख देवदत्ताला मिळाले नाही. कारण शेजारी आधीच आंधळाच होता.

माणसा, आपले शत्रु बाहेर नाहीत. आपल्या आतच आहेत.

# Rules of Living

**- Sarika Prakash Koli**
F.Y.B.Ed

Never put off till tomorrow what you beeping
can do today.

Never trouble someone for what you
can do yourself.

Never spend money on what is not
necessary.

Never waste your time, for it will
not come again.

Never put on the clothes that would
please you but not others.

Never do anything what you won't
like other's to do.

# Money Can Buy

- **Sarika Prakash Koli**
F.Y.B.Ed

A bed but not sleep
A house but not home

Finery but not beauty
Food but not appetite

Luxury but not culture
Pleasure but not peace

Religion but not solution
Service but not love

A temple but not god
A body but not soul

Books but not knowledge
Medicine but not health
Everything but not something.

# Can computer replace the school Teacher

- **Sarika Prakash Koli**
F.Y.B.Ed

In the 20th century computers has been spread like a fire in the forest, in the forest of technology, innovation & technique.

Though it is true that a computer is a very good for studies yet it can, never take the place of a real teacher. A computer has no brain, no logic & no knowledge. It just works by the set of instructions given by the user. Though it can provide answer to many things but no one can deny the superiority of human mind, only a live teacher could do that it cannot answer to logical reasoning questions nor could it held the students in distress. It has no feelings. One of the most draw backs of the computer in its way of teaching that it cannot make the child a well-disciplined, moralistic & a thoughtful one. It just cannot comment a student to do his regular homework on the machine. The child can just shut down the machine & ignore it. But no, that is not the case with a real teacher. The human mind, as it is said is above all these no one, can compete with it. The teacher shows a student the right path gives him moral values & teaches him to be disciplined. Thus a computer cannot replace the teacher.

# Carving - A type of mental pollution

**- Patil Gayatri Yuvraj**
F.Y.B.Ed

Everything has two sides-negative and positive sides. Negative side is always destructive and positive side is always constructive. Same is the case in thinking, every man thinks negatively and positively. Everything on which man thinks negatively, of course its product is useless and destructive. If man thinks positively about the same situation its product would be constructive. Nothing is totally good or bad but it depends on the thinking of a man. Secondly the in tension is the most important thing to determine good or bad. So power of thinking and intention should never be polluted.

No man is totally good or bad right from his birth. He is innocent minded just as a child. But the surrounding (Society) effect on him/her. If surrounding is sophisticated, of course he/she should be well-mannered, welcultured nad if surrounding(Society) is shabby, uncultured this product is certainly bad. GUNDA'S, MAVALI are ex ample of it.

For example- A sculptor society, as a result he makes good images of Gods and Goddess. He devotes him self to his job. Or the other hand if theybelongs to the uncultured family or society he does not interested to do anu job, though he has gifted with the art of carving. carving is not a bad business. It is very much profitable. In history we saw so many great carvers who has had well name and fame. Carvers has always in a good thinking through his whole life, because good thinking takes man on the mountain of popularity.

Same in the case about college student. They have also good art of Carving. They curve so many pictures on the walls of classrooms as well as trees and etc. But it is not a field of carving at all. I would like to suggest them that they give right direction to their in tension, but it is fading (decaying) in our student. They have a good art of carving but if their intention is wrong direction/bad that time their all became destructive and dangerous. Many student of every colleges having negative. Intention about carving, they carve so many bad things which cannot notable here. But you can read in anywhere, also.

There is no doubt about our college that how superior our college is! our college was superior is superior but I can't say about will(future). Because out of 50%, 65% students have Negative thinking and 35% students have positive thinking. It is a survey of my four years' experience of college. We saw students going towards reading hall. First we think that what a studious students they are. But they aren't studious, they are foolish carver, same in the case in classroom and every common place in India.

Though there are three types of pollution, which effects on human body to a large orient. To my mind carving meaning Lesley is also fourth type of pollution which directly effect on mind. It pollutes human mind and if mind becomes polluted certainly earth be distorted. And so carving with a bad intention is very dangerous to our chastity and our Indian culture. So as early as possible we must tree ourselves from the device of carving. After that no one can restrict (stop) our college from having 'Five star College' grade. Thirdly student's complaint that our college girls have no serve of friendship or platonic love ship. But students (boys) cannot think that why they(girls) behave in this way. The only reason is our totally wrong method to express our friendship or love ship, by carving letter like matter on walls or blackboard, by the

name of any girl that by my friend! or beloved. If you cannot stop you carving or writings on walls and blackboard, you will be de proved from red friend/lover/beloved. So please stop carving in college and any places in India. Because it tortures to girls as well as some well manner per sons. In real sense students have no sense about great love or friendship. Carving disturbs our mind which is the real source of thinking.

Therefore, I again request to all of you to stop carving as early as possible. Because it is a long of mental dis ease don't forget it.

# हिन्दी भाषा और राष्ट्रीय एकीकरण

**– हिरामण बाबुराव पाटील**
प्रथम वर्ष बी.एड.

हिन्दी अर्थात सच्चे हिंदूत्व का प्रतिनिधीत्व करनेवाली एवंम देश की आस्मिता का प्रतीक माने जानेवाली भाषा। लेकिन आज भारतवर्ष के किसी एक इलाके में जाइऐ और पूछिये की, हमारी राष्ट्रभाषा कौनसी है ? तब ऐसे-ऐसे जवाब आ सकते है जिससे हमारे देश की अस्मिता का अस्तित्व क्या है ? और बाद में उसका प्रतीक यह भाषा हो सकती है या नही इसका पता चल सकेंगा। आज भारतवर्ष में कितने राज्य है लेकिन उन राज्यों में कुछ अपवाद छोडते हुए बाकी राज्य में हिन्दी का उपयोग बडी कम मात्रा में किया जाता है।

हिन्दी को राष्ट्रीय भाषा के रूप में दर्जा देने के लिए कितने भारतवासियों ने अथक परिश्रम किये। भारतेन्दू से लेकर दिनकर एवं म. गांधी तक ने हिन्दी के राष्ट्रीय महत्व, उसके देशव्यापी प्रचलन एवंम राष्ट्र को एकता के एकसूत्र बंधन में बाँधनेवाली इस भाषा का निरन्तर बखान करने में कोई कसर नही छोडी। उस वक्त विनोबाजी भावे ने कहा था कि, राष्ट्रीय एकता के लिए सबसे अधिक आवश्यक अगर है तो वह एक भाषा और लिपी है। तब तय हुआ की भाषा में हिन्दी ही भाषा ऐसी है, जिसे सबसे अधिक जनमत जाहीर हुआ था और लिपी में देवनागरी को ऊँचा उठाया गया । इसीलिए संयोगवश हिन्दी भाषा को उसी लिपी में लिखना जारी किया गया। गांधीजीने भी कहा की, राष्ट्रभाषा का प्रयोग न करना राष्ट्र की हत्या करने बराबर है। राष्ट्रसेवा के लिए राष्ट्रभाषा का प्रयोग करना चाहिए। इसीलिए स्वतंत्रता कालखंड में आझादी संबंधी कई वैचारिक लेख जैसे की, हरिजन साप्ताहीक यह एक हिन्दी साप्ताहीक में प्रकट किये गये क्यो की, हिन्दी को समझनेवाला भारतवर्ष में जनसमुदाय अधिक था।

सर्वसाधारणतः हिन्दी की तीन स्थितियाँ मानी जाती है, जिसके आधार पर हम यह कह सकते है कि, हिन्दी ही अपने भारतवर्ष में कायम एकना बनाये रख सकती है।प्रथमत: वह एक 'मातृभाषा' का हक सिद्ध करती है क्यों की, आज भारतवर्ष के किसी भी बालक को बिना प्रयास किये प्रकृति के नुसार खुद सिखना आ सकता है। आज हिन्दी कई रूपों में मातृभाषा बनी है, जैसे अवधी, ब्रज, बुंदेली, हरियाणवी। दुसरी स्थिती देखी जाए तो वह एक राजभाषा है, क्यो कि, स्वतंत्रता मिलते ही महान पुरुषों के प्रयत्न स्वरूप संविधान अनुच्छेद ३४३ के अनुसार हिन्दी को कार्यालयीन कामकाजों में प्रयोग करना अनिवार्य बनाया गया । और तिसरी स्थिती 'संपर्कभाषा' के नाम से प्रचलित है क्यो कि, इस भाषा अर्थात हिन्दी द्वारा ही एक भारतीय दूसरे भारतीय से संपर्क कर सकता है। एक के भावो को संप्रेषित कर दूसरों के भावों को समझते हुए उसका प्रत्युत्तर देना हिन्दी द्वारा ही सम्भव हो सकता है।

'हिन्दुस्थान की तृती' कहलानेवाले अमीर खुसरो ने आज की खडी बोली हिन्दी का सबसे पहला रूप बनाया जो 'हिन्दवी' या 'हिन्दुई' कहलाती है। अर्थात हिन्द राष्ट्र की भाषा हिन्दी ।

महाकवि जायसी ने भी इस भाषा हिन्दी की प्रशंसा करते हुए कहा की,

तुरकी, अरबी, हिन्दुई, भाषा जेति आहि ।
जेहि मँह मारग प्रेम का, सबै सराहे ताहि ।

डॉ. लोहीयाजी ने हिन्दी को लेकर कई आन्दोलन छेडे उसे भुलाया नही जा सकता। उन्होंने हिन्दी के समृद्धी के बारे में कहा है की, हिन्दी में सात लाख के करीब शब्द है, जबकि अंग्रेजी में केवल ढाई लाख शब्द संख्या है।

भारतवर्ष की एकात्मता साधने हेतु हिन्दी का
साहित्य भी बहुत प्रभावशाली रहा है।

महादेवी वर्मा, सुर्यकांत त्रिपाठी, जयशंकर, हरिवंशराय, प्रेमचंद आदि साहित्यकारो ने अपने प्रतिभा के बल पर साहित्य रचकर हिन्दी साहित्य भी किसी से कम नहीं यह सिद्ध कर दिया। आज के वैज्ञानिक तथा तकनीकी युग में भारतीय एकात्मता तथा समाजजीवन दर्शानेवाले ग्रंथ हिन्दी में लिखे गये है। प्रेमचंदजीने 'गोदान', 'कफन' इ. प्रसिध्द साहित्य कृति कर राष्ट्रीय जागरण का महान संदेश भारतवर्ष को दिया। उनके साहित्य में देशप्रेम के आदर्शों की झलक है । उनकी कलम सदा भारतवर्ष के हिन्दू-मुसलमानों की एकता के लिए हमेशा प्रयत्नरत रहेगी। भारतवर्ष में व्याप्त जाति पाति या ऊँच-नीच के भेदभाव, प्रान्तीयता आदि सामाजिक बुराइयो को दूर करने की इच्छा एवं कौशिश उनके साहित्य में रही है। कबीरदास जी के दोहे हिन्दी भाषा के ही एक रूप अवधी एवं ब्रज में लिखे गये, जिससें हिन्दु-मुस्लिम एकता सिद्ध कर कबीरदास को राष्ट्रसंत साहित्यीक सिद्ध कर दिया।

हमारे सरकारने १४ सितंम्बर यह दिन हिन्दी दिवस के रूप में मनाए जाने की घोषणा की क्यों की, उसी दिन हिन्दी को राष्ट्रभाषा का दर्जा मिला। इसी लिए हमें अपने हिन्दी को ऊँचा स्थान दिलाने हेतु प्रयत्न करना चाहीए। हिन्दी के कारण लोगों में विचारों का आदान-प्रदान होते हुए उनमें देश के प्रति बंधुभाव, प्रेम, आदर उत्पन्न होता है वह केवल हिन्दी के ही कारण ।

जिस दिन भारत का प्रत्येक नागरीक अपने दैनंदिन व्यवहार में हिन्दी का प्रयोग करते हुए गर्व का अनुभव करने लगेगा उस दिन राष्ट्रभाषा का अर्थ स्वत: स्पष्ट हो जाएगा और फिर हमें बारबार प्रचार करने की जरूरत नही होगी की, हिन्दी हमारी राष्ट्रभाषा है और उसी के कारण हम हिन्दवासी है।

जय हिन्द - जय हिन्दी
सम्मान ये अपने देश का है।
उत्थान ये अपने देश का है।
जिसमें समता-ममता रमती,
कल्याण ये अपने देश का करती।
उत्तर-दक्षिण, पुरब पश्चिम
जिसकी लौ से जुडता जाऐ,
हिन्दी का दिया जलता आऐ ।

# भारताची अधोगतीकडे वाटचाल !

**- रोहिणी भास्कर तायडे**
प्रथम वर्ष बी.एड.

एखाद्या गोष्टीचे यथार्थ किंवा वस्तुनिष्ठपणे मुल्यमापन जर करायचे असेल तर त्या गोष्टीच्या बाह्यरंग, रूप आकार यावरून कधीच करता येत नाही. तसा प्रयत्न केला तर हाती येणारा निष्कर्ष हमखास चुकू शकतो. उदा. एखादे बी सकस आहे की निकस आहे हे ते बी हातात घेऊन कळत नाही तर ते त्या बी पासून तयार होणाऱ्या रोपाच्या गुणांवरून सांगता येईल अगदी साधी गोष्ट आहे, आश्या किंवा आपले प्रतिबिंब दाखविणारी कोणतीच गोष्ट अथवा वस्तू अस्तीत्वात नसती तर आपण कसे दिसतो हे आपल्याला कळले नसते. हे जाणून घ्यायचे असेल तर माध्यम मात्र बाहेरचं लागतं. जोपर्यंत आपले प्रतिबिंब आरशात उमटत नाही तो पर्यंत आपण कसे दिसतो हे आपल्याला कळत नाही. सांगायचे तात्पर्य आपण जेव्हा एखादा दावा करतो तेव्हा त्या दाव्यातील तथ्य ज्यातून प्रकट होते, त्या दाव्यातील घटनाच त्या दाव्याला प्रमाणित करू शकतात. आपण खूप सुंदर आहोत असा दावा आपण केला तरी आरशात पडणारे प्रतिबिंब काही वेगळेच सांगत असेल तर आपला दावा खोटा ठरतो. अगदी असेच

आपल्या देशाच्या बाबतीत घडत आहे.

आजच्या काळात सत्ताधारी लोक, राजकारणी लोक बेंबीच्या देठापासून देशाच्या विकासाच्या आरोळ्या ठोकतांना दिसतात. आपला देश विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. असे सांगून हे लोक सामान्य जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे राजकारणी लोक केवळ स्वत:च्या हितासाठी, स्वार्थासाठी सत्ताप्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि देशाची संपत्ती स्वत:च्या - घशात घालत आहेत. भ्रष्टाचार हा रोग दिवसेंदिवस आपल्या देशात वाढत आहेत. भ्रष्टाचाराचं पिक फार मोठ्याप्रमाणात पिकत आहे. 'पैसा खुदा तो नही, मगर खुदासे कम भी नही' असे म्हणणारे नेते आपल्या दृष्टीसमोर येत आहेत. लालुप्रसाद यादव, जुदेव, हर्षद मेहता, राबडी देवी, पोलीस आयुक्त, तेलगी यांनी तर देशाला वेशीवर टांगलेले दिसत. तेलगीने तर देशाचे तेल काढले आहे. कोट्यावधी रूपयांची संपत्ती प्राप्त करून ऐशआरामात जीवन जगत आहेत. यामुळे देशात बेकारी वाढत आहे. देशातील प्रत्येक क्षेत्र भ्रष्टाचाराने पोखरून निघालेले दिसत आहे. कित्येक मंत्री, अधिकारी देशाची संपत्ती अवैध मार्गाने मिळवित आहेत. अशा देशद्रोह्यांना शासन का केले जात नाही ? याला जबाबदार कोण आहे? याचा विचार मात्र कुणीच करीत नाही.

जगाच्या इतिहासात सर्वश्रेष्ठ समजली जाणारी भारतीय संस्कृती लोप पावत चालली आहे. दिवसेंदिवस पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करणे वाढत आहे. नैतिक मुल्यांचा लोप होत आहे. आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, ओरिसा, केरळ एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातून देखील परदेशामध्ये मुलींची विक्री होत आहे. पूर्वी पूर्ण वस्त्रामध्ये राहणारी स्त्री ही आज अर्धवस्त्रामध्ये राहू लागली. यामुळे बलात्कार, खून यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. हे असं का घडते ? याचा विचार मात्र कुणीच करीत नाही. स्त्रियांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. काही स्त्रयांना हुंयापायी आपल्या प्राणाला मुकावे लागत आहे ? तीला रॉकेल टाकून जाळण्यात येते. समाजातीला मानाने जगू देत नाही. कित्येक स्त्रियांना अत्याचारापायी आत्महत्या करावी लागत आहेत. हे असं का घडते ? याचा विचार मात्र कुणीच करत नाही. अनिष्ट रूढीं विरूध्द कायदे असूनही ते अंमलात आणले जात नाहीत. हे कायदे केवळ कागदावरच राहिलेले आहेत. अजून सुध्दा आपला देश हा अंधश्रध्देने बरबटलेला आहे. धनप्राप्तीच्या लोभापायी कित्येक निष्पाप बालकांचा बळी दिला जातो. ढोंगी साधूंचे प्रमाण वाढत आहे. हे साधूलोक समाजाची दिशाभूल करीत आहेत. खरोखरच आपला देश विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे का ? याची कल्पना आपल्याला येते.

सध्याच्या परिस्थितीमध्ये सकाळी घराबाहेर पडलेला व्यक्ति संध्याकाळ पर्यंत सुखरूप परत येईल की नाही याची हमी देता येत नाही. दिवसेंदिवस बॉम्ब स्फोटाच्या घटना वाढत आहेत. याची इतकी दहशत निर्माण झाली आहे. की जीवन जगणे देखील कठिण होऊन बसले आहे. या बॉम्बस्फोटांमध्ये मरणारे आपल्या सारखे सर्वसामान्य लोक पोटाची खडगी भरणारे, भिक मागणारे लोक ! यामध्ये एखादा नेता मरण पावला असे आपण कधी ऐकले तरी का? नाही ना! मग हे बॉम्बस्फोट कोण घडवून आणतं ? या बॉम्बस्फ टामध्ये कोणाचा हात आहे ? याचा विचार मात्र कुणीच करत नाही. प्रत्येक दिवस, प्रत्येक वर्ष हे दुष्काळासारखे वाटत आहे. निसर्गाची अवकृपा होत आहे. यामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण, आर्थिक असमानता दिवसेंदिवस वाढत आहे. श्रीमंत हा अधिक श्रीमंत तर गरिब हा अधिक गरीब बनत चालला आहे. यामुळे आपल्या देशाचा विकास होईल? आपल्या देशामध्ये दिवसेंदिवस धार्मिक संघर्ष वाढतांना दिसतात. अयोध्या मुद्दाने तर संपुर्ण देशाची झोप उडवली आहे. धर्मा-धर्मामध्ये तफावत निर्माण होऊन त्यातून संघर्ष निर्माण होतांना दिसते. राजकारणी लोक केवळ स्वत:च्या स्वार्थासाठी धर्माधर्मामध्ये वैमनस्य निर्माण करीत आहेत. आणि या वैमनस्यातून निर्माण होणाऱ्या संघर्षामध्ये मारला जातो तो गरीब, निष्पाप व्यक्ति !

आजच्या शिक्षणपध्दतीचा विचार केला तर फार मोठी तफावत निर्माण झालेली दिसते. शिक्षणासाठीची प्रचंड प्रमाणात वाढणारी फी, शिक्षणक्षेत्रातील असमानता ही देशाला अधोगतीकडे नेण्यास बऱ्याच प्रमाणात कारणीभूत ठरलेली दिसते आजचे शिक्षण हे केवळ श्रीमंतांचेच झालेले आहे. गरिबांना मात्र शिक्षणापासून

वंचित राहावे लागत आहे. याला प्रमुख कारण म्हणजे पैसा ! पैशाअभावी गरिब व्यक्ती शिक्षण घेऊ शकत नाही. श्रीमंत लोक केवळ पैशाच्या जोरावर मोठमोठ्या पदव्या मिळवित आहेत. यामध्ये हुशार विद्यार्थ्यांची कुचंबना होत आहे. गरिब विद्यार्थ्याला शाळेत, महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यामुळे त्याला आत्महत्येचा मार्ग स्विकारावा लागत आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्तेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

एकंदरीत देशाच्या परिस्थितीचा विचार केला, तर आपल्याला जाणवेल की खरोखर आपला देश कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे. आज आपल्या देशातील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यामध्ये आपण अभिमानाने सांगू शकू की होय आम्ही या क्षेत्रामध्ये विकास साधला आहे. म्हणून देशाचा विकास साधायचा असेल तर नैतिक बाबी आत्मसात करून अनैतिक बाबी नष्ट केल्या पाहिजेत. आणि हे कार्य करण्याची अपेक्षा केवळ शिक्षकाकडूनच राहिलेली आहे. कारण शिक्षक का अनेक पिढ्या घडविण्याचे कार्य करीत असतो. आजच्या शिक्षकाने स्वतः नैतिक मुल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, बंधुभाव, समानता, धर्मनिरपेक्षा, स्वातंत्र्य इत्यादी मुल्ये विकसित करावी. जेणे करून भारताची अधोगतीकडे होणारी वाटचाल थांबवता येईल आणि आपल्या भारत देशाला सुजलम् सफलम बनविता येईल.

# भाषा : काल, आज, उद्या

– किशोर चव्हाण
प्रथम वर्ष बी.एड.

मित्रांनो, संयुक्त राष्ट्रांनी असा इशारा दिला आहे की, जगातील सुमारे ९०% भाषा येत्या १०० वर्षात मृत होणार असून त्यांच्या बरोबर पर्यावरण, संस्कृती व परंपरा यांचाही विनाश अटल आहे. २५०० हुनही अधिक भाषा सध्या नाश पावण्याच्या मार्गावर आहे. या भाषा नष्ट होतात तेव्हा त्याबरोबरच प्राण्यांच्या व मनुष्याच्या मुलस्थानाची कशी काळजी घ्यावी आणि जमिनीची मशागत कशी करावी या संबंधी पिढ्यानपिढ्या मौखिक रित्या सांगितलेली माहितीही नष्ट होण्याचा धोका आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाच्या या अहवालात म्हटले आहे कि जगात ५ ते ७ हजार बोली भाषा आहेत. त्यांच्या पैकी ४ ते ५ हजार देशीय भाषा आहेत. या अहवालात पुढे म्हटले आहे की किमान २३४ बोली भाषा आतापर्यंत मृत झाल्या आहे. आणि त्यांच्याबरोबर पर्यावरण आणि इतर मानवी जीवनाशी संबंधित माहितीचा अमुल्य खजिनाही काळाच्या उदरात गडप झाला आहे. निसर्गाची गुपिते स्थानिक जनतेची गीते, कथा, कला व हस्तकला यांच्यासारख्या माध्यमातुन प्रकट होतात. पण जर या बोलीभाषा नाश पावल्या तर हा अनमोल खजिनाही नष्ट होईल असा धोक्याचा इशारा संयुक्त राष्ट्रांनी केला आहे.

भारताचं उदा. द्यायचं म्हटलं तर भारतात १४ मुख्य भाषा असुन १००० पेक्षा जास्त बोलीभाषा आहे. भारतातील मुख्य भाषा या इंडो युरोपियन व द्रविडियन या भाषांशी संबंधित आहे.

त्यातल्या त्यात आपल्या खान्देशातील उदा. द्यायच झाल्यास मुख्य बोलीभाषा ही अहिराणी आहे. त्यांची शोकांतिका आपण पहातच आहोत. विद्यापीठाकडुन अहिराणी भाषेचे साहित्य गोळा केले जाते आहे. व तो सांस्कृतिक ठेवा जपण्याचा प्रयत्न काही निवडक प्राध्यापक वर्ग करीत आहे. हा सांस्कृतिक ठेवा जपण्यासाठी बोलीभाषा जिवंत ठेवणे आवश्यक आहे. त्यांना दुसऱ्या पर्याय नाही. बहिणाबाई चौधरी यांच्या भाषांतर रूपी कविता तयार करणे अशक्य स्वरूपाचे आहे. त्यात मूळ साहित्याची हानी होत असते. व पाहिजे तो आशय भाषांतरात येत नाही.

मराठीतील मुळ शब्द मंगळसुत्र यास थशशवळपस जीपराशपीं असे भाषांतर केले जाते. परंतु मंगळसुत्रातजो

गर्भित अर्थ येतो तो भाषांतरीत शब्दात दूर-दूर पर्यंतकुठेच आढळत नाही.

ठेवा जतन न करण्याचा आणखी एक मुख्य तोटा म्हणजे प्राचीन साहित्याचा अस्त इंग्रजी भाषेत त्याचप्रमाणे (कर्यु रायटिंग) आपण पाहतो त्याचप्रमाणे १३ व्या शतकात मराठी च्या सुध्दा दोन लिप्या आहे. खास करून लिखाणासाठी मोठ्या लिपीचा वापर राज्यांपासुन खेड्यापाड्यावर होत आलेला होता. त्यानंतर विसाव्या शतकानंतर काही वर्षांनी हिंदी, मल्यालम्, गुजराथी या भाषेतही मोडीचा वापर सुरू झाल्याने स्वातंत्र्य दरम्यानचा काळात यांचा वापर कमी-कमी होण्यास सुरूवात झाली. २१ व्या शतकात या लिपीबरोबर ही वाङ्:मयेही संपुष्टात येतील. १९९९ ला कर्नाटक राज्यांत दहा लाख पानांचा मोडी भाषेतील इतिहास ग्रंथ सापडला. परंतु खेदजनक बाब म्हणजे अवघ्या देशातून कोणीही याचा जाणकार पुढे आला नाही.

आज काल आपण जे English Medium पाहतोय त्यावरून आपल्या असे लक्षात येईल की प्रत्येक जण आर्थिक दृष्ट्या बळकट असलेले कुटूंब आपल्या पाल्याला English Medium मध्ये टाकण्याचा अट्टाहास करीत आहे. मी कुठल्या भाषेच्या विरूध्द नाही. मी स्वतः इंग्लीश विषय घेऊन Mastering केली आहे. परंतु समाजास हे लक्षात येत नाही की भाषा म्हणजे ज्ञान ग्रहण करण्याचे माध्यम आहे. परंतु माध्यम जितकं सोपं तितकं ज्ञान आकलन चांगल्या पध्दतीने होते. बरीचशी कुटूंबे आपण पाहतो. आपल्या मुलाला ते English Medium मधे टाकून त्यावर Rat Experiment करत असतात. Nursery to 3rd, 4th std पर्यंत त्यानंतर Study Vast होत जातो. तसेच त्या मुलालाही अडचणी येवू लागतात. व त्यांचे शेवटी नूकसान होते. पुन्हा त्याला मराठी माध्यमातुन dmission सुरूवात करावी लागते. वाट चुकल्याने तो त्यातही तितका प्रभावी नसतो.

मला या ठिकाणी इतकेच सांगावेसे वाटते की पालक फक्त Marketing Tendency ठेवून माध्यम ठरवत असतो. जितके महाग शिक्षण तितकी ते उच्च मागणी असलेली असे मानण्यात येते. परंतू शेवटी आपल्या असे लक्ष्यात येईल की तसे काहीही नसून जितक्या कमी वेळात कमी कामात व कमी खर्चाने ज्ञान प्राप्तीचे माध्यम असेल तेच आपण निवडले पाहिजे.

# हुंडा एक अनिष्ट रूढी...

**- देवश्री चंद्रकांत जंगले**
प्रथम वर्ष बी.एड.

आज आपण सर्व बी.एड.चे विद्यार्थी आहोत. जर आपण प्रत्येकाच्या शिक्षणाचा विचार केला, तर कुणाचे शिक्षण इ.., इ.डल., इ.ेा. तर कुणाचे च.., च.डल., च.ेा. काहींचे तर च.झहळश्र, झ.हव. पर्यंत सुध्दा झालेले असेल. जर या उच्च शिक्षित तरूणांना एक प्रश्न विचारला की, हुंडा घेणे शाप की वरदान ? तर या ठिकाणी मी विश्वासाने सांगेल की, या प्रश्नाचे उत्तर दोन ते तिन मिनिटे कुणीही सांगणार नाही. शाप किंवा वरदान ह्या दोन शब्दांपैकी एक शब्द सांगण्याची सुध्दा कुणाची हिंमत होणार नाही. कोणी शाप सांगेल ते पण शरमेपोटी ते ही उत्तर त्याने अंत:करणातून सांगितलेले नसेल. याचे कारण प्रत्येकाने आपापल्या मनाला विचारा.

आजच्या या २१ व्या शतकात सुध्दा एखाद्या व्यक्तीला जेव्हा तो मुलीचा बाप झाल्याची बातमी कळते, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर आनंदाच्या ऐवजी नैराश्य दिसते. याला जबाबदार ती मुलगी आहे की त्या मुलीचा बाप ? यात दोष त्या मुलीचाही नाही आणि तिच्या बापाचाही नाही, यात दोष आहे तो जुन्या विचारांनी बुरसटलेल्या समाजाचा. कारण समाजाला एडस् या महाभयंकर रोगापेक्षाही हुंडा या महाभयंकर रोगाची लागवण जास्त प्रमाणात झालेली आहे. आजही समाज हुंडा घेणे ही एक अनिष्ट रूढी आहे. हे मानन्यास तयार नाही. याला जुन्या

पिढीबरोबर नविन उच्चशिक्षित तरूण पिढीही तेवढीच कारणीभूत आहे.

हुंडा या रोगाला बळी पडतो तो सर्वसामान्य गरीब माणूस. कारण श्रीमंत किंवा ज्याची परिरिति चांगली आहे. त्याला या रोगाची झळ जाणवत नाही. पण ज्या सर्वसामान्य गरीब व्यक्तीला चार ते पाच मुली असतात त्याचे काय? त्याचा कुणी विचार करतो का ? तो या महाभयंकर रोगामुळे आयुष्यभर चिंतेत असतो. या हुंड्यासाठी स्वतः च्या पोआला चिमट्या घेऊन तो एक-एक पैसा गोळा करतो. मुलीच्या लग्नापर्यंत तो याच कामात चिंतीत होतो. शेवटी कर्जबाजारी होतो. बाप होणे या जगातील सर्वात मौल्यवान सुखाचा उपभोग सुध्दा त्याला हा समाज उपभोगू देत नाही.

या हुंड्याच्या आगीत अनेक मुली होरपळून निघालेल्या आहेत. त्या घटना मला या ठिकाणी नमुद कराव्याशा वाटत नाहीत. कारण ते लिहितांना माझे हात कापतील.

आता या महाभयंकर रोगाच्या लागवणीसाठी जबाबदार असलेल्या घटकांचा आपण विचार करू.

**१) पुरूष –** यात पहिल्यांदा आपण विचार करू तो नवऱ्या मुलाचा जर या उच्चशिक्षित तरूणाला प्रश्न केला की, तू हुंडा घेणार आहेस का ? तर तो छाती फुगवून उत्तर देतो की, माझी इच्छा नाही आहे पण आईवडीलांची मर्जी राखण्यासाठी मला तो घ्यावा लागेल. हे उत्तर आपल्या या २१ व्या शतकातील बऱ्याच उच्चशिक्षित तरूणांच्या तोंडून ऐकायला मिळेल.

शिक्षणाचा अर्थ म्हणजे, व्यक्तीच्या वर्तनात अपेक्षित किंवा ईष्ट दिशेने होणारा बदल.

हे वर्तन या उच्चशिक्षित तरुणाचे ईष्ट दिशेने झाले असे म्हणता येईल का ? निश्चितच नाही.

त्याने संपादित केलेल्या विविध पदव्यांची किंमत याठिकाणी शून्य होते. उलट या पदव्यांनुसार नोकरी नुसार या तरूणांचे भाव ठरलेले आहेत. सर्वात जास्त भाव डॉक्टर व इंजिनियर यांचा आहे. तो भाव १,००,००० पासून सुरू होतो तर तो संपतो कोठे ? याची कल्पना मी करू शकत नाही.

यानंतर आपण मुलाच्या वडीलांचा विचार करू. आपल्या मुलाला सर्वात जास्त हुंडा मिळावा कशी त्यांची इच्छा असते. आणि त्याला ते प्रतिष्ठा समजतात ते सांगतात की, मी माझ्या मुलाला खूप शिकवले, डॉक्टर केले, इंजिनियर केले. मला खुप खर्च लागला. जसे काही त्यांनी त्यांच्या मुलाला शिकवून मुलीच्या बापावर व समाजावर उपकार केलेत.

यानंतर समाजातील काही दोन्ही बाजूंनी टाळ्या वाजवणारी मंडळी जर एखाद्याने या प्रथेला विरोध केला, हुंडा घेतला नाही, तर ते विविध निष्कर्ष काढतात. उदा. मुलात खोट असेल, त्याला कोणी मुलगीच देत नसेल वगैरे.

याला काही अंशी मुलींचे पालकही जबाबदार असतात. ज्या पालकांना एकच मुलगी असते आणि संपत्ती खुप असते. ते सांगतात की मी सर्व काही माझ्या मुलीसाठीच कमविले आणि मला कोठे चार-पाच मुली आहेत. अशा वेळी असे पालक वरपक्षाच्या सर्व अटी मान्य करतात. आणि वरून स्वइच्छेने काही वस्तू देतात. यावेळी तो श्रीमंत पालक सर्वसामान्य गरीब पालकाचा विचार करीत नाही.

**२) स्त्रिया –** या प्रथेला काही अंशी स्त्रिया सुध्दा कारणीभूत आहेत. कारण स्त्री ही त्या वर मुलाची आई किंवा बहिण असते. त्यावेळी ती विरोध करीत नाही.

एकंदरीत समाजातील सर्वच घटक या अनिष्ट प्रथेला जबाबदार आहेत. ही प्रथा बंद करणे आपणा सर्वांच्या हातात आहे. काही जण याला पैशांच्या लालचेमुळे, लवकर श्रीमंत होण्याच्या मार्ग समजतात. मित्रांनो, जर आपले मन स्वच्छ असेल, हेतु प्रामाणिक असतील, इच्छाशक्ती प्रबळ असेल, हातात काम करण्याची शक्ती असेल तर, आपण जगातील सर्वोच्च ध्येय गाळू शकतो.

आपल्या या निर्णयामुळे बरेच जीव सुखावतील कुणीतरी म्हटले आहे की, दुसऱ्याला सुख देण्यातच आपले सुख सामावलेले असते.

विसरू नका आज आपण सुध्दा कुणाबहिणीचे भाऊ आहोत आणि भविष्यात कुणा मुलीचे बाप होणार आहोत.

विचार करा...

# साहित्य स्वरूप : एक अनुभव

**– रोहिणी भास्कर तायडे**
प्रथम वर्ष बी.एड.

साहित्य आणि मानवी जीवन यांचा अन्योन्य संबंध असतो मानवी जीवन व मन यांच्या ज्या प्रमाणे थांग लागत नाही त्याप्रमाणे साहित्याचे स्वरूपही पूर्णपणे कळत नाही. कवीच्या मनाने घेतलेला अनीव काळ्यातून तर शब्दांच्या माध्यमातून साहित्य रूप घेत असते. हे माध्यम, हा अनुभव त्यावर कलावंतांच्या मनाने केलेले संस्कार, लेखकाची जीवनदृष्टी, त्याचे आकलन त्याची साहित्याकडे बघण्याची दृष्टी या सगळ्यातून एक सौदर्य दृष्टी घेवून अनुभव साकारत असतो ही जाणीव ठेवूनच आपण साहित्याचे स्वरूप समजून घ्यायला हवे.

साहित्याची सर्व अंगे, सर्व लक्षणे एका व्याख्येत स्वष्ट करता येत नाही म्हणून साहित्याची परिपूर्ण व्याख्या करता येत नाही. साहित्यामध्ये जीवनानुभव सौदर्यपूर्ण रितीने प्रकट होत असतो.

सौदर्य पूर्ण रितीने, साहित्यामधुन व्यक्त होणारा जीवनानुभव म्हणजे साहित्य होय. असे आपल्याला म्हणता येईल.

साहित्याचे स्वरूप हे फार मोठे आहे. तरी मी ते अतिशय थोडक्यात स्पष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**१) साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष :**

लेखक समाज जीवनाचा अनुभव घेतो. त्यावर त्याच्या प्रतिभेने संस्कार केले जातात. त्याच्या व्यक्तिमत्वाचाही प्रभाव पडत असतो. आणि साहित्यानुभव ह व्यक्त होत असतो.

उदा. एखाद्या सुंदर स्त्रीकडे पाहून वेगवेगळ्या प्रतिभावंतांना तिचे वेगवेगळे रूप लक्षात आले असते. एखाद्याने म्हटले असते, अशीच आमुची आई असती, आम्ही ही सुंदर झालो असतो, तर भा. रा. तांबे म्हणतात, भयचकित नमावे तुज रमणी तर एखाद्या शाहिराला वाटले असते कोण गं सुभगाची मदनमंजिरी अनुभवाकडे बघण्याची लेखकाची रटी अशी भिन्न-मित्र असू शकते. त्यामुळे साहित्यातील अर्थ अस्वाद असतो. साहित्य कलात्मक रूप धारण करतो. जीवनातील अनुभूतीचा प्रत्यय आणून देतो लेखकाच्या कलात्मक आणि सौदर्य दृष्टीमुळे व्यवहारातील दुःखदायक आणि कुरूप अनुभव ही साहित्यामध्ये सुंदर अस्वाद्य अशी वाटतात.

**२) वास्तव आणि कल्पीत :**

साहित्यामध्ये वास्तव जीवनाचे जसेच्या तसे चित्रण नसते. तर वास्तवाच्या आधारे एक नवे विश्व साहित्यकृतीमध्ये रेखाटलेले असते. साहित्यातील अनुभव हा आरशातील प्रतिबिंब किंवा छायाचित्र या सारखा नसतो. तर तो अनुभव एका कलावंत मनाने साधलेली नवनिर्मिती असते. वास्तव हे त्याच्या साहित्यकृतीचे निमित्तमात्र असते.

उदा.- देवलांना वास्तवामधील एका वृद्धाशी एक अल्पवयीन मूलीचा विवाह ठरल्याची बातमी कळते. तेव्हा ते अस्वस्थ होतात. त्यांना तीचेतना मिळून शारदा या नाटकाची निर्मीती झाली.

कळीच्या अवस्थेतील नुकतेच उमलू पाहण्याच्या फूलावर सकाळच्या प्रहरी पहिलाच रविकिरण येवून पडणे हे निमित्तमात्र घेवून बालकवींनी फूलराणी ही कविता केली.

साहित्यातील कल्पीत हे वास्तवापेक्षा वेगळे असते.

उदा.- इसापनितीच्या कथा, सिंदबादच्या सफरी यामधील अद्भुत विश्व हे वास्तवापेक्षा वेगळे आहे.

थोडक्यात, वास्तवातील मानवी मनाचा आलेख साहित्यात रेखाटलेला असतो. तो कल्पकतेने रेखाटतो. त्याने निर्माण केलेल्या व्यक्ती घटना प्रसंग त्या वास्तवातील मानवी स्वभावाशी समांतरच असतात.

**३) साहित्यातील संवेदना :**

बालकवींच्या निर्झरास, फूलराणी, औदुंबर, अरुण ह्या कविमांमधून शब्दांच्या सहाय्याने द्रक प्रत्यय देणारी, चित्रच रेखाटलेली दिसतात. साहित्यातून साकार होणारा अनुभव पंचज्ञानेंद्रिया द्वारा, संवेदनाच्या आधारे वाचकांच्या मनापर्यंत पोहचत असतो.

उदा. हिरवे हिरवे गार गालिचे। हरित तृणांच्या मखमालीचे ।। ह्या ओळीमून हिरव्यारंगा बरोबरच, स्पर्श संवेदना जागी होते. भा.रा.तांबे यांच्या उमडमत डमरू ये,

खणखणत शूल ये,

शंख फूंकीत ये, येई रूद्रा ! ह्या

रूद्रास आव्हान ह्या कवितेतून नादसंवेदना जागी होते. रूप, रंग, गंध, नाद, स्पर्श, रस या संवेदना साहित्य कृतीतून शब्दांच्या योग्य निवडीतून विशिष्ट मांडणीतून शब्दांच्या अंगीभूत लयीतून साहित्यकार लेखक साकार करत असतो. त्यामुळे ते शब्द केवळ संवेदना जाणीव करत नाही तर त्या पेक्षा अधिक काही कार्य करतात.

**४) साहित्यातील भावनात्मकता :**

लेखकाच्या संवेदनाक्षम मनाला येणारा जीवना अनुभव त्याच्या साहित्यकृतीमधून वाचकाला जाणवतो तो जीवनाचा अर्थ लावतो. जीवन सत्याचा मागोवा घेत असतो. हा जीवनाचा वेध भावनिक पातळीतून घेतलेला असतो.

साहित्यात लेखकाचा भावनाविष्कर दिसून येतो. उदा. विश्वास पाटील यांची पानीपत, आनंद यादव यांची गोतावळा या सारख्या साहित्यकृतीतून साधलेले जीवनचित्रण हे वास्तव जगातील भावभावनाचे चित्रण आहे.

उदा. प्रत्यक्ष जीवनातील गरिबी पाहून आपणतीला मदत करू शकतो. पण, एकच प्याला तील सिंधूला आपण काहीच मदत करू शकत नाही. साहित्यातील जाणवणाऱ्या भावनांकडे आपण निर्लेप, निर्भय वृत्तीने पाहू शकतो.

उदा. शाकुंतल मधील शकुंतला ही आपली कुणीच नसते दुष्यंताने तिचा स्विकार केला काय ? किंवा नाही केला काय ? त्याच्या आपल्या विकासावर काहीच परिणाम होत नाही. पण तरीही त्या भावना आपल्याला जाणवतात. साहित्यातील या भाव जागृतीतूनच आपण जीवनविषयक विचार करू लागतो. व त्यामुळे रसिक वाचकाचा जीवन जाणिवा जागृत होतात.

**५) साहित्यातील वैचारिकता :**

लेखकाला जाणवणारा जीवनार्थ त्याच्या साहित्य कृतीतून प्रकट होत असतो. ह्या प्रत्येकाचा जीवन विचार वेगवेगळा असू शकतो. हा जीवनविचार कलात्मक रूप घेवून व्यक्त होत असतो. त्यातील भावना व विचार वेगवेगळे करता येत नाही.

अपुला प्याला दुःखाचा, डोळे मिटूनी प्यायचा केशवसुतांना जाणवणारा जीवनअर्थ असा आहे. तर बी कवींना जाणवलेला जीवन चक्राचा अन्वयार्थपूर्णापासून ढळले जग, जाते पूर्णांकडे या पंक्तीतून व्यक्त होत.

उदा. शारदा या नाटकातून सामाजिक विचार, तर पानीपत, मृत्यूंजय, स्वामी या तीन साहित्यकृतीतून जीवनविचार मांडला आहे.

साहित्यकृतीतून व्यक्त होणाऱ्या विचारांची मांडणी ही प्रत्येक लेखकाची स्वतंत्र असते. प्रत्येक साहित्यकृती स्वतंत्र असते.

**६) साहित्यातील सेंद्रियत्व :**

साहित्य कृतीही स्वतंत्र, स्वयंपूर्ण व संपूर्ण असते कोणतीही साहित्य कृती असो. तिला तिचे स्वतंत्र व्यक्तीमत्व असते. भाषाशैली प्रतिमा, स्थान, अलंकार, प्रतिके, काण्यत्व, नाट्य, संवाद, निवेदन, संघर्ष इ. घटकातून ते साकारत असते. यासर्वाचा मिळून एक परिणाम साधला जातो. साहित्यकृतीचा ह्या एकसंधीतेलाच सेंद्रियता असे म्हटले जाते.

उदा. माझ्या मना बन दगड विं. दा. करंदीकर यांच्या ह्या कवितेत दगड ऐवजी धोंडा किंवा मन–ऐवजी मानस वापरता येत नाही.

रिकामे मधुघट भा. रा. तांबे यांच्या कवितेतील कडव्याचा क्रम बदलता येत नाही. कारण तसाक्रम बदलला तरस्पनेचे कौशल्य जाईल. अशारितीने कलाकृतीमध्ये सेंद्रियता असते.

**७) साहित्यातील सूचकता:**

साहित्यातून व्यक्त होणारा जीवनानुभव हा व्यापक आणि सखोल असावा लागतो. त्यासाठी कवी किंवा लेखक वास्तवातील जीवनानुभव निवडतात व ते सुचकतेने कलाकृतीमध्ये मांडतात. साहित्यातून असाच जीवनानुभव सुचीत केलेला असतो. सूचन करण्याचे सामर्थ्य शब्दांमध्ये असते. या सुचकतेमुळे साहित्यामध्ये काव्यात्मकता येते. त्यामुळे साहित्य कृतीतील संबंध जाणवते मग ते सौदर्य भावनांचे असेल किंवा विचाराचे असेल.

बालकवींची औदुंबर ही कविता केवळ एक निसर्गचित्रण वाहता त्यातून जीवन विषयक विचार व्यक्त केले आहे.

पाण्यामध्ये पाय सोडून निर्विकारपण बसणारा हा

औदुंबर जगाकडे स्थितप्रज्ञ प्रतीने पाहत संन्सस्त जीवन कंठणाचा पुरुषाचे चित्र आपल्या नजरेसमोर उभे करतो. त्यातील उत्पत्ती स्थिती लय, रंगसंवेदने हारे सूचीत केले आहे. याच सूचकतेला ध्वनी असे म्हणतात.

**८) साहित्यानुभवाची विशिष्टता आणि विश्वात्मकता :**

साहित्य म्हणजे लेखकाचा आत्मविश्कार, लेखकाला जाणवणारा अनन्यसाधारण अनुभव तो त्यात व्यक्त करतो. तो खास लेखकाचा अनुभव असतो. साहित्यीक वास्तवातील व्यक्तीरेखा प्रतिभावळाने रेखाटत असतो. त्यामुळे त्या व्यक्ती रेखांचे खास विशिष्ट अनुभव असतात.

उदा. एकच प्याला मधील सुधाकर म्हणजे कोणताही मनोभंग झालेला मद्यपी नाही तो खास सुधाकरचाच अनुभव आहे.

उदा. राम-सीता, श्रीकृष्ण-रुख्मीणी, लैला-मजनू, हिर रांझा, बाजीराव मस्तानी ह्यांच्यातील प्रेमानुभव हा एकसुरी नाही. तो त्यांच्या प्रत्येकाचा खास अनुभव आहे. म्हणून तो विशीष्ट आह. अनन्यसाधारण आहे. हे विशिष्टता हे अनुभवाचे अनन्य साधारणत्व वाचकाला जाणवते. वाचक त्या अनुभवाच्या गाभ्यापर्यंत जातो. त्याच वेळेस वाचकाला तो अनुभव आपलाच वाटू लागतो. साहित्यीकाने अनुभव अविष्कृत केल्या नंतर तो अनुभव त्याचा राहत नाही. तो सर्वांचा बनतो. त्या अनुभवात विश्वात्मकता असते. अशा रितीने साहित्यानुभव हा एकाच वेळेला विशिष्ट व विश्वात्मकही असतो.

अशा अनेक पैलूंनी साहित्याचे स्वरूप स्पष्ट करता येवू शकते. साहित्य हे समजाचा आरसा आहे. साहित्यातून वाचकाला वेगळ्या समाज जीवनाचे दर्शन मिळते. विशिष्ट दृष्टी मिळते. अशाप्रकारे समाजजीवनाची एक नवीन दृष्टी साहित्यीकांनी वाचकांना दिली आहे. व आपल्याला नवा अनुभव प्राप्त करून दिला आहे.

# आजचा युवक

**- सागर संजय पाटील**
प्रथम वर्ष बी.एड.

मनुष्याला जन्म मिळाल्यानंतर प्रत्येकाला बालपण, तरूणपण व म्हातारपण या क्रमानुसार जावे लागते. यातील बालपण म्हणजे आई-वडिलांच्या प्रेमातच जाते कारण त्यावेळी कशाचीच जाणीव, चिंता नसते. तर म्हातारपण यावेळी आपले आयुष्य कसे गेले हे सांगण्यातच जाते यावेळी श्रम करण्याची ताकद राहत नाही. जिवनातील सर्वात महत्वाची अवस्था म्हणजे तरूण पण यामध्ये युवकाला तरुणाला काहीतरी करण्याची संधी असते.

या तरूण वयातच प्रत्येक युवकामध्ये नाहीतरी करणयची, इतरापेक्षा वेगळे करण्याची खुप इच्छा असते. या वयात युवकामध्ये अत्यंत आत्मविश्वास, जिज्ञासा, ज्ञान असते. लाथ मारीन तेथे पाणी काढील या प्रकारचा जोम त्यामध्ये असतो. आणि या जोमाच्या, बळाच्या हिमतीवरच तो अनेक अशक्य गोष्टी साध्य करतो. छत्रपती शिवराय, क्रांतीकारक भगतसिंग, संत ज्ञानेश्वर स्वामी विवेकानंद यासारख्या युवकांनी आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावरच खूप लहान वयात मोठे कार्य केले आहे. युवकांची विचार करण्याची दिशाच बदलली आहे. आजच्या युवकांवर पाश्चिमात्य संस्कृतीचा खूपच परिणाम झालेला आहे. आजचा युवक अत्यंत बेजबाबदारपणाने वागतो आहे. आज आपल्या देशात अनेक समस्या आहेत. परंतु या समस्यांकडे युवक वर्ग दुर्लक्ष करीत आहे. तो फक्त स्वत:च्या विश्वातच रमत आहे. हाच युवक उद्याचा देशाचा आधारस्तंभ आहे. देशाच्या विकासात, देशाच्या भरभराटीस या युवकाच्या मदतीनेच भर पडणार आहे. परंतु ज्या देशाच्या युवकाजवळ देशातील समस्या सोडविण्यास, देशहिताचा विचार करण्यास वेळच नाही. आजचा युवक हा भरकटलेला आहे. आजचा युवक हा फक्त आधुनिकतेने पुढे गेलेला आहे. तो आपली संस्कृती, आपले विचार यापासून फार दूर गेला आहे.

आजच्या युवकांमध्ये बऱ्याच कारणामुळे निराशा, वैफल्य आले आहे. यातून तो मार्ग न काढता व्यसनाकडे वळला आहे. आजचा युवक हा व्यसनाकडे एवढा वळला आहे कि गुटखा खाणे, सिगारेट ओढणे याला तो आधुनिकता (फॅशन) मानत आहे. दारू पिणे, जुगार खेळणे यांना तो प्रतिष्ठा समजतो. आजचा युवक हा दिशा न शोधता भरकटत आहे.

आपल्या देशात अनेक युवकांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपल्या घरादाराचा विचार न करता आपले प्राण या भारत भूमिस अर्पण केले. राजगुरू, सुखदेव, सावरकर यासारख्या युवकांनी इंग्रजांशी सामना करतांना संघर्ष केला कारण त्यांच्या मध्ये आत्मविश्वास, स्वातंत्र्याची ओढ होती. परंतु आजचा युवक मात्र देशाचा विचार न करता गुन्हेगारी कडे ओढला आहे. युवकांवर राजकारण्यांनी एवढा पगडा केला आहे की कोणत्याही सामाजिक अशांततेच्या कार्यात युवक पुढे असतात. दंगली, आरामाचा या सारख्या कार्यात युवक कोणताही विचार न करतांना भरकटत आहे. आजचा युवक जातीवादाने भरकटलेला आहे. आपल्या ध्येयापासून दूर जात आहे. ज्या देशातील युवकांनी राष्ट्रीय भावनेतून स्वातंत्र्य मिळविले त्याच देशातील युवक मात्र आज धर्माच्या नावाखाली एकमेकांना मारत आहे.

युवकामध्ये खरोखरच मनगटात ताकद असते मनात आत्मविश्वास असतो. या बळाच्या जोरावरच आपण आपलय देशाचा विकास करू शकतो. या युवकांच्या मदतीनेच भारत एक महासत्ता आपण उदयास आणू शकतो फक्त आवश्यकता आहे ती युवकांच्या सहभागाची त्यांची प्रत्येक कार्यात मदत मिळण्याची, नाहीतर आज आपल्या देशात वाढत चाललेला भ्रष्टाचार, गुन्हेगारी, बेकारी, प्रादेशिक वाद, जातीयता, धर्मा-धर्मातील भांडणे यासारख्या प्रवृत्तींना ठेचण्याची ताकद प्रत्येक युवकामध्ये आहे. प्रत्येक युवकाने जर आपल्या देशाचा, आपल्या कल्याणाचा विचार केला तर काही दिवसातच आपल्या राष्ट्राचा आपण विकास करू शकतो. अन्यथा आपल्या देशाचा चांगला भविष्यकाळ येणे कठीण आहे.

आजच्या युवकाला गरज आहे ती योग्य मार्गदर्शनाच, त्याचप्रमाणे त्याने स्वत:हून आपल्या समस्या सोडविण्याची तयारी करण्याची, कोणतेही श्रम करण्याची तयारी, व्यसनधिनतेला आपल्या पासून दूर झटकण्याची तयारी त्याला करावीच लागेल. सर्व काही आपल्याला आयते मिळेल हा विचार त्याला दूर करावा लागेल. काय चांगले आहे, काय वाईट आहे हा विचार जर त्याने केला तर नक्कीच तो या देशाचा आधारस्तंभ बनेल व या चांगल्या युवकांच्या खांद्यावरच आपल्या देशाचा विकास होईल आणि आपला देश एक प्रगतीशील महासत्ता देश उदयास येईल.

भेटणार नाही जन्म पुन्हा
करून दाखव काही आता,
आता विचार कर तू असा,
देशाचा विकास होईल कसा.

# जीवन - एक न उलगडणारं कोडं

**- सागर संजय पाटील**
प्रथम वर्ष बी.एड.

जिंदगी एक सफर है सुहाना
यहाँ कल क्या हो किसने जाना।

सहज नकळत असं गुणगुणाऱ्या व्यक्तीला खरचं हा जीवनप्रवास सुखकर, आनंददायी वाटतो का ? विज्ञान युगात वावरूनही राशीभविष्य बघणाऱ्या व्यक्तीला उद्याची चाहुलनाही असं कसं शक्य ? कल्पनांच्या पंखावरती खार होऊन निरभ्र अवकाशातील अधांतरी उद्याचे सुंदर स्वप्न बघणाऱ्यालाही कधी वाटत असावं हे सुखद स्वप्न म्हणजे काय ? उद्याचं जीवन कस असावं हे दाखविणारा आरसा ? ज्याचं प्रतिबिंब आपण या स्वप्नाच्या फसव्या कलाकृतीवर बघणार त्याच मुलस्वरूपच जर न उलगडणारं कोडं असेल तर.

हे न उलगडणारं कोडं जीवन, जीवन म्हणजे तरी काय ? प्रत्येकाच्या मनातील प्रश् तशी उत्तरेही अनेक ! व्यक्तीपरत्वे प्रत्येकाची ही संकल्पना वेगळी प्रत्येकाचा अनुभव जगावेगळा म्हणुनच की काय कुणासाठी हे जीवन जणू, संघर्ष, लढाई, ज्वाला तर कुणासाठी मेजवानी, कर्तव्य, संगीत आणि गंमत-जंमत देखील वाटते. जीवनाकडे नाना रंगाच्या चष्म्यातुन बघत असतांनाच जीवनाभोवती गुरफ टलेले अनेक प्रश्न आपल्या मनाला पार गुंगी येते मिळालेलं उत्तर संदिग्धच असतं. धुकं पडलेल्या सकाळ सारखं भविष्यात घडणाऱ्या घटनाक्रमासारखं. तेही असतं कधी काळी चुकींच ठरणारं कारण आजचं जीवन हे उद्याचं नसतचं. कारण हेच क्षणभंगुर जीवन म्हणजे पाण्यावरचा बुडबुडा एक तरंग म्हटलं तर शुल्लक नगण्य म्हटलं तर नानाविद्य रंगानी परिपुर्ण म्हणुनच या विविध रंगी जीवनाच्या क्षीरसागरात सर्वांगाने न्हाऊन निघावे. साखरे सारख तन्मय होवुन च्णाक्षणाचा मुक्त आनंद लुटावा.

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे.

कारण आयुष्य जीवन हे एकदाच मिळते.

जीवन हे सोन्यासारखं. सोन्याचा दागिना जसा काळजीपुर्वक संस्कारित व सुशोभित केला जातो तसेच जीवनाची जडण-घडण विविध गुणांनी कर्मानी होत गेली तर जीवनाचे मोजमाप किती पेक्षा कसे या परिमाणातझाल्याशिवाय रहात नाही. म्हणुनच की काय जीवनावर अप्रत्यक्ष विजय मिळविणाऱ्या काही ऐतिहासिक विभूती आजही किर्ती रूपानं आपल्यात वावरत आहेतच ना. खरं तर त्यासाठी हवी जगण्यासाठी वृक्षासारखी दर्दम्य ईच्छा, फुलपाखरासारख स्वच्छंदी जीवन जीवनाच्या पाऊल वाटेवरील पुढील वाटांनाही दयावा आपला सुखद आधार, करावं त्याचं स्वागत आषाढातल्या पावसाच्या सरीसारखं नी कोजागिरीच्या चांदण्यासारखं. मात्र वाटेवरच्या सावलीत न हरवता. क्षणाक्षणाचा हिशोब घ्यावा नाहीतर हा क्षणच चोरपावलांनी केव्हा हळूच निसटेल सांगता येत नाही. असे काही क्षण मनाने टिपले जातात व मनात संकल्पनाचा झरा झुळझुळता ठेवतात. असे सुंदर क्षण जणू चालुन आलेली सुवर्ण संधी ह्या संधीच सोनं करण म्हणजेच जगतांना गरुड झेप घेण्याचा अखंड प्रयत्न, अंती यश अपयश हे निष्कट आअनुमान मात्र सुख दुःखाच स्वरूप पर्वतासारखंतर सुख म्हणजे त्याच्या पुढे राईच पण एका शिवाय दुसरा निरर्थक म्हणुनच जीवन हास्य व अश्रू यांचा सुरेख संगम होय. कितीही घोर दुःख असलतरी सुखाची पडछाया त्यात दडलेलीच असते.

यह रंज यह मुसीबत<br>
हिस्सा है जिन्दगी का<br>
गम को खुशी बनाना<br>
यही काम है आदमी का ।

त्यासाठी मन खुप मोठं कराव म्हणजे दुःख वाढायला वावच मिळत नाही. जीवन चैन, विलास नसुन कर्तव्य त्यामुळेच जीवनाची वाट खडतर वाटत असली तरी येणारी संकटे शेवटी उज्वला भवितव्याची निदर्शक असतात. गुलाब काट्यावर फुलतं नि कमळ ही चिखलातच उगतं कसोटीच्या चौकटीत जीवनाची फ्रेम महत्वाकांक्षा, ध्येय, आशा आकांक्षान मढवावी. चौकटीपलीकडील जग म्हणजे जीवनाची डागाळलेली बाजु अनेक दुष्कृत्यातुन तयार होणारे जीवनाचे भयानक राक्षसी रूप !

म्हणून जीवनाच्या गाडीला विचाराचा ब्रेक असावा. विचारांचा अंकुश असेल तरच आचारातही सत्यता प्रतीत होते आचार हा विचाराचा द्योतक व्यभिचार ही नको व दुराचारही नको हवा फक्त सदाचार. ज्याची प्रचिती यावी प्रेमातुन विश्वासातुन, त्यागातुन, सेवेतुन नम्रतेतून या विविधपाकळ्यांच जे एक स्वरूप ते चारित्र्य, मनाची कलाकृती. चारित्र्यशील माणुस जणू परमेश्वराची उत्तम कलाकृती. कोणतेही चांगले चिंतन जणू परमेश्वराची प्रार्थना. हेच चिंतन जीवन उजळवून टाकते. चिंता मात्र माणसाला जाळत असते. रिकामं मन हे सैतानाचे घर असतं म्हणूनच मनाला सद्कार्यात गुतवूण आळसात वेळ घालविण्यापेक्षा कैकपट चांगलच असतं कारण जेथे गती असेल तेथेच प्रगती जीवन म्हणजे पाणी म्हणुन आयुष्य पाण्यासारखं प्रवाही असावं किनाऱ्यावर ते अनुभवाच्या वाळूचे थर गोळा करतात हेच अनुभव सुखद दुःखद आठवणीच्या रूपान हदयपटलावर स्थीर होतात. हेच अनुभव भावी आयुष्याचे मार्गदर्शक असतात. जगण्यातील प्रत्येक नवीन क्षण म्हणजे जणू एक नवीन अनुभव... 'मरण' हे अगदी जीवन प्रवासाच्या शेवटच्या स्टेशनाच ठिकाण. प्रत्येकालाच शेवटी स्टेशनवर यावच लागतं.

लवकर वा उशिरा का होईना प्रत्येकाला इथलं तिकीट काढावच लागत.

असा हा जीवन प्रवास खडतर असला तरी,
आनंदी आनंद गडे ।
जिकडे-तिकडे चोहिकडे ।।

असं म्हणणारा कलावंत आनंदाचे डोही आनंद तरंगे असा आनंदात बेभान होऊन खऱ्या अर्थाने जीवनाच्या आनंदाची, सौदर्याची लयलुट करेल. कधी कुंचल्याने विविध रंगाच्या द्वारे तर कधी शब्द माधुऱ्यांने या जीवनाचा वेध घेतांना आपल्यापरीन तो हे गुढ उलगडतो इतरांसाठी नव्हे परंतु स्वत:साठी नक्कीच. मनाची समजुत हवं म्हणा पण आपल्या कलेतच सृष्टीही आनंदाने नाचु लागते गाऊलागते म्हणूनच प्रत्येकाने

क्या मोसम आया है
पुरब से आई है मस्तानी पुरवाई

असं म्हणत आपल्यातील कलावंत जागवावा आणि आस्वाद घ्यावा या रंगभरी दुनियेचा, बाळपणीचे रम्य दिवस अगदी तसेच कोरून ठेवावे -हदयात डोळ्यांच्या पिंजऱ्यात स्वप्नातही करावं कधी बंदिस्त म्हणजे अश्रुंना जागा कमी पडते हसण्याने आयुष्य वाढत म्हणुन विखळ हसावं चांदण्यासारखं! स्वैर भरारी घ्यावी पाखरासारखी, पण भरकटत जाऊ नये दिशाहीन होऊन शेवटी आकाशालीही मर्यादा असतेच ! स्वत:ला समजुन घ्यावं पुर्णपणे नंतरच जगाचं ज्ञान घ्यावं. त्यासाठी बंदिस्त नसावं या चार भिंतीत अशक्यही असेल ते किंचीत पण त्यासाठी असावी जीवनाची धाव व भरकटूही देऊ नये जीवनाची नाव! असे जीवन जगणारा नकळतच म्हणतो

जिंदगी एक सफर है सुहाना !
आनंदाची सुखद जीवनप्रवासासाठी शुभेच्छा !

# Term Paper on Teacher as a Facilitator

**- Patil Gayatri Yuvraj**
F.Y.B.Ed

Teacher is a most important factor in nation building Students are country competent, knowledgeable, skillful student should a wealth of our make by teacher therefore teacher should think positively about that present era is global era. Various new changes & trends are coming in field of education In global era the the role of understand teacher is changing Teacher should & Concentrate on four pillars of education ie learning to live, learning to know learning to do & learning to be The role of teacher is changing in smart & active learning methodologies Now teacher is as a facilitator in learning Teaching & learning are being modified due to innovations in education. In this article I am discussing about teacher

Role in changing learning environment:

Teaching is the well-known word for teachers Teachers know the meaning of this word & know how to perform teaching Sometimes, they do know the difference between teaching & facilitating in learning & it make a.distance between the students & teachers. We have to understand. the difference between teaching & facilitating in learning because the both words are co-related with each. other. Teaching means. Teacher is doing the act of Teaching  Learning means students are doing the act of learning.

**Methods of Learning :**

In learning process teacher are important factors therefore teacher shi accept & use new learning methods.

**Active learning Methodology.**

In this methodology, teacher help the students in learning. Thus the entire classroom environment is chan Actually active learning methodology focuses helping in learning & facilitating in learning Active lear methodologies include several activity in classroom. such

as- reading, material mind-maps & group presentation & engage the student whole time. Achive learning methodologies are very effective to fine out Students creativity & talented.

**2) Active learning classroom Method:**

This technique provides very.... teaching learning opportunities teachers. Teacher is able to create an active environment in his class he has to.....the students in learning in various...... These methodologies are able to make teaching very small easy Teachers may be use collaboration learning is a exciting experiment in class In modern learning environment we see that learning is a more pop word than teaching. Teachers have! More interesting & int.......

**3) ProjectBased Learning Method:**

In these methods, student realizes the dignity of labour since they, themselve work The attitude for cooperative work is developed students learn through doing it developes the habbit of accurate observation.

**Qualities of Facilitator as Teacher:**

**1) Guide:**

Teacher is guide philosopher & friend of Student's teacher should guide to student enthusiastically. Mostly time student live in school of front of teacher Therefore teacher find out which is qualities in our Students And teacher should give opportunities to student's qualities Teacher can involve to students in various programmes in the school.

**2) Counselor :**

Some problems is there of the students teacher understand students study habbit problems look of poor achievement frustration , economical problem, Family Problem teacher help to student in these problems as counselor.

**3) Information Provider:**

Teacher should update inour students and education system, around the country, & around the world Teacher Should understand new trends & research field of education. Teacher enhances general knowledge of our students Teacher give information to Students inters school and cultural activities etc.

**4) Iquiries:**

Teacher should inquires in school for our students Various background student come in our school some student come from slum area, Some students from urban not come in school regular Teacher should inquirer always to student.

**5) Facilitator :**

Teacher can do important role in student as facilitators teacher facilitate to students our subject material teach facilitate to students magazines, newspaper, and motivational book.

**Conclusion:**

Teacher will be aware as facilitator teacher will be use achieve learning methodology Active learning classroom teaching Project based learning, teacher will a facilliters role & teachers will improving qualities of facilitators as teacher. Teacher will think facilitators point of view, teacher will use new teaching strategy in teaching learning process.

**References**


1) Starkey L. (2012) Teaching & learning in the digital age Rutledge, New York.
2) Nankar P., Shirode S. (2009)- Dr.Shailaja D. Bhangale

# Various Education Commission's Recommendation for Women Education

**- Ligy P.K.**
S.Y.M.Ed

**Introduction.**

Women education in India has. also been a major preoccupation of both the government and Civil society as educated women can assume a vital part is the advancement of the nation Instruction is point of reference of Women Sheryfhening Since it empowers Them to reacts to the difficulties, to stand up. to their conventional part and change there life. With the goal that we can't disregard the significance of training in reference to Women Strengthening India ready to getting to be super power, a created nation by, 2020-2025. The development of women's instruction in rustic regions. is moderate this clearly implies still vast womenfolk of our nation are unslalled the frail, is reverse and abused.

Training of women in the instruction of Women is the most capable apparatus Coomen of progress of position is the public eye Instruction likewise acquires a decrease imbalances and capacities. as a method for enhancing then status inside the family. To gave the instruction to everybody. EFA programme was propelled in 2002 by the Government of India office its 86t Constitutional Amendment made training from age 6-14 The basic light of each Indian tylce. Be that as it each may positions of young lady's instruction is not enhancing as per parameter for woman to know the present position of women instruction, it is important to know Various Commission, Schemes and constitutinal Provision of women Education.

"If you educate a man you educate an individual, however, if you educate a woman, you educate a whole family".

**Constitutional Provisions :**

The Constitution of India not solely grants equality to ladies however conjointly empowers the state to adopt measures of positive discriminatios in favour of girls for neutralizing the accumulative socio economic, education and political disadvantages two-faced by them. Elementary Rights, among others, gurantee equality before. The law and equal protestues t law; prohibits discrimination against any national on grounds of faith, race, Caste ,Sex or Place of birth and grantee equality of chance to all be any voters in matters conceering employment. Anticles 14,15, 15 (3) 16, 39 (a) 39 (b) 39 (c) and forty two of the Constitution square measure of specific emportance during this regard.

**National Commission for girls Act 1990 (Act no. twenty of 1990 of Goverment of India) to**

1) Review the constitutional and legal safeguards for women.
2) Recommended. Remedial legislative measures.
3) Facilitate redressal of grievances and
4) Advise the Goverment on all Policy mattres affecting women.

It organized Workshop/ seminars for gender awareness and took up substance Campaign against feminine toetocide, Violence against girls etc so as to come up with awareness within the society against these social evils.

**The National plan of Action for Girl Child (1991-2000)**

The plan of Action is to contoen. Survival, protection and development of the woman kid with the final word. Objective of build up a more robust additional for the woman child.

**Dr. Radhakrishnan University Education Commission (1948-1949)**

States "There. cannot be educated people

without educted Women.

**Kothari -Commission (1964-1966)**

Has rightly remarked "For full development of human resources the improvement of human being end for moulding the character children during most important years of infancy is educations of women is of great importance of then of men.

The National Poling on Education (1950) States "The education. Womes should reempharise not only on grounds social justice but also because it accelerates social transformation".

**University Education Commission (1948.1949)**

The University Education Commission properly known as Radhakrishnan commission It analyses the problems of women education at the College and university level and gives following recommeralations.

a) Amenities of life
b) Educational opportunities
c) Educational guidance
d) Normal place in society.
e) cultural and Social Responsibilites
f) Equality is Co-education situations

**National Committee on Women's Education 1958**

Education panel of the planning Commission recommended on July (1957) that " A suitable Committee Should be appointed to go into The various aspects of the questions in relation to the nature of education for girls at the primary and Secondary Stages and to teamine the present system.

under the charmenship of Smt. Dnegabai Deshmukh the committee made following recommenclations:

1) Universal Enrollment: The attempt for expasion of girl's education should aims at universal enrolment of girls with age group of 6-11 by 1979 and to the age group 12-14 by 1981
2) improvement programme
3) publicity programme
4) Education for adult women.
5) Number increased of women teachers should be primary schools.
6) Girls should be provided. Facilities such as scholarship, free -hansport and stipend.

**Recommendations of Bhaktavatsalam Commission (1963)**

**1) Fields of public co-operation:**

Duct public cooperation should be exconged such as;

a) Establishment of private schools
b) Construction of School building.
c) Provision of text books, writing materials
d) Provisions of mid-day meal

**2) States responsibility:**

State should take up the responsibility of creating public opinion in favour of women education.

3) Provision of Primary School
4) Women teachers.
5) Relaxation in age Limit
6) Hostel facilities.
7) Education for adult teachers
8) Residence for women teachers.
9) Adult education.

**National Council for woman (1964):**

It was set up in 1959 by Central ministry of education. It was reconstructed in 1964 and consisted of the Chammen, the secretary emel 27 members. The main functions of the council are:

1) To advise the Goverment on the education. of girls at school level and the education of adult women.
2) To create awareness in the society with regard to the importance of women education.
3) To make evaluation for the progress of women education.

**Kothari Commission on Women's. Education.**

It has given lots of importance to women's education. It has made the following recommendation regarding Women's education.

1) The gap between men's education and women's education should be closed by considering women's educated as a Major Programme in education for some years.
2) There should be a special adminstration Mahinakg to look after the education of girls and women.
3) Special plan should be prepared for this Purpose and the funds required for then should be provided priority basis.
4) Effonts should be made to accelerate the expansion of girls' education All the Secondary level the development of the education of girls should be increased. The ratio of female and male education. should come to years. 2:1 from 3:1 in 20 years
5) Emphasis should be placed on establishing separate for girls provision of hostels and Part time comeses.
6) Research unit should be set up in one or more Universities to deal specially

For women's education.

**Recommendation of National Policy an Women's Education:**

1) Status of Women
2) Promotion of Women
3) Improvement of Women's. Education.
4) Provision of various courses.
5) Removal of illiteracy.

# Save girl child

**- Patil Shital Anil**

Women are the most important section of the society and equally participate in the life existence on the earth however regular decrease in the sex ratio of female in India because of the crimes against women, it created the fear of total finish of women. So it is very necessary to save girl child in order to maintain The ratio of women in India It has been most important topic as a Social awarness in the Indian society which youths of the country must know about In order to enhance the writing skill and knowledge of the students, teachers assign them. this to write only paragraph or complete essay in the classroom, during exam or any competition. It helps in the human. capital formation Education, proper

Education must be given to all child whether it's not o girl boy. Education must depend on gender. It is first of all it is child/ human.

Girl children's are traditionally considered inferior than boy And they also denied The right of education they are considered as homemakers but nowadays girls are improving their condition So many States in India like kerala, have been honoured with a higher sex ratio and 100% literacy rate I hope like kerala, other states of India will also change for a brighter future.

In order to protect the girl child a Lodli Scheme was launched and implemented by the Delhi & Haryana Goverment in 2008. The aim

of this Scheme was controlling female foeticide as well as improving status of girl child through education and equal gender rights.

In ancient time birth of a girl child was considered as auspicious. As per an Indian proverb, A home without daughter is like of a body without soul " the birth of a daughter in the house was compared with the advent of Goddess Laxmi, the Goddess of wealth and Goddess Saraswatil the Goddess of knowledge and wisdom No ceremony was considered to be complete in absence of women The belief was that " No home is complete without a woman.'

Indian is a " Male Dominated Society" hence women are the receiving and they are always will treated and ill-treated at matter of fact, a girlis under constant, vigil initially by the parents, then her own children she is never allowed to a well and survive freely worst of all she is often killed before being born while in mother's womb itself. This is foetus killing or infanticide This is the gross downfall of humanity, morality and the values.

When others, you kill girl you kill many others, Friend, wife, sister, mother, daughter,"

"A daughter is one of the most beautiful gifts this world has to give".

"A girl child is butterfly, let her get out of the cocoon and fly" She" makes the world BRIGHT but still struggles to see the LIGHT! Be proud to be a parent i irrespective of the sex of your child.

So Save Girl child.

# शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा अहवाल

आपल्या संस्थेच्या शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगावचा शैक्षणिक अहवाल २०१९-२० खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव १९४४ साली स्थापन झालेली शिक्षणशास्त्र क्षेत्रातील एक नामांकि व प्रगल्भ संस्था आहे. ही संस्था सुमारे २६ एकर परिसरामध्ये विकसित झालेली आहे. या संस्थेने चालविलेले शिक्षणशास्त्र महाविद्यालय (१९६५) म्हणजेच ५४ वर्षापासून शिक्षक प्रशिक्षणाचे कार्य करीत आहेत.

एनटीई रेग्युलेशन २०१४ नुसार शासनाचे सुधारीत नाहकरत प्रमाणपत्र प्राप्त झालेले असून त्यानुसार उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याशी कायम संलग्नित असून सर्व शिक्षणक्रम दोन वर्ष कालावधीसाठी राबविले जात आहे. या वर्षात विविध शिक्षणक्रमांना खालीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेशित होते.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष बी.एड. | १०० | ९८ |
| २ | द्वितीय वर्ष बी.एड. | १०० | ५४ |
| ३ | प्रथम वर्ष बी.पी.एड. | १०० | ४९ |
| ४ | द्वितीय वर्ष बी.पी.एड | १०० | २५ |
| ५ | प्रथम वर्ष एम.एड. | ५० | ०४ |
| ६ | द्वितीय वर्ष एम.एड. | ५० | ०३ |
| ७ | प्रथम वर्ष एम.पी.एड. | ३० | ३० |
| ८ | द्वितीय वर्ष एम.पी.एड. | ३० | २९ |

या वर्षात द्वितीय वर्ष बी.एड.च्या विद्यार्थ्यांनी दि. ०१.०७.२०१९ ते ३०.०९.२०१९ या दरम्यान आठ माध्यमिक शाळांमध्ये आंतरवासिता उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. यासाठी सर्व शाळांचे, मा. शिक्षण अधिकारी, माध्यमिक यांचे सहकार्य लाभले.

महाविद्यालयास १९९२ पासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या बी.ड. शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र, शालेय व्यवस्थापन पदविका (डी.एस.एम.), सहयोगी बी.एड. प्रमाणपत्र शिक्षणक्रम आणि एम.एम.शिक्षणशास्त्र आणि २०१० पासून बी.एड इग्नो या शिक्षणक्रमांना मान्यता आहे. महाविद्यालयात उच्च गुणवत्ताधारक व्याख्याता वर्ग, सुसज्ज मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, शैक्षणिक तंत्रविज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय व वाचनकथ, भव्य क्रीडांगण, सुसज्ज इमारत, प्रायोगिक मानसशास्त्र व उपयोजित संख्याशास्त्र अध्यापनाची सोय असून महाविद्यालयाला विद्यापीठाकडून संशोधन केंद्र (Research Center) म्हणून मान्यता आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणशास्त्रातील नेट-सेट परीक्षेची सुविधा उपलब्ध झालेली आहे. तसेच एम.फील व पीएच.डी. शिक्षणशास्त्र या विषयात संशोधनाची संधी उपलब्ध असून महाविद्यालयातील तीन प्राध्यापकांना संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षात २ विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी विद्यापीठाने प्रदान केली आहे. महाविद्यालयातील ४ प्राध्यापक पीएच.डी. पदवीसाठी संशोधन करीत आहे.

महाविद्यालयाच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन दि. ०५-०३-२०१९ रोजी मा. शशिकांतजी वडोदकर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी, जळगाव यांचे शुभहस्ते झाले. तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दि. ०६.०३.२०१९ रोजी मा. प्राचार्य डॉ. मिनाक्षी वायकोळे, व्यवस्थापन परिषद सदस्य, के.सी.ई.सोसायटी व डॉ. दिलीप हुंडीवाले, शैक्षणिक संचालक, केसीई सोसायटी, जळगाव यांचे शुभहस्ते गुणवत्ता संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आली.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडून मिळालेल्या उपक्रमांतर्गत चार विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजनेत मालसिंग देवजी वळवी, किसन सिंगा वसावे, सायसिंग नवसा नाईक, संकेत रामकृष्ण भंगाळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मुलींसाठी युवती सभा, स्वयंसिद्धा प्रशिक्षण व व्यक्तिम त्त्व विकास कार्यशाळा तसेच जागतिक तापमान वाढ कार्यशाळा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयातील एनएसएस विभागांतर्गत विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे नियमित आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यासाठी क.ब.चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून एकत्रित रु. ४३१२०/- हजार अनुदान प्राप्त झाले. केंद्र सरकारच्या भारत स्वच्छता

अभियान अंतर्गत उन्हाळी स्वच्छता शिबिरात १० आणि दोन शिक्षकांनी रायपूर ता. जळगाव या गावात सहभाग घेतला.

संस्थेने व महाविद्यालयाने आयोजित केलेल्या गणेश उत्सवानिमित्त प्लॅस्टीक निर्मुलन जाणीव निर्माण होण्यासाठी आयोजित केलेल्या गणेश म्युरल उपक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला. संस्थेच्या या उपक्रमाची लिमका बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस यामध्ये नोंद झाली.

बी.पी.एड., एम.पी.एड. च्या विद्यार्थ्यांना प्रा. किशोर पाठक, प्रा. नवनित आसी, प्रा. आनंद उपाध्याय, प्रा. विनोद पाटील, प्रा. गोविंद मारतडे, डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर, डॉ. दिनेश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

या वर्षात महाविद्यालयाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ योजनेअंतर्गत प्रा. निलेश जोशी यांना संशोधनासाठी रु. ३४०००/- अनुदान प्राप्त झाले. त्यानुसार संशोधन कार्य सुरू आहे.

या वर्षात महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांनी राष्ट्रीय स्तरावरील विविध परीषदांमध्ये सहभाग घेऊन निबंळ वाचन केले. या वर्षात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर महाविद्यालयातील ५ शिक्षक कार्यरत आहे.

युजीसीनुसार आय.क्यु.ए.सी.अंतर्गत समितीच्या दोन सभा होऊन पात्र प्राध्यापकांचे युजीसी कॅस योजने अंतर्गत एपीआयची पडताळणी करून प्राध्यापकानी वेतन निश्‍चिती शिबिर घेण्यात आले.

विद्यापीठाच्या युवारंग कार्यक्रमात ०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या वर्षभरात महाविद्यालयात डॉ. स.न.भारंबे, डॉ. दिनेश पाटील, डॉ. साहेबराव भुकन, प्राचार्य डॉ. मरजे सांगली, डॉ. लता मोरे, प्रभारी अधिष्ठाता, आंतरविद्या शाखा, कबचौ उमवि, डॉ. बी.युवाकुमार रेड्डी, डॉ. एस.एस.शिंदे, प्रा. अनिरुद्ध पांडे अमरावती प्रा. संजय मढावी, अमरावती, डॉ. पंकजकुमार नन्नवरे, प्रा. दिलीप चौधरी, सौ. चारुलता पाटील, डॉ. वाय.एच.सनेर, धुळे, डॉ. अंजली जोशी, अमळनेर डॉ. प्रिया कुरकुरे, प्रा. संगिता पवार, प्रा. प्रणिता झांबरे, डॉ. सोनल महाजन, प्रा संदीप केदार, डॉ. प्रज्ञा जंगले, प्रा. साधना झोपे, प्रा. किसन पावरा इत्यादी मान्यवरांनी विविध प्रसंगी भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे नॅक पूर्नमूल्यांकन तिसरी फेरीसाठी नॅक संस्थेने जाहीर केलेला प्रस्तावित आराखडा या विषयांवर प्राचार्य डॉ. व्ही.एस.झोपे यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयात दि. २३.०२.२०१९ रोजी लोकशाही मतदान जागृती अभियान अंतर्गत तहसिलदार व त्यांचे सहकारी यांनी ईव्हीएम आणि व्हीव्ही पॅट मशीन संदर्भात विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

क.ब.चौधरी उ.म.वि.स्थानिक चौकशी समितीचे चेअमरन डॉ. आरती सपकाळे, डॉ.मदन निकुमे, डॉ. शोभा चौधरी धुळे बी.एड.कॉलेज यांनी दि.१२.०३.२०१९ रोजी भेट देऊन संलग्नता विषयक कामकाज केले. तसेच शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र पडताळणी समितीचे चेअरमन प्रा. आर.एन.धायगुडे व प्रा. धिरज अमृतकर यांनी दि. २७.०३.२०१९ रोजी महाविद्यालयाला भेट देऊन पडताळणी केली.

महाविद्यालयाने आदिवासी खेळाडुंकरीता एकलव्य निवासी क्रीडा प्रशिक्षण केंद्राचा प्रस्ताव मा. आयुक्त आदिवासी विभाग, नाशिक यांचेकडे दि. २८.०९.२०१८ रोजी सादर केला.

महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाकड स्वायत्त महाविद्यालयाचा प्रस्ताव दि. १८.०२.२०१९ रोजी युजीसी, दिल्ली यांचेकडे सादर केला.

महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे स्वायत्त महाविद्यालयाचा प्रस्ताव दि. १८.०२.२०१९ रोजी युजीसी, दिल्ली यांचेकडे सादर केला.

महाविद्यालयाने कबचौ उमवि यांचेकडे बी.पी.ई.एस या पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रस्ताव केला आहे. सदर प्रस्ताव विद्यापीठाने पात्र ठरवून

महाविद्यालयाचे कबचौउमवि यांचेकडे बी.पी.ई.एस. या पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रस्ताव केला आहे. सदर प्रस्ताव विद्यापीठाने पात्र ठरवून शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

महाविद्यालयाने अण्णासाहेब डॉ. जी.डी.बेंडाळे शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण ८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

केली. तसेच महाविद्यालयातर्फे गरीब विद्यार्थी निधी अंतर्गत ६ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ शिष्यवृत्ती प्रदान केली.

महाविद्यालयाला कबचौ उमवि, जळगाव यांचेतर्फे गुणवत्ता निधारण समितीने महाविद्यालयाला २०१८-२०१९ ते २०२०-२१ या कालावधीकरीता अ श्रेणी प्रदान केली.

महाविद्यालयाचे नॅक पुर्नमुल्यांकन तिसरी फेरीसाठी नॅक संस्थेने जाहीर केलेला प्रस्तावित आराखडा या विषयावर प्राचार्य डॉ. व्ही.एस.झोपे, यांनी मार्गदर्शन केले. त्यानुसार महाविद्यालय २०१९-२० या शैक्षणिक वर्षात नॅक संस्थेकडे पुर्नमुल्यांकनासाठी प्रस्ताव सादर करणार आहे.

कबचौ उमवि आविष्कार २०१८-१९ दि. २७.१२.२०१८ रोजी आयोजित यात ९ विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभाग घेतला. एका विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत निवड झाली. करीअर ॲन्ड कौन्सिलिंग सेल अंतर्गत कॅम्पस इंटरव्हू, टीईटी, सीटीईटी, या परीक्षा संदर्भात प्रा. केतन चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

नेहमीप्रमाणे महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध नवीन विषयांवर आणि संशोधन केलेल्या कामकाजावर आधारीत आपले विचार स्वतंत्रपणे विविध सत्रांमध्ये आयसीटीचा वापर करुन सादर केले. या अंतर्गत बाहेरीत तज्ञ शिक्षकांना बोलावून त्यांचेही व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत सादर केलेल्या निबंधांचे एकत्रित संपादन करून स्वतंत्र जर्नल प्रकाशित करण्यात आले. या प्रबोधिनीचे कामकाज प्रा. रामलाल सी. शिंगाणे यांनी पाहिले.

शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग (विभागप्रमुख – प्रा. निलेश जोशी)

दि. २१.०६.२०१८ रोजी जागतिक योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या योग कार्यशाळेत प्रा. प्रविण कोल्हे यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना मार्गदर्शन केले. या विभागात बॅडमिंटन, बास्केटबॉल, क्रिकेट, रायफल शुटींग व लाईफ गार्ड मॅनेजमेंट हे हे पाच विद्यापीठ मान्यताप्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

दि. २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त प्रा. अंजली बन्नापरू यांनी मार्गदर्शन केले. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. यापैकी १२ खेळाडूंची निवड आंतरविद्यापीठ स्तरावर झाली. यामध्ये अखिलेश यादव (जलतरण), दिपाली वाघादे (कबड्डी), पूजा कन्नूरकर (खो-खो), वर्षा सोनवणे (फ्लोअरबॉल), पवन ठाकूर (कबड्डी), ईलेश गावीत (खो-खो), संजय जाधव (तलवारबाजी), निखील गलवाडे (तलवारबाजी), रोहिणी सोनवणे (फुटबॉल), सुषमा पाटील (क्रिकेट), रुपाली बावीस्कर (क्रिकेट) व लीना चव्हाण (लॉन टेनिस) यांनी विद्यापिठाचे प्रतिनिधीत्व केले. त्याचप्रमाणे स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या आंतरकुल स्पर्धांमध्ये धावणे, गोळा फेक, थाळी फेक, रस्सीखेच, क्रिकेट अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आलेले होते. प्रा. प्रविण कोल्हे व प्रा. निलेश जोशी यांनी स्पोर्टस् न्युट्रीशन व फिटनेस या राष्ट्रीयस्तर कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

एकलव्य क्रीडा संकुलातील जिम्नॅस्टिक्स विभागात आपल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी एकूण ११ खेळाडूंनी जालना येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होऊन १४ पदके प्राप्त केली. यापैकी ८ खेळाडूंनी नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होती २ पदके प्राप्त केली. तसेच यावर्षी गुरुग्राम, हरियाणा येथे झालेल्या सी.बी.एस.ई. राष्ट्रीय स्पर्धेत ६ खेळाडूंनी सहभाग घेत सर्वांनी पदकांची लयलूट केली.

त्याचप्रमाणे गोवा जिम्नॅस्टिक्स संघटना व अनॅक फिटयूथ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत १५ खेळाडूंनी सहभागी होत १ सुवर्ण, ६ रौप्य व ८ कांस्य अशी १५ पदके प्राप्त करत स्पर्धेचे सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले.

प्रा. निलेश जोशी यांनी जुलै २०१८ मध्ये कझाकीस्तान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक कार्यशाळेत सहभाग नोंदवत आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकाचे मानांकन मिळवले. तसेच सप्टेंबर २०१८ मध्ये मंगोलीया येथे झालेल्या आशियाई चषक स्पर्धेत भारतीय संघाच्या प्रशिक्षकांची भूमिका निभावली. या स्पर्धेच्या माध्यमातून प्रा. निलेश जोशी व प्रा. प्रविण कोल्हे यांच्या मार्गदर्शनाद्वारे केसीई सोसायटीच्या भूषण देशमुख या खेळाडूस आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिले रजत पदक प्राप्त झाले.

अशाप्रकारे शारीरिक शिक्षणशास्त्र विभागामार्फत वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले.

संस्थेच्या अमृत महोत्सवी २०१९-२० या वर्षात महाविद्यालय विविध स्तरावर शैक्षणिक चर्चासत्र, कार्यशाळा, सामाजिक उपक्रम, विशेष व्याख्याने, माजी विद्यार्थी स्नेह मेळावा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करणार आहे.

शै. वर्षात २०२०-२१ मध्ये बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड. या अभ्यासक्रमांना प्रवेश क्षमतेच्या सुमारे ८०% विद्यार्थी प्रवेशित होतील. तसेच द्वितीय वर्षासाठी १००% विद्यार्थी प्रवेशित होतील. यादृष्टीने महाविद्यालयाने नियोजन केले आहे. त्यानुसार म हाविद्यालय २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात नॅक संस्थेकडे पुनर्मुल्यांकनासाठी प्रस्ताव सादर करणार आहेत. या वर्षात महाविद्यालयात बी.पी.ई.एस. शिक्षणक्रमाला शासनाची मान्यता मिळाल्यानंतर प्रवेशा संदर्भात कार्यवाही होईल. त्यामुळे खेळाडू विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल. तसेच युजीसीकडे सादर केलेल्या स्वायत्त महाविद्यालय प्रस्ताव मान्यतेसाठी सातत्याने पाठपुरावा करून महाविद्यालय स्वायत्त होईल, अशी खात्री आहे. शासनाच्या विविध अनुदान योजनासाठी वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात येवून विद्यार्थी व शिक्षकांना त्याचा लाभ होईल.

**जिमखाना विभाग अहवाल**

दिनांक २७ ऑगस्ट २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेमध्ये के.सी.ई. सोसायटीचे मु.जे.महाविद्यालय जळगाव येथे सहभाग घेतला त्या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाचा संघ द्वितीय क्रमांकावर राहिला.

दिनांक ०४ ऑक्टोंबर ते ०५ ऑक्टोबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल (पुरुष व महिला) स्पर्धेमध्ये नूतन मराठा महाविद्यालय जळगाव येथे सहभाग नोंदवला.

दिनांक ०६ ऑक्टोबर ते ०७ आक्टोंबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन भरतोलन शक्तीतोलन (पुरुष व महिला) स्पर्धेमध्ये धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर येथे सहभाग घेतला.

दिनांक ०८ ऑक्टोबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन हॉकी (पुरुष व महिला) स्पर्धेमध्ये गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे सहभाग घेतला.

दिनांक १३ ऑक्टोबर ते ऑक्टोबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन कबड्डी (पुरुष व महिला) स्पर्धेमध्ये अँड एस. ए. बाहेती आर्ट्स,कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय जळगाव येथे सहभाग नोंदविला.

दिनांक १७ व १८ ऑक्टोबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अंतर महाविद्यालय खो-खो (पुरुष) स्पर्धेमध्ये मु.जे. महाविद्यालयात सहभाग नोंदविला.

दिनांक २३ व २४ ऑक्टोबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी आंतर महाविद्यालयीन बॉस्केटबॉल महिला स्पर्धेमध्ये डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय जळगाव येथे सहभाग घेतला.

दिनांक १६ नोव्हेंबर २०१९ ते १७ नोव्हेंबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन फुटबॉल (पुरुष व महिला) स्पर्धेचे आयोजन केले स्पर्धे त आपले महाविद्यालय सहित एकूण १२ महाविद्यालय सहभागी झाले.

तसेच स्पर्धेत एकूण ०४ महिला संघांनी सहभाग नोंदवला स्पर्धेत पुरुष संघात मु.जे.महाविद्यालय प्रथम पी.ओ.नहाटा महाविद्यालय द्वितीय आणि के.सी.ई. सोसायटीचे आय.एम. आर.महाविद्यालय तृतीय स्थान पटकावले तर महिला संघात मु.जे. महाविद्यालय प्रथम डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय द्वितीय तर के.सी.ई.सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय तृतीय स्थानावर समाधान मानले एकूण चार महिला संघाने स्पर्धेत सहभाग घेतला.

दिनांक २१ नोव्हेंबर २०१९ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन क्रिकेट (पुरुष व महिला) स्पर्धेत सहभाग नोंदवला या स्पर्धा मू.जे. महाविद्यालय जळगाव येथे आयोजित करण्यात आल्या दिनांक २७नोव्हेंबर २०१९रोजी आपल्या महाविद्यालयाने अंतर महाविद्यालय रब्बी फुटबॉल पुरुष व महिला स्पर्धेत

सहभाग नोंदवत महिला संघाने तृतीय स्थान पटकावले सदर स्पर्धा व्हीएस नाईक महाविद्यालय रावेर येथे संपन्न झाल्या

दिनांक ०६ डिसेंबर २०१९ व दिनांक ०७ डिसेंबर २०१२ रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालय हॅण्डबॉल (पुरुष व महिला) स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेत एकूण ०६ पुरुष संघानी सहभाग तर ०५ महिला संघानी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे प्रथम मु. जे. महा. जळगाव, द्वितीय डी.डी. एन भोळे महाविदयालय, भुसावळ, तृतीय शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय जळगाव , या प्रकारे तसेच महिला विभाग हॅण्डबॉल स्पर्धेचा निकाल अनुकमे प्रथम डॉ.आण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महा. जळगांव, द्वितीय शासकीय अभियांत्रिकी महा जळगांव, तृतीय पी. के कोटेचा महिला महा.भुसावळ यांनी पटकाविला.

दिनांक ०३ ऑक्टोबर २०१९ रोजी आपल्या महाविदयालयाने तलवारबाजी (पुरुष) स्पर्धेत सहभाग नोंदवित द्वितीय स्थान पटकाविले. आंतर महा. तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर येथे करण्यात आले.

दिनांक ०७ डिसेंबर २०१९ रोजी आंतर महा. बेसबॉल स्पर्धा धनजी नाना महाविदयालय, फैजपूर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत आपल्या महाविदयातील महिला संघ सहभागी झाला होता.

दिनांक ०८ डिसेंबर २०१९ रोजी आपल्या महाविदयालयाने आंतर महा. सॉफ्टबॉल स्पर्धेत सहभाग घेतला, या स्पर्धा धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर येथे पार पडल्या.

दिनांक २० जानेवारी २०२० रोजी आपल्या महाविद्यालयाने आंतर महा. फ्लोअरबॉल (पुरुष व महिला) स्पर्धेत सहभाग घेतला, या स्पर्धा के सी.ई. मु. जे. महा जळगांव येथे पार पडल्या.

दिनांक ०५ फेब्रुवारी २०२० रोजी आपल्या महाविदयालयातील महिला संघाने आतर महा. टायक्वादो स्पर्धेत सहभाग नोंदविला या स्पर्धा शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगांव यानी आयोजित केल्या.

दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी आंतर महाविदयालयीन मिनीगोल्फ (पुरुष व महिला) स्पर्धा के. सी. ई. सो.चे मुळजी जेठा महाविद्यालय जळगांव येथे आयोजीत करण्यात आल्या. आपल्या महाविदयालया स्पर्धेत सहभाग नोंदविला.

**२०१९-२० या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्य क्रिडा महोत्सव अश्वमेध स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू**

१)क्षितीज सोनवणे

**२०१९-२० या शैक्षणिक वर्षात आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू**

| अ.न. | खेळाडूचे नाव | वर्ग | क्रीडा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | अखिलेश हवालदार यादव | S.Y.B.P.Ed. | जलतरण |
| २ | भूषण शाम तायडे | F.Y.B.P.Ed | जलतरण |
| ३ | नूतन विजय शेवाळे | F.Y.B.P.Ed | हॉकी |
| ४ | नूतन विजय शेवाळे | F.Y.B.P.Ed | फ्लोअर बॉल |
| ५ | भारत मोहन चौधरी | F.Y.B.P.Ed | फ्लोअर बॉल |
| ६ | जयश्री दिलीप चौधरी | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |
| ७ | गुंजा डी.विश्वकर्मा | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |
| ८ | गुंजा डी.विश्वकर्मा | F.Y.B.P.Ed | क्रिकेट |
| ९ | क्षितीज संजयकुमार सोनवणे | F.Y.B.P.Ed | व्हॉलीबॉल |
| १० | शुभम अनिल धामोडे | F.Y.B.P.Ed | फुटबॉल |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | स्वप्नील अनिल सरकटे | F.Y.B.P.Ed | फुटबॉल |
| १२ | निखिल मनोहर गलवाडे | S.Y.B.P.Ed. | तलवारबाजी |
| १३ | लक्ष्मी दलपतसिंग गिरासे | F.Y.B.P.Ed | क्रिकेट |
| १४ | निशिकांत रविंद्र पाटील | 181 Certficate Course | वेटलिफ्टिंग |
| १५ | प्रितेश रमेश पाटील | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |

**२०१९-२० या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेले महाविद्यालयीन खेळाडू**

| अ.न. | खेळाडूचे नाव | वर्ग | क्रीडा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | प्रितेश रमेश पाटील | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |
| २ | जयश्री दिलीप पाटील | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |

**२०१९-२० या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू**

| अ.न. | खेळाडूचे नाव | वर्ग | क्रीडा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | अखिलेश हवालदार यादव | S.Y.B.P.Ed. | जलतरण |
| २ | भूषण शाम तायडे | F.Y.B.P.Ed | जलतरण |
| ३ | नूतन विजय शेवाळे | F.Y.B.P.Ed | हॉकी |
| ४ | नूतन विजय शेवाळे | F.Y.B.P.Ed | फ्लोअर बॉल |
| ५ | भारत मोहन चौधरी | F.Y.B.P.Ed | फ्लोअर बॉल |
| ६ | जयश्री दिलीप चौधरी | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |
| ७ | गुंजा डी.विश्वकर्मा | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |
| ८ | गुंजा डी.विश्वकर्मा | F.Y.B.P.Ed | क्रिकेट |
| ९ | क्षितीज संजयकुमार सोनवणे | F.Y.B.P.Ed | व्हॉलीबॉल |
| १० | शुभम अनिल धामोडे | F.Y.B.P.Ed | फुटबॉल |
| ११ | स्वप्नील अनिल सरकटे | F.Y.B.P.Ed | फुटबॉल |
| १२ | निखिल मनोहर गलवाडे | S.Y.B.P.Ed. | तलवारबाजी |
| १३ | लक्ष्मी दलपतसिंग गिरासे | F.Y.B.P.Ed | क्रिकेट |
| १४ | निशिकांत रविंद्र पाटील | 181 Certficate Course | वेटलिफ्टिंग |
| १५ | प्रितेश रमेश पाटील | F.Y.B.P.Ed | सॉफ्टबॉल |
| १६ | सचिन मराठे | F.Y.B.P.Ed | रग्बीफुटबॉल |
| १७ | दिपाली पुंडलिक वाघादे | S.Y.B.P.Ed | वेटलिफ्टिंग |
| १८ | प्रसाद देशमुख | F.Y.B.P.Ed | हँडबॉल |
| १९ | प्रसाद देशमुख | F.Y.B.P.Ed | मिनी गोल्फ |
| २० | प्रसाद देशमुख | F.Y.B.P.Ed | हॉकी |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | अरुण बारेला | F.Y.B.P.Ed | जलतरण |
| २२ | यशवंत बारेला | F.Y.B.P.Ed | तलवारबाजी |
| २३ | जयश्री महाजन | F.Y.B.P.Ed | बेसबॉल |
| २४ | गुंजा विश्वकर्मा | F.Y.B.P.Ed | बेसबॉल |
| २५ | गुंजा विश्वकर्मा | F.Y.B.P.Ed | फुटबॉल |
| २६ | चेतस्विनी राजपूत | F.Y.B.P.Ed | क्रिकेट |
| २७ | जयश्री चौधरी | F.Y.B.P.Ed | क्रिकेट |
| २८ | भरत चौधरी | F.Y.B.P.Ed | मिनी गोल्फ |

**विद्यार्थी परिषद यादी २०१९-२०**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रा. अशोक रामचंद्र राणे | प्राचार्य |
| २ | प्रा. केतन पोपट चौधरी | उपप्राचार्य |
| ३ | प्रा. रंजना राजेश सोनवणे | प्राचार्य नामनिर्देशित अधिव्याख्याता |
| ४ | प्रा. पंकज रविंद्र पाटील | प्रभारी अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेना |
| ५ | प्रा. निलेश दीपकराव जोशी | शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख |
| ६ | प्रा. प्रविण दामोदर कोल्हे | प्रतिनिधी, राष्ट्रीय सेवा योजना |
| ७ | प्रा. कुंदा विठ्ठल बाविस्कर | विद्यार्थी विकास अधिकारी |
| ८ | प्राची टिकाराम जंगले | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ९ | रोहिणी राजू सोनवणे | क्रीडा प्रतिनिधी |
| १० | प्रा. प्रवीण दामोदर कोल्हे | प्रतिनिधी, राष्ट्रीय सेवा योजना |
| ११ | चेतना दिगंबर लोखंडे | सांस्कृतिक प्रतिनिधी |
| १२ | कांचन रघुनाथ धांडे | सचिव |

# महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या सूचनेनुसार महिलांचे लैंगिक शोषण कायदा २०१३ नुसार महाविद्यालयात महिला लैंगिक शोषण तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे.

समिती प्रमुख - प्रा. डॉ. शैलजा डी. भंगाळे

महिला सदस्य - प्रा. कुंदा व्ही. बाविस्कर

महिला सदस्य - प्रा. सुनिता ए. नेमाडे

पुरुष सदस्य - प्राचार्य डॉ. ए. आर. राणे

पुरुष सदस्य- श्री. मोहन बी. चौधरी

महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सर्वांचा ठाम विश्वास आहे. की महिलांचे लैंगिक शोषण हे स्त्रियांच्या समानतेच्या मूलभूत हक्कांची हिंसाच आहे. महिलांच्या शोषणाविरुद्ध तसेच पुरुष समानतेबाबत शिक्षक विद्यार्थी व अन्य कर्मचारी यांच्यात जनजागृतीसाठी करणे. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरणाची खात्री देणे. व लैंगिक शोषणाच्या तक्रारीचे निवारण करणे या दृष्टीने सदर समिती कार्य करील. समितीचे कार्य चार स्तरांवर होते. १) तक्रारीचे निवारण २) जण जागृती उपक्रम ३) समुपदेशन ४) योग्य माहिती उपलब्ध करून देणे.

**समिती प्रमुख**

**प्रा. डॉ. शैलजा डी. भंगाळे**

# इतिहास मंडळ २०१९-२०

के. सी. ई. सोसाचे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात इतिहास मंडळामार्फत दि. ०४.०१.२०२० रोजी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महात्मा गांधींचे योगदान या विषयावर प्रा डॉ पी एस देशमुख यांचे व्याख्यान आयोजित केलेले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा डॉ एस देशमुख होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. आर राणे होते. डॉ. पी. एस. देशमुख यांनी आपल्या भाषणातून महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील यांच्या महत्वपूर्ण कामगिरीबद्दल प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले, तर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. ए. आर. राणे यांनी महात्मा गांधीच्या जीवनातील काही महत्त्वाच्या प्रसंगावर प्रकाश टाकली. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. शिंगाणे आर. सी. यांनी केले होते. तर सूत्र संचालनाचे कामकाज गोविंदा बारेला या विद्यार्थिनीने केले. तर आभार प्रदर्शनाचे कामकाज उज्वला भील या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहवाल विभाग

महाविद्यालयाचा इतर शाळा व महाविद्यालय याच्या सोबतचा परस्पर सामंजस्य करार –

महाविद्यालयाने शैक्षणिक व क्रीडा शेत्रातील विविध उपक्रमांसाठी शाळा व महाविद्यालय याच्या सोबत जून २०१६ पासून परस्पर सामंजस्य करार केला आहे. याचा लाभ महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी तसेच शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना झाला आहे. या कराराची व्याप्ती पुढील प्रमाणे ...

१ विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील ज्ञन व कौशल्य यांचा विकास

२ विद्यार्थी आणि शिक्षक यांचे प्रशिक्षण व प्रत्यक्ष उपक्रम सहभाग

३ संशोधन आणि विकास

४ कौशल्य विकास कार्यक्रम

५ अतिथी व्याख्यानांचे आयोजन

६ शिक्षकांसाठी उद्बोधन व उजळणी कार्यक्रम

७ शिक्षक विद्यार्थी अदान प्रधान उपक्रम

८ संयुक्तरित्या कार्यक्रमांचे आयोजन

९ आंतरवासिता कार्यक्रमाचे आयोजन

१० शालेय सराव पाठांचे आयोजन

वरील उद्देश साध्य करण्यासाठी महाविद्यालयाने खालील संस्थाशी सामंजस्य करार केला आहे.

१ आण्णासाहेब डॉ. जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

२ नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव

३ श्रीमती प.न. लुंकड कन्या शाळा, जळगाव

४ श्रीमती शकुन्तला माध्यमिक विद्यालय, जळगाव

५ ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालय, जळगाव

६ ओरीओन स्टेट बोर्ड इंग्लिश मेडीम स्कूल, जळगाव

७ श्रीमती शेवंताबाई टोके विद्यालय,जळगाव

८ शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव

९ एकलव्य क्रीडा संकुल, जळगाव

१० जळगाव जिल्हा क्रीडा संघ, जळगाव

११ इकरा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मेहरूण, जळगाव

१२ सद्गुरू शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

१३ सानेगुरुजी विद्याप्रबोधीनी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, खिरोदा

१४ श्रीमती सीताबाई गणपत भंगाळे, विद्यालय, जळगाव

१५ कै. भिलाभाऊ गोटू सोनवणे माध्यमिक विद्यालय, जळगाव

१६ महाराणा प्रताप विद्यालय व कानिष्ठ महाविद्यालय, जळगाव

**प्रा. शैलजा भंगाळे**
समन्वयक

# Report of University Avishkar Competition:- 2019-20

- Our college students and teachers have been participated in University organized Avishkar Research Competition Report for the year 2019-20

| No. | Name of students | Title |
|---|---|---|
| 1. | Shaiyad Anam | In vitro Anti- urolithiatic activity of Hajarul Yahood Bhasma and Hajarul |
| 2. | Shaikh Taqdish | Anti urolithiatic activity of some ayurvedic medicine |
| 3. | Bharti Kalusing Ravatale | Mahilana Faswinarya sanket sthalawishayi vidyathrnininchya janiv jagruticha Abhyas |
| 4. | Tejshri Rajendra Patil | Mahilana Faswinarya sanket sthalawishayi vidyathrnininchya janiv jagruticha Abhyas |
| 5. | Harsha Janardhan Khodke | Mahila suraksha App Baddal Mahavidyalayin vidyathrnininchya janiv jagruticha Abhyas |
| 6. | Monika Ramesh Sodanke | Mahila suraksha App Baddal Mahavidyalayin vidyathrnininchya janiv jagruticha Abhyas |
| 7. | Sachin Hari Marathe | जळगाव शहरातील शारीरिक आरोग्याबाबत जागरूक असणाऱ्या नागरीकांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास |
| 8. | Arun Batya Barela | |
| 9. | Dattatray Naval Patil | १२ ते १४ वर्षे वयोगटातील खेळाडूच्या स्पर्धात्मक चिंतेचा विश्लेषणात्मक अभ्यास |
| 10. | Sh. Latifoddin | |
| 11. | Sanjay Barkya Pawara | Plastic verses Natural sources |
| 12. | Poonam Prakash Patale | Plastic verses Natural sources |

**Prof. Baviskar K.V.**
Coordinator




कॅम्पस प्लेसमेंट इंटरव्यूह




कॅम्पस प्लेसमेंट इंटरव्यूह




राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सात दिवसीय विशेष शिबीर

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, अमृत महोत्सवी वर्ष २०१९-२० जळगाव

के.सी.ई... एक प्रगल्भ शैक्षणिक चळवळ...

**Spiritual Platform** **To Make Golden Career..**

KNOWLEDGE IS POWER
ESTD. 1945
Moolji Jaitha College

ViViDhaTa
Research & Training Center

Institute of Management
& Research

स्वामी विवेकानंद
कनिष्ठ महाविद्यालय

KilBil Balak Mandir

IMPT

KCES's Ojaswini
Ojaswini Kala
Mahavidhyalaya

KCES's GIRLS HOSTEL
Girls Hostel

एकलव्य क्रीडा संकुल
Eklavya Krida Sankul

JalaSRI Watershed Surveillance
& Research Institute

ज्ञानप्रसारो व्रतम्
स्थापना १९४४
खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी
ESTD : 1944



Eklavya College of
Physical Education

G. P. V. P. School

Let the Light Shine
Orion CBSE English
Medium School

GICE

समवाय एव साधुः
College of Education

S. S. Maniyar Law
College

A. T. Zamare Highschool

Let the Light Shine
Orion English Medium
School

Explore your potential
ESTD. 2010
Post Graduation College of
Science, Technology &
Research

Adhyapak
Vidhyalaya (D. T.Ed)

College of
Engineering & Information
Technology

K.C.E. Society's SPARK design & print services
Spark Design & Print
Services

Dr. APJ Abdul Kalam
Skill Center

SPARK 0257 2251918

# KHANDESH COLLEGE EDUCATION SOCIETY

*A Profound Academic Movement*